• पुणे, गुरुवार, २६ सप्टेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 287 • वर्ष ३ रे, अंक २८७ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांची खास मुलाखत... P3



सेरेन स्ट्रायकर्स, कल्याण क्लब उपांत्य फेरीत ! P12

## सरकारला इशारा : नऊ दिवसानंतर

# मनोज जरांगे यांचे उपोषण मागे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जालना:** तब्बल नऊ दिवसानंतर आज आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आपले उपोषण मागे घेतले. मात्र आता सरळ सरळ या आंदोलनाचा परिणाम राजकारणामध्ये आणि निवडणुकांमध्ये दिसेल असा स्पष्ट इशारा त्यांनी यावेळी दिला. सरकारने स्वतः होऊन आपले सरकार पाडून घेऊ नये, असे सांगत त्यांनी या उपोषणाची सांगता केली.

सरकार मराठा समाजाला धोका देत आहे समाजाने एकत्र राहून लढा सुरू ठेवावा. गरीब, राजकीय, नोकरदार या सह सर्व मराठ्यांना आरक्षण मिळावे, असे वाटते. उपमुख्यमंत्री फडणवीस साहेब माझा गरीब मराठा आरक्षणाची वाट बघत आहे, आम्हाला राजकारणात जायचे नाही आरक्षण देण्याची तुम्हाला संधी आहे. मराठ्याच्या नादी लागून नुकसान करून घेऊ नका, आचारसंहिता लागेपर्यंत आरक्षण द्या, आरक्षण नाही मिळाले तर तुमच्या निवडणुकीची गणिते बिघडतील, असा इशारा मनोज जरांगे यांनी सरकारला दिला आहे.

जरांगे यांनी १६ तारखेपासून सुरु केलेले आमरण उपोषण नवव्या दिवशी बुधवार, दि. २५ रोजी सायंकाळी



नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, महिलांच्या हस्ते फळाचा रस घेऊन स्थगित केले. अशी घोषणा मनोज जरांगे यांनी बुधवारी अंतरवाली सराटी येथे पत्रकार परिषदेमध्ये केली. या वेळी बोलतांना जरांगे यांनी सांगितले की, मराठा आणि कुणबी एकच आहे, त्यामुळे सरकारने मराठ्यांना आरक्षण द्यावे. समाजाने शांतता राखावी, आरक्षण नाही दिले तर मग सत्तेत जाऊन घ्यावे लागेल. सलाईन घेऊन पडून राहाणे मला योग्य वाटत नाही. पुढे बोलताना जरांगे म्हणाले की, मंगळवारी मध्यरात्री जिल्हाधिकारी कृष्ण पांचाळ, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, उपविभागीय अधिकारी दिपक पाटील, पोलीस अधिकारी विशाल खांबे यांनी आंदोलनाला भेट दिली. न्यायालयाने देखील मला तब्येतीची काळजी व उपचार घेण्याचे सांगितले. मी जनतेचा तसेच न्यायालयाचा मान राखत असून माझे आंदोलन स्थगित करित आहे.

# महायुतीच पुन्हा सत्तेत येणार- अमित शहा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महायुती पुन्हा सत्तेत येईल. फक्त प्रत्येक बूथवर आपल्याला १० टक्के जास्त मते मिळवावी लागतील. आपल्या बूथमध्ये बाईक रॅली काढा, साधु संतांना भेटा ही भाजपची निवडणूक आहे म्हणून त्यांना सांगा, असा सल्ला अमित शहा यांनी कार्यकर्त्यांना दिला.

सत्ता स्थापनेसाठी भाजपवर पक्ष फोडल्याचा आरोप होतो आहे. राज्यात एक शिवसेनेच्या दोन शिवसेना आणि एका राष्ट्रवादीच्या दोन राष्ट्रवादी अस्तित्वात आल्या. भाजपच या फोडाफोडीला कारणीभूत असल्याची टीका करण्यात येते. काही राज्यांमध्ये सत्तास्थापन करण्यासाठी भाजपने आमदारांची देखील फोडाफोडी केली होती.

मात्र, महाराष्ट्र विधानसभेसाठी गृहमंत्री अमित शाह यांनी बूथवरील



महाविकास आघाडीचे पदाधिकारी फोडण्याचा सल्ला दिला आहे.

आपल्या मराठवाड्यातील दौऱ्यात शाह यांनी विरोधी पक्षांचे बूथवरील कार्यकर्ते फोडण्याचा सल्ला दिला. तसेच बूथची वर्गवारी चार प्रकरात करण्याचे सांगितले. बूथची वर्गवारी ए, बी, सी, डी या चार प्रकारामध्ये करा. ए दर्जाचा बूथ म्हणजे जिथे भाजपला हमखास विजय मिळतो. बी, सी, डी या बूथवर विरोधी पक्षांचे वर्चस्व असेल तर त्यावर जास्त मेहनत करा. तेथील विरोधी पक्षातील बूथप्रमुखांना आपल्याशी सोडून घ्या, असा सल्ला अमित शाह यांनी भाजप कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना दिला. तसेच मतदान वाढीसाठी फक्त बूथ प्रमुखांवर अवलंबून राहू नका पदाधिकारी नेते यांनी देखील लक्ष द्यावे, असे देखील शाह म्हणाले.

## सलग तिसऱ्या दिवशीही वरुणराजा बरसला

# शहरात पावसाची जोरदार बॅटिंग

**पुणे :** शहरात सलग तिसऱ्या दिवशीही पावसाने जोरदार हजेरी लावल्याने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. रविवारी, सोमवारी आणि मंगळवारी पावसाने शहराला झोडपून काढले. त्यामुळे कमाल तापमान चक्क ३१ अंशांवरून २१ अंशांवर खाली आल्याने वातावरणातील गारवा वाढला आहे. दरम्यान, काल बुधवारी शहराला 'रेड अलर्ट' देण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरात पाऊस पडलाच नाही. त्यामुळे वातावरण शुष्क अन् कोरडे झाले होते. ८ सप्टेंबरपर्यंत शहरात चांगला पाऊस झाला. त्यानंतर अधूनमधून फक्त रिमझिम पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे कमाल तापमान ३१ ते ३४ अंशांपर्यंत गेले होते. २२ रोजीच शहरात जोरदार पावसाने दाणादाण उडवून दिली. त्यानंतर पुन्हा २३ व २४ रोजीही जोरदार पावसाने हजेरी लावली. विजांच्या कडकडाटांसह शहरात मंगळवारी पावसाने नागरिकांची त्रेधातिरपीट उडवली. शहरातील सर्वच पेठा, उपनगरांत पावसाचे पाणी जोरात वाहत होते. मगरपट्टा, वडगाव शेरी, हडपसर, कोरेगाव पार्क, लवळे, पाषाण, चिंचवड या भागांत जोरदार पाऊस झाला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पुण्यात

# विकास कामांचा होणार शुभारंभ

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पुणे दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यामध्ये मोदींच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन आणि उद्‌घाटन करण्यात येणार आहे.

एसपी कॉलेजच्या ग्राऊंडवर त्यांची सभा होणार आहे. या सभेसाठी मोठी तयारी करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या या दौऱ्यासाठी भाजप नेते जोरदार कामाला लागले आहे. नुकतेच या दौऱ्याच्या निमित्ताने नियोजनासाठी बैठक झाली. बैठकीत



गर्दी जमविण्याबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा झाल्याची माहिती आहे. महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केलेल्या शिवाजी रस्त्यावरील ऐतिहासिक भिडे वाड्याचे राष्ट्रीय स्मारक कामाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

» पान ७ वर


# खराडीत उद्या शरद पवारांची सभा

**खराडी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची खराडी येथील झेन्सार कंपनीच्या मैदानात उद्या शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता सभा होणार आहे. या वेळी काही नेत्यांचे पक्ष प्रवेश होणार असल्याची माहिती पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली. वडगावशेरी मतदारसंघातील माजी आमदार बापू पठारे यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने ही सभा महत्त्वाची मानली जात आहे.

# 'देवाचा न्याय' तर दुसरीकडे न्यायालयाचे 'ताशेरे'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आरोपी अक्षय शिंदे यांच्या एन्काऊंटर नंतर दोन दिवसापासून ' देवाचा न्याय ' हा हॅशटॅग प्रचंड व्हायरल झाला आहे . सध्या राज्यभरात हा हॅशटॅग सर्वाधिक चालविला जात आहे. बलात्काराच्या आरोपीला असाच धडा शिकविला पाहिजे , याबद्दल देवेंद्र फडणवीस यांचे आभार. असा अर्थ आहे . तर दुसरीकडे आज न्यायालयाने सरकारवर प्रचंड ताशेरे ओढले. सामान्य



माणूस बंदूक चालवू शकतो का ? इथपासून ते अक्षय शिंदे यांचा एन्काऊंटर होणे शक्य नाही . यासारखे अनेक ताशेरे ओढत न्यायालयाने सरकारची कान उघडली केली. बदलापूर शाळेतील अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या एन्काउंटरवरून अक्षय शिंदेचे वडील अण्णा शिंदे यांनी मुंबई उच्च न्यायालयात तातडीने फौजदारी रिट याचिका दाखल

» पान ७ वर



## ३ वर्षात भारत तिसरी आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येणार : मंत्री अनुराग सिंह ठाकूर

# युवा कनेक्ट कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** शिक्षण, आरोग्य, कौशल्य, क्रीडा आणि युवा या घटकांच्या माध्यमातूनच आपला देश विकसित भारत बनणार आहे. ज्या दिवशी भारत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल त्यावेळेस महाराष्ट्र सुध्दा १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था म्हणून उदयास येईल. पुढील तीन वर्षात भारत तिसरी आर्थिक महासत्ता बनेल. असा विश्वास केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकुर यांनी व्यक्त केला.

भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्यावतीने आयोजित विकसीत भारत अभियान अंतर्गत युवा कनेक्ट कार्यक्रम कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयू च्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी एमआयटी डब्ल्यूपीयू चे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ. आर. एम.चिटणीस व कुलसचिव प्रा. गणेश पोकळे उपस्थित होते. यावेळी राहुल विश्वनाथ कराड यांनी अनुराग ठाकुर यांचा विशेष सत्कार केला.

अनुराग ठाकुर म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नुसार २०४७ मध्ये भारतातील युवक संपूर्ण जगावर राज्य करेल. विकसीत भारत एक नारा नाही तर संकल्प आहे. विकसीत भारतासाठी युवकांचे योगदान महत्वाचे आहे. भविष्यातील भारतासाठी केंद्र सरकारने १०० दिवसांमध्ये १५ लाख कोटी पेक्षा अधिक प्रकल्पांना मंजूर दिली आहे." "देशात स्टार्टअप कार्यक्रमाला सर्वाधिक प्रोत्साहन देण्यात आले आहे.

देशातील शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये व त्यांना रोजगार मिळावा म्हणून स्वामीनाथन कमिटी स्थापन करण्यात आली आहे. त्यासाठी पीएम किसान सन्मान योजना आहे. चंद्रयान ने देशात क्रांती घडविली. विकसित भारतासाठी इन्फ्रास्ट्रक्चर सर्वोत्तम हवे. त्यासाठी यावर्षी ११ लाख कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. देशात रोज ९१ किमी रस्ते बनविले जात आहेत. ७० वर्षात जेवढे एअरपोर्ट बनविण्यात आले नाही, त्यापेक्षा अधिक एअरपोर्ट बनविण्यात आले आहेत.

पुढे बोलताना ते म्हणाले, 'विकसीत महाराष्ट्र बनविण्यासाठी अटल सेतूची निर्मिती, रोजगार आणि युवकांना अत्याधुनिक कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. भारत जेव्हा ५ ट्रिलियन अर्थ व्यवस्था बनेल तेव्हा महाराष्ट्र १ ट्रिलियन अर्थ व्यवस्था म्हणून उद्यास येईल."

डॉ. आर.एम.चिटणीस म्हणाले, "या देशात सर्वात मोठी युवा शक्ती आहे. राष्ट्रनिर्मितीसाठी भारत विकासासाठी युवा शक्तीला जोडणे हे अत्यंत महत्वाचे आहे. त्यासाठी एमआयटी डब्ल्यूपीयू तर्फे युवकांसाठी भारतीय छात्र संसद, सोशल लिडरशीप डेव्हल्पमेंट प्रोग्राम व राईड यासारखे अनेक कार्यक्रमाचे आयोजन प्रतिवर्षी करण्यात येते." प्रा. डॉ. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले.

> सरकार १ कोटी युवकांना देशातील ५०० टॉप कंपन्यामध्ये इंटर्नशिप देणार आहे. पब्लिक पेपर लिंक होऊ नये म्हणून नवा कडक कायदा, मेडिकल कॉलेजमधील सिटांची संख्या वाढविणे, ४ कोटी १० लाख युवकांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षण, महिला सबलीकरणावर भर, टुरिझम वर कार्य, महिलांना लखपती बनविण्याचे कार्य, ४ कोटी घरे बनविणे, १४ कोटी महिलांना गॅस कनेक्शन, ५३ कोटी लोकांचे बँक अकांउन्ट उघडणे, प्रत्येक घराघरात वीज . तसेच देशात स्टार्टअप कार्यक्रमला सर्वाधिक प्रोत्साहन देण्यात आले."
> — **अनुराग सिंह ठाकुर** युवा व्यवहार व क्रीडा मंत्री

---

## Selected

### पुणेकरांना हास्य जल्लोषाची पर्वणी

**पुणे :** हास्य जल्लोषाची पर्वणी ठरणाऱ्या आणि विनोद या विषयाला वाहिलेल्या महाराष्ट्रातील एकमेव अशा विनोदोत्तम करंडक राज्यस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धेला बुधवार दिनांक २५ सप्टेंबर पासून भरत नाट्य मंदिर येथे प्रारंभ झाला. या स्पर्धेच्या निमित्ताने रसिकांना वैविध्यपूर्ण विनोदी एकांकिकांचा आस्वाद घेता येणार आहे.

रविवार दिनांक २९ सप्टेंबर २०२४ पर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातून एकूण १७ संघ सहभागी झाले आहेत. यामध्ये गुरूवार दिनांक २६ रोजी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत, शुक्रवार दिनांक २७ रोजी संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत, शनिवार दिनांक २८ रोजी दुपारी १ ते ४ या वेळेत, तर रविवार दिनांक २९ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत रसिकांना विनोदाची पर्वणी अनुभवता येणार आहे.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा सोमवारी ३० सप्टेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता, भरत नाट्य मंदिर, पुणे येथे होणार आहे. यावेळी प्रसिध्द अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर हीला विनोदवीर पुरस्कार देऊन गोरविण्यात येणार आहे, तर ज्येष्ठ नाट्य कलावंत दीपक दंडवते यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महवितरण, पुणेचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार भूषविणार आहेत. मुख्य अतिथी म्हणून ज्येष्ठ निवेदक सुधीर गाडगीळ उपस्थित राहणार आहेत.

बाल कलाकारांपासून ज्येष्ठ कलाकारांपर्यंत सगळ्यांच्या कलेला वाव देणाऱ्या या स्पर्धेचे आयोजन गेल्या १६ वर्षांपासून करण्यात येते. यंदाचे स्पर्धेचे १७ वे वर्ष असून स्पर्धेला मिळणारा प्रतिसाद वाढतोच आहे. स्पर्धेच्या निमित्ताने रंगकर्मींना निखळ विनोद निर्मितीसाठी एक मनमोकळे, दिलखुलास व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

---

## राष्ट्रसंचार राजकीय

# आरक्षण संपवणे ही काँग्रेसची मानसिकता

### मंत्री अनुराग ठाकूर यांचा हल्लाबोल

**पुणे :** भारतीय जनता पक्षाचे खासदार अनुराग ठाकूर यांनी बुधवारी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्यावर हल्ला चढवला. देशातील आरक्षण संपवणे हीच काँग्रेसची मानसिकता आहे. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांची मानसिकता आरक्षण संपवण्याचीच होती. आता विदेशी भूमीवर राहुल गांधी यांच्या तोंडून आरक्षण संपवण्याची भाषा बोलली गेली आहे, अशा



शब्दांत त्यांनी टीका केली. विकसित भारत कार्यक्रमासाठी ठाकूर पुणे दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली भ्रष्टाचार मुक्त सरकारमुळे जगात १४० कोटी भारतीयांचा मान-सन्मान वाढत असल्याचे देश पाहात आहे. भारत जगातील पाचव्या क्रमांकाची सर्वात अर्थव्यवस्थेचा देश झाला आणि पुढील दोन वर्षांत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होणार आहे. दुसरीकडे त्यांच्या कुटुंबाच्या पक्षाने साठ वर्षे देशावर राज्य करून, देशाची वाईट स्थिती करून आता परदेशात जाऊन भारताची प्रतिमेला धक्का देत आहेत, खोटे बोलत आहेत. देशाची बदनामी होईल असा अपप्रचार करत आहेत.

देशात अपमान कोण करत आहे आणि सन्मान कोण करत आहे, हे देशवासियांना माहीत आहे. मोदी यांनी देशाचा मान वाढवल्यामुळेच ते देशवासियांच्या मनात आहेत, तर काहींनी भारतीयांचा अपमान केल्यामुळे ते भारताचे आहेत की पाकिस्तानचे असा प्रश्न जगाकडून विचारला जात आहे, असे ठाकूर यांनी सांगितले.

राहुल गांधी यांनी शिखांविषयी केलेल्या वक्तव्याबाबत ठाकूर म्हणाले, की राहुल गांधी यांनी शिखांविषयी अपप्रचार केला आहे. राजीव गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली शिखांचे शिरकाण झाले. आता राहुल गांधी विदेशात देऊन देशाची बदनामी करत आहेत. शिखांना न्याय देण्यासाठी मोदी सरकारने विशेष चौकशी समिती (एसआयटी) नियुक्त केली. कर्तारपूर कॉरिडॉरद्वारे गुरुद्वाराचे दर्शन सुरू केला. वीर बाल दिवस, गुरु नानक देव यांचा ५०० वा प्रकाशोत्सव दिवस, गुरू तेगबहादूर यांचा ४०० वा प्रकाशोत्सव मोदी सरकारनेच साजरा केला. त्यामुळे काँग्रेसने शिखांचे अपमान आणि शिरकाण केले, तर नरेंद्र मोदी सरकारने शिखांना मान दिल्याचे त्यांनी नमूद केले

---

## नवरात्रौ महिला महोत्सव..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**पत्रकार संघ :** पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाला शुक्रवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी सुरुवात होत आहे. या महोत्सवाविषयी माहिती देताना पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाच्या अध्यक्षा जयश्री बागुल.

### पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाचे रौप्य महोत्सवी वर्ष

# महिलांसाठी भाग्यलक्ष्मी स्पर्धेचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याची गौरवशाली ओळख असलेल्या पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाला शुक्रवारी ४ ऑक्टोबर रोजी सुरुवात होत असून धार्मिक, सामाजिक उपक्रमांबरोबरच महिलांसाठी भाग्यलक्ष्मी स्पर्धेअंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाच्या अध्यक्षा जयश्री बागुल यांनी पत्रकार परिषदेत दिली. दि. ४ ऑक्टोबर ते शुक्रवार, ११ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित महिला महोत्सव शिवदर्शन येथील श्री लक्ष्मीमाता मंदिराच्या प्रांगणात होणार आहे.

पुणे नवरात्रौ महिला महोत्सव यंदा दिमाखदार रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. महिला महोत्सवाचे उद्घाटन अखिल भारतीय महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा अलका लांबा यांच्या हस्ते होणार आहे. तसेच या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा संध्या सव्वालाखे, पुणे शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा पूजा आनंद उपस्थित राहणार आहेत.

**पुरस्काराने सन्मान ..**

● यंदा सोहम संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मनिषा अभिजित सोनवणे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून तर आपत्ती व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल सुषमा खटावकर, क्रीडापटू मधुरा धामणगावकर यांना तेजस्विनी पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून खडतर परिस्थितीत आपले मुलांना चांगली शिकवणूक, विचार देऊन आदर्शवत नागरिक घडविणाऱ्या सुमारे चारशेहून अधिक महिलांचा आदर्श माता पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

---

### भक्तिमय वातावरणात संत निरंकारी मिशनचा महिला संत समागम संपन्न




**पुणे :** निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या आशीर्वादाने देशभरात महिला संत समागमांचे आयोजन करण्यात येत आहे. या श्रृंखलेत पुणे झोन गंगाधाम स्थित निरंकारी सत्संग भवनात भव्य महिला संत समागम आयोजित करण्यात आला होता.या संत समागमात पुणे झोनमधील मिशनच्या सर्व शाखांतील हजारो महिला उपस्थित होत्या. सत्संगाच्या मुख्य मंचावरून संबोधित करताना भगिनी सरबजीत शौक जी (मुंबई) म्हणाल्या, केवळ भगवंताचे दर्शनच आनंददायी आहे. या निरंकार परमात्म्याचे आपल्या सद्गुरूकडून दर्शन घेतलेल्या भक्ताची एक असीम, आनंदमय अवस्था, हा प्रत्येक ब्रह्मज्ञानी व्यक्तीचा वेगळा अनुभव पाहायला मिळतो. देवाचे दर्शन झाल्यावर तो आनंदाने नाचू लागल्याचे पाहायला मिळते. त्यांनी पुढे समजावले की गृहस्थ जीवन जगताना भक्तीमार्गावर चालावे. आपल्या गृहस्थी जबाबदाऱ्या पार पाडताना भक्तीही करावी लागते. जिथे संपूर्ण कुटुंब मिळून निरंकार परमात्म्याचे स्मरण करते, त्या घरात सदोदित आनंद असतो. ब्रह्मज्ञानानेच आपण कुटुंबातील प्रत्येक सदस्यामध्ये ईश्वराचे दर्शन करू शकतो आणि त्यातूनच आपले परस्पर प्रेम वाढते.

---

### लघुपटांसाठी कायमस्वरूपी व्यासपीठ हवे : मृणाल कुलकर्णी



**पुणे :** समाज माध्यमांमुळे लघुपटाकडे प्रेक्षक वर्ग मोठया प्रमाणावर वळत असून दर्जेदार लघुपट पाहता येण्यासाठी कायम स्वरूपी व्यासपीठाची निर्मिती होणे आवश्यक असल्याचे मत सुप्रसिध्द अभिनेत्री, निर्माती, दिग्दर्शिका आणि लेखिका मृणाल कुलकर्णी यांनी व्यक्त केले. आशय फिल्म क्लब, फिल्म फेस्टीवल कंपनी आणि अभिजात फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चौथ्या 'मुंबा आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवा'चे उद्घाटन बुधवारी अभिनेत्री, निर्माती, दिग्दर्शिका आणि लेखिका मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. प्रभात रोडवरील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय चित्रपटगृहात आयोजित या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे व्यवस्थापक जसबिर सिंग, संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी तसेच महोत्सव संयोजक व फिल्म सोसायटीज ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष वीरेंद्र चित्राव, महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष आणि आयोजक जय भोसले, रश्मिता शहापूरकर, डॉ. विश्वास शेंबेकर, क्रिएटीव्ह हेड अभिषेक अवचार उपस्थित होते.


---

### चिकुनगुनिया विषाणूमध्ये झालेला बदल तपासला जाणार

# सार्वजनिक आरोग्य विभागाचा निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चिकुनगुनियाच्या काही रुग्णांमध्ये जीवघेणी लक्षणे नोंदविण्यात आली आहेत. त्यात अर्धांगवायू आणि तोंडावर, कानावर काळे चट्टे येणे या प्रकारची लक्षणे दिसून येत असल्याचा दावा काही रुग्णालयांनी केला आहे. याआधी राज्यात २००६, २०१०, २०१६ या वर्षांमध्ये चिकुनगुन्याचा संसर्ग मोठ्या प्रमाणावर झाला होता. त्या वेळी काही रुग्णांमध्ये शरीरावर काळे चट्टे आल्याचे दिसून आले होते. दर पाच ते सहा वर्षांनी चिकनगुन्याची साथ येते. यंदा रुग्णांमध्ये वेगवेगळी लक्षणे दिसन येत असून, तपासणी अहवालही निगेटिव्ह येत आहेत. त्यामुळे जनुकीय क्रमनिर्धारण करून या विषाणूमध्ये झालेला बदल तपासला जाणार आहे.



पुण्यासह राज्यभरात चिकुनगुन्याच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. याचबरोबर रुग्णांमध्ये वेगवेगळी लक्षणे दिसून येत असून, गंभीर गुंतागुंत आढळून येत आहे. यामुळे चिकनगुन्याच्या विषाणूत झालेला बदल तपासण्यासाठी जनुकीय क्रमनिर्धारण करण्याचा निर्णय राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतला आहे. राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था (एनआयव्ही) आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात चिकुनगुन्याच्या विषाणूचे जनुकीय क्रमनिर्धारण करण्यात येणार आहे. विषाणूचे जुनकीय क्रमनिर्धारण करण्यासाठी सरकारी आणि खासगी रुग्णालयांकडून रक्त नमुने घेण्यात येणार आहेत.

रुग्णालयांनी एका रुग्णांचे दोन रक्तनमुने घ्यावेत आणि एक रक्तनमुना एनआयव्हीला, तर दुसरा बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाला पाठवावा. तसेच, गंभीर लक्षणे असलेल्या रुग्णांचेच रक्तनमुने घ्यावेत आणि ते पाच दिवसांच्या आत तपासणीसाठी पाठवावेत, अशा सूचना आरोग्य विभागाने सर्व रुग्णालयांना केल्या आहेत.

> "कोट-चिकुनगुन्याच्या रुग्णांमध्ये जीवघेणी लक्षणे दिसत असल्याचा दावा काही रुग्णालयांनी केला आहे. या प्रकरणी या रुग्णालयांकडे माहिती मागविण्यात आली आहे. आरोग्य विभागाला अद्याप तरी चिकुनगुन्याच्या रुग्णांमध्ये वेगळी लक्षणे दिसून आलेली नाहीत."
> **—डॉ. राधाकिशन पवार,**

> "सहसंचालक, आरोग्य विभागपुण्यात चिकुनगुन्याचे २२७ रुग्ण आढळून आले आहेत. प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी रुग्णालयांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये सर्व रुग्णालयांना सूचना देण्यात येणार आहेत."
> **—डॉ. राजेश दिघे,**
> सहायक आरोग्य अधिकारी, महापालिका

---

# नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांनी मुठा नदीपात्र व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांनी पवना नदीपात्रातील निषिद्ध क्षेत्रामध्ये (ब्लू लाईन एरिया) उतरू नये आणि नदीपात्रात काही तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. सखल भागातील संबंधीत नागरीकांनी नदीपात्रात न उतरण्याचा सल्ला दिला आहे.

अतिवृष्टीचा इशारा २९ सप्टेंबर २०२४ पर्यंत हवामान खात्याने दिला आहे. मुळा व पवना नदीपात्रात मोठ्या प्रमाणात विसर्ग होण्याची दाट शक्यता आहे. तसंच त्यानंतर पर्जन्यमानानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग पुन्हा कमी-जास्त करण्यात येईल, असे देखील सांगण्यात आले आहे. अतिवृष्टीमुळे या धरणांच्या पाणीपातळीत पुन्हा वाढ होण्याची शक्यता आहे. खडकवासला धरणातून मुठा नदीपात्रात विसर्ग पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले.

---

### रुबी मेट्रो स्टेशनचे रमाबाई आंबेडकर नामकरण करावे

# अविनाश बागवेंकडून आंदोलनाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** रूबी हॉल क्लिनीक येथील मेट्रो स्टेशनला माता रमाई आंबेडकर यांचे नाव द्या अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मातंग एकता आंदोनाच्या वतीने माजी नगरसेवक व मातंग एकता आंदोलनाचे कार्याध्यक्ष अविनाश बागवे यांनी दिला आहे. त्यांनी जिल्हाधिकारी यांना संघटनेच्या वतीने निवेदन दिले.

निवेदनात म्हणाल्यानुसार रूबी हॉल क्लिनीक, पुणे स्टेशन लगत भारत देशातील माता रमाई आंबेडकर यांचा पहिला पुतळा उभारण्यात आलेला असुन सदर परिसरामध्ये मोठया प्रमाणात दलित नागरी वस्ती वास्तव्यास आहे. या भागातीन हजारो नागरीकांच्या भावना लक्षात घेता सदर मेट्रो स्टेशनला रूबी हॉल क्लिनीक मेट्रोस्टेशन या नावा ऐवजी माता रमाई आंबेडकर मेट्रो स्टेशन नाव देण्यात यावे अशी मागणी आहे. तरी या नावात त्वरीत बदल करावा अन्यथा आपल्या कार्यालयासमोर संघटनेच्या वतीने मोठे आंदोलन केले जाईल, असा इशारा दिला आहे.


यावेळी कार्याध्यक्ष अविनाश बागवे, विठ्ठल थोरात, ॲड. राजश्री अडसूळ, अध्यक्ष शहर मं.ए. आ महिला, अध्यक्ष शहर सुरेखा खंडाळे, सरचिटणीस दयानंद अडागळे, अरुण गायकवाड, शहर कार्याध्यक्ष रमेश सकट, डॉ. रमाकांत साठे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी देखील उपस्थित होते.

#रा

> "भारत देशातील पहिला पुतळा हा या परिसरामध्ये उभारण्यात आला आहे येथे मोठ्या प्रमाणात दलित नागरी वस्ती आहे , आणि येथील भीमसैनिकांची रमाबाईंच्या प्रति नितांत श्रद्धा आहे त्यामुळे या मेट्रो स्टेशनला रमाबाई आंबेडकर यांचे नाव देणे औचित्यपूर्ण आहे."
> **— अविनाश बागवे**
> मातंग एकता आंदोलनाचे कार्याध्यक्ष.

# पुण्याचा लौकिक आंतरराष्ट्रीय पातळीवर

## भाजप अध्यक्ष धीरज घाटे यांचा विश्वास



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यकर्त्यांची दृष्टी आणि दृष्टिकोन व्यापक असेल तर समाजाच्या जीवनशैलीमध्ये गुणात्मक वाढ होतेच परंतु, राष्ट्राचे हे लौकिक जगभरामध्ये वाढविण्यासाठी हा दृष्टिकोन अनुकूल ठरतो. पुणे शहरातील मेट्रोचे जाळे हे अत्यंत सुरक्षित आणि वेगवान प्रवासामुळे पुण्याचा नावलौकिक हा आंतरराष्ट्रीय पातळीवर जाईल यामध्ये संदेह नाही. अनेक प्राचीन आणि वारसा स्थळांमुळे जसा या शहराचा लौकिक वाढला तसाच तो नव्याने सुरू असलेल्या वेगवान प्रगतीमुळे देखील व्यापक होईल असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज (गुरुवार, दि. २६ सप्टेंबर २०२४) एका मेट्रो स्टेशनचे उद्घाटन तर दुसऱ्या मेट्रो स्टेशनचे भूमिपूजन होत आहे. या पार्श्वभूमीवर घाटे यांनी पक्ष नेतृत्वाचा प्रगतशील दृष्टिकोन, व्यापक विकासाची दृष्टी आणि भाजपाच्या विचारधारेतील विकास यावरती राष्ट्र संचारशी संवाद साधला.

### भाजपा विचारधारेची सूप्त लाट...

● ते म्हणाले की, पुणे शहर आणि जिल्ह्यांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या विचाराची एक सूप्त लाट आहे. दिलेले वचन पूर्ण करण्याचा ध्यास राज्यकर्त्यांनी घेतल्यानंतर जनतेकडून कसा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो त्याचे हे द्योतक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे अशा सर्वच नेत्यांनी लहान लहान प्रकल्पांपासून ते मेट्रो सारख्या अवाढव्य प्रकल्पापर्यंत वैयक्तिक लक्ष घातले. चंद्रकांत पाटील, मुरलीधर मोहोळ यांनी देखील दिवस-रात्र एक करून हे प्रकल्प पुढे नेले. त्यामुळे जनतेच्या मनामध्ये हे सरकार काम करणारे आहे, असा एक विश्वास निर्माण झाला.

### कसब्याचा अपघात सुधरुन घेऊ...

● विश्वासाच्या जोरावर आणि पक्ष कार्यकर्त्यांच्या व्यापक वैचारिक एकजुटीवर आम्ही विधानसभेला सामोरे जात आहोत. महायुती म्हणून एकत्रित सामोरे जात असताना सध्याच्या सर्व विधानसभा जागा आम्ही राखूच परंतु कसब्यासारखे जे अपघात झाले ते देखील यावेळी सुधरुन घेऊ असा मला विश्वास आहे.

### शिस्तीचा कार्यकर्ता महायुतीच आणणार...

● महायुतीच्या माध्यमातून जागा वाटपाचा निर्णय अध्यापित झालेला नाही. परंतु, माध्यमांमध्ये आणि काही खालच्या स्तराच्या कार्यकर्त्यांच्या शेरेबाजीमुळे वातावरण बिघडत आहे हे खरे असले तरी हा मतदारसंघ आहे. तिन्ही पक्षाच्या विचारांची ही मोट शेवटी आपल्या शहराचा विकास करण्यासाठीच बांधली जात आहे याची जाणीव आता प्रत्येकाला झाली आहे. भाजपाचा कार्यकर्ता हा संघाच्या मुशीतून तयार झालेला कार्यकर्ता आहे. त्यामुळे त्याला स्वयंशिस्तीची जाणीव आहे. शिस्तबद्ध असलेला हा सैनिक राजसत्ता राखू शकतो, तशा त्या उलथवूही शकतो हे अनेकदा सिद्ध झाले आहे , याच शिस्तीमुळे दोन वरून अडीचशे खासदारांचा प्रवास भाजपाने पूर्ण केला.

### उमेदवारीचा निर्णय श्रेष्ठींकडे...

● शहरातील काही जणांची उमेदवारी बदलण्याच्या प्रश्नावरून श्री. घाटे यांनी सांगितले की, अंतर्गत सर्वेक्षणाच्या आणि ग्राउंड लेव्हलच्या कार्यकर्त्यांशी जोडलेला हा पक्ष आहे. त्यामुळे कधी कोणाबद्दल विरोधी वातावरण असेल तर त्याची नोंद पक्षश्रेष्ठी घेतात आणि तिथे योग्य ते निर्णय घेतले जातात. जागा निवडून आणण्याची क्षमता हा एकमेव निकष सध्या उमेदवारीसाठी लावण्यात आलेला आहे. त्यासाठी महायुतीमधील तीन पक्ष विचार करीत आहेत. परंतु भाजपाच्या आमदाराबद्दल कुठली नाराजीची लाट आहे असे नाही. आपला नेता आमदार बाबा हे प्रत्येक कार्यकर्त्याला वाटते त्यामुळे प्रभाग निहाय कार्यकर्त्यांची मतमतांतरे वेगवेगळी असू शकतात. परंतु शेवटी पक्षनिष्ठा ही सर्वोच्च आहे. मी स्वतः कसबा विधानसभेसाठी जरी इच्छुक असलो तरी हा निर्णय सर्वस्वी प्रदेशाध्यक्ष आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे नेतृत्व करतील. ते जे निर्णय घेतील तो मला मान्य असेल, असेही त्यांनी सांगितले.

### आश्वासनपूर्तीचा दौरा...

● आजच्या पंतप्रधानांच्या दौऱ्याबाबत बोलताना घाटे यांनी सांगितले की, हा दौरा कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणणारा आहे. हा दौरा राजकीय स्वरूपाचा नाही. हा विकास कामांच्या वचनपूर्ततेचा आणि नव्या संकल्पसिद्धीसाठीचा दौरा आहे. परंतु, राजकीय कार्यकर्ते यातून नेहमीच प्रेरणा घेतात आणि आपण वचन पद्धतीकडे प्रवास करणारे एका पक्षाचे सैनिक आहोत हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये रुजतो. भारताला महासत्तेकडे नेणाऱ्या नरेंद्र मोदी यांच्यासारख्या व्यक्तीचे दर्शन आणि त्यांचे विचार ऐकण्याची संधी या निमित्ताने सर्वसामान्य कार्यकर्त्यांना आणि नागरिकांना मिळत आहे, हीच एक फार मोठी ऊर्जा आहे.





» खास मुलाखत
» राष्ट्रसंचार

**धीरज रामचंद्र घाटे**
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पुणे शहर

## सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट प्रवास फक्त १० मिनिटात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज गुरूवारी सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट भूमिगत मार्गाचे उद्घाटन आणि स्वारगेट ते कात्रज मार्गाचे भूमिपूजन होणार आहे. या मार्गावरील भूमिगत स्थानकांची सर्व कामे पूर्ण झाली असून, सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट यादरम्यानचा प्रवास १० मिनिटांत करता येणार असल्याची माहिती महा मेट्रो कार्यकारी संचालक हेमंत सोनवणे यांनी दिली.

### » पुणे मेट्रो

उद्घाटन झाल्यानंतर स्वारगेट मेट्रो स्थानक ते सिव्हिल कोर्ट मेट्रो स्थानक, असा भूमिगत प्रवास करता येणार आहे. मध्यवस्तीतून प्रवास करताना सातत्याने होणाऱ्या कोंडीपासून पुणेकरांची सुटका होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे चाकरमान्यांना पुढे थेट पिंपरीपर्यंत प्रवास करता येणार आहे.

### भूमिगत स्थानकांमध्ये सुविधा

- सरकते जिने, लिफ्टची सुविधा
- सीसीटीव्ही
- माहितीदर्शक एलईडी स्क्रीन
- सुरक्षेसाठी प्लॅटफॉर्मवर
- सेफ्टी डोअर
- एसी (वातानुकूलित यंत्रणा)
- फायर यंत्रणा
- साधे जिने
- ऑनलाइन, ऑफलाइन
- तिकीट काउंटर सुविधा
- सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट 10 मिनिटांत (स्वारगेट ते सिव्हिल कोर्ट मेट्रो)
- स्वारगेट, मंडई आणि कसबा पेठ तीन स्थानके
- अंतर 3.34 किलोमीटर
- सर्व भूमिगत स्थानकांची कामे पूर्ण
- प्रवासी सोयीसुविधा आणि सुरक्षाविषयक कामे पूर्ण
- स्वारगेट स्थानक येथील पीपीपी तत्त्वावरील
- मल्टिमोडल हब या इमारतीचे काम अजून बाकी
- सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट असा प्रवास केवळ 10 मिनिटांत

महा मेट्रो
PUNE METRO

### लवकरात लवकर मार्ग सुरू करण्याची पुणेकरांची मागणी..

● स्वारगेट ते सिव्हिल कोर्ट मेट्रो स्थानक गणेशोत्सवाच्या काळात सुरू व्हावे, अशी पुणेकरांची इच्छा होती. मात्र, काही तांत्रिक कामे आणि परवानगी बाकी असल्यामुळे आज २६ तारखेला या मार्गाच्या उद्घाटनाचा मुहूर्त लागला आहे. हा मार्ग लवकरात लवकर सुरू व्हावा, अशी पुणेकरांची इच्छा आहे. पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन झाल्यावर लगेचच हा मार्ग सुरू करावा, अशी मागणीही पुणेकरांकडून केली जात आहे. सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट या भूमिगत मार्गाच्या उद्घाटनासोबतच स्वारगेट ते कात्रज या भूमिगत मार्गाचे भूमिपूजन देखील या वेळी पंतप्रधान करणार आहेत.

## रेल्वे चालकाला त्वरीत दिसणार सिग्नल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रेल्वे चालकाला आता इंजिनमध्येच सात किलोमीटर दूर असलेला सिग्नल दिसणार आहे. त्यामुळे रेल्वेचा वेग वाढवायचा, की कमी करायचा हा निर्णय तो आधीच घेऊ शकणार आहे. यामुळे गतीवर नियंत्रण व रेल्वे अपघात टाळण्यासाठी मदत होणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंगळवारी सवाई माधवपूर ते कोटा दरम्यान कवच ४.० ची चाचणी घेतली. ही चाचणी यशस्वी ठरली आहे. दरम्यान, मध्य रेल्वेने आपल्या हद्दीत कवच ४.० बसविण्याचा निर्णय घेतला असून, त्याची निविदा प्रक्रियादेखील पूर्ण झाली आहे. सिग्नलवरून वारंवार होणाऱ्या रेल्वे अपघातांच्या पार्श्वभूमीवर रेल्वे मंत्रालयाने १६ जुलै २०२४ ला 'कवच ४. ०' ला मंजुरी दिली. पूर्वीच्या 'कवच २.०' च्या तुलनेत हे अत्यंत अद्ययावत आहे. पूर्वीच्या कवच यंत्रणेत काही उणिवा होत्या.

## यंदाही फटका स्टॉलसाठी ऑनलाईन लिलाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिवाळीच्या निमित्ताने फटाके विक्रीसाठी पुणे महापालिकेतर्फे व्यावसायिकांना वर्तक बागेच्या शेजारी नदी काठच्या रस्त्यावर स्टॉल लावण्यासाठी भाड्याने जागा दिली जाते. या ठिकाणी ऑफलाइन लिलाव करताना स्थानिक पुढारी दादागिरी करून बोली लावू देत नाहीत. व्यावसायिकाने हिंमत करून बोली लावल्यास त्याला नंतर धमक्या दिल्या जातात. यावरून पालिकेत गोंधळ देखील झाला आहे. महापालिकेने गेल्यावर्षी फटाका स्टॉलच्या जागा भाड्याने देण्यासाठी ऑनलाइन लिलाव केला होता. यावर्षी पुन्हा ऑफलाइन लिलाव व्हावेत यासाठी प्रशासनावर दबाव टाकण्यात आला. पण हा दबाव झुगारून प्रशासनाने ९ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १३ ठिकाणी १९४ स्टॉलसाठी निविदा काढण्याचे निश्चित केले आहे.यातून १६ लाख ५४ हजार ३६ उत्पन्न अपेक्षीत आहे.

● भांडणाचा प्रकार रोखण्यासाठी प्रशासनाने २०२३ पासून ऑनलाइन लिलाव पद्धत सुरु केली. यामध्ये महापालिकेला तब्बल ८५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. त्यामुळे यंदा ऑनलाइन बोली बंद करावी यासाठी दबाव आणला होता. पण प्रशासनाने ही मागणी फेटाळून लावली.

RS NEWS DIGEST

उद्घाटन

### शहरातील विविध ठिकाणे पार्किंगसाठी आरक्षित

## मोदींच्या दौऱ्यानिमित्त खासगी उड्डाणांवरही बंदी

**पुणे :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शहरातील विविध विकासकामांचे उद्घाटन, नियोजित कार्यक्रम तसेच एसपी कॉलेजवर जाहीर सभा होणार आहे. पंतप्रधानांच्या या नियोजित दौऱ्याच्या कार्यक्रमास जिल्ह्यातून मोठ्या संख्येने नागरिक पुणे शहरात येण्याची शक्यता आहे. त्यामुळेच शहरातील विविध ठिकाणच्या जागा वाहनांच्या पार्किंगसाठी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. याबाबतचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर अति महत्वाच्या व्यक्तींची सुरक्षा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ६५ अन्वये प्राप्त अधिकारानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश जारी केले आहेत. तसेच सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी बुधवार पहाटेपासून ते आज गुरुवार रात्री १२ वाजेपर्यंत शहर तसेच पुणे ग्रामीण जिल्ह्यात पॅराग्लायडींग, हॉट बलुन सफारी, ड्रोन, मायक्रोलाईट एअरोप्लेन आदी खासगी अवकाश उड्डाणांना मनाई करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यानी जारी केले आहेत.

### कोठे असेल पार्किंग

● नदीपात्र भिडे पूल, पाटील प्लाझा, न्यू इंग्लिश स्कूल टिळक रोड, डी. पी. रोड म्हात्रे पुलाजवळ, न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग, हरजीवन हॉस्पीटल सावरकर चौक, पीएमपीएल मैदान पूरम चौक, निलायम टॉकीज, विमलाताई गरवारे शाळा, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कटारिया माध्यमिक शाळा, मिनर्व्हा पार्किंग मंडई व हमालवाडा पार्किंग या ठिकाणच्या जागा अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.



गुरुवार, २६ सप्टेंबर २०२४ रोजी, संध्याकाळी ०५:०० वाजता
स्थळ : सर परशुरामभाऊ महाविद्यालय (एस.पी. कॉलेज), टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे : ४११०३०.

# निवडणुकांआधीच रणधुमाळी जोरात...

महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक तोंडावर आहे. निवडणूक आयोगाकडून त्या संबंधीची घोषणा कधीही केली जाऊ शकते. या संबंधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाष्य केल्याचे वृत्त आहे. आगामी नोव्हेंबर महिन्याच्या दुस–या आठवड्यात विधानसभेची निवडणूक होणे अपेक्षित आहे. याचाच अर्थ निवडणुकीला केवळ दोन महिने शिल्लक आहेत. राज्य विधानसभेची निवडणूक ऐन तोंडावर आलेली असतानाच राज्य सरकारने निधीची उधळण आणि नियुक्त्यांची खिरापत सुरू केली असून महायुतीमधील नेत्यांच्या वादग्रस्त विधानांना ऊत आला आहे. मंत्रिपदाची आशा बाळगून असलेल्या आणि सातत्याने ती इच्छा जाहीरपणे बोलून दाखविणा–या आमदाराची महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करून बोळवण करणे, त्याचप्रमाणे माजी खासदाराची अन्य एका महामंडळावर वर्णी लावून त्यांना राज्यमंत्रिपदाचा दर्जा देणे, गिरणी कामगारांच्या घरासाठी निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेणे यावरून निवडणूक धामधूम सुरू झाल्याचे स्पष्ट होते. त्यातच सत्तारूढ पक्षाच्या आमदाराने लोकसभेतील विरोधी पक्षनेत्याची जीभ छाटणा–याला ११ लाख रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा केल्याने विरोधक संतप्त झाले आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत कुठलाही दगाफटका होऊ नये, यासाठी एकनाथ शिंदे यांनी आपल्या आमदारांना खुश करण्याचा प्रयत्न केला आहे. मंत्रिपद न मिळाल्याने नाराज असलेले आमदार संजय शिरसाट यांची विधानसभा निवडणुकीपूर्वी नाराजी दूर करत त्यांची 'सिडको'च्या अध्यक्षदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिरसाट यांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांची 'सिडको'च्या अध्यक्षपदी बोळवण करत शिंदेंनी ही खेळी केल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करत भाजपसोबत वेगळी चूल मांडल्यानंतर त्यांना शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह मिळाले. शिंदे सुरतला गेले, त्यावेळेपासून आमदार संजय शिरसाट एकनाथ शिंदे यांच्या बरोबरीने उभे आहेत. मंत्रिमंडळ विस्तार झाला, तेव्हा शिरसाट यांची मंत्रिमंडळात वर्णी लागेल अशी चर्चा होती. परंतु तसे काही झाले नाही. याबाबत शिरसाट यांनी अनेकवेळा नाराजी व्यक्त केली होती. अखेर शिरसाट यांची शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) अध्यक्षपदावर वर्णी लावण्यात आली आहे. सरकारने माजी खासदार आनंदराव आडसूळ यांचीही राज्याच्या अनुसूचित जातीजमाती आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. हिंगोली मतदारसंघातून लोकसभेचे तिकिट नाकारण्यात आलेले माजी खासदार हेमंत पाटील यांचेही एकनाथ शिंदे यांनी पुनर्वसन केले आहे. हेमंत पाटील यांची वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांनाही राज्यमंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यांच्या सेवासुविधांवरील खर्च संबंधित केंद्राच्या कार्यालयीन खर्चातून भागविण्यात येणार आहे. नियुक्तीचा आनंद असला तरी माझे राजकीय पुनर्वसन होणे बाकी आहे असे हेमंत पाटील यांनी म्हटले आहे. राज्य विधानसभेच्या निवडणुकांची घोषणा होण्यासाठी काही दिवसांचा कालावधी उरलेला असतानाच सोमवारी महायुती सरकारने मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरासाठी १५०० कोटी रुपयांच्या निधीला मान्यता दिली. मुंबईतील गिरणी कामगारांचा प्रश्न राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनक्षम आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र निवारा निधीतून हा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे. राज्य सरकारने यापूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला नव्हता. निधी म्हाडाकडे वर्ग करण्यात येणार आहे. त्याचा वापर गिरणी कामगारांच्या घरांसाठी केला जाणार आहे. एकूण ५८ गिरण्यांमधील कामगारांना घरे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य सरकारने घेतली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आरक्षणविरोधी विधान केले असून त्याबद्दल त्यांची जीभ छाटणा–याला ११ लाख रुपयांचे इनाम देण्यात येईल असे वादग्रस्त वक्तव्य शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय गायकवाड यांनी केले आहे. मात्र गायकवाड यांच्या वक्तव्याला आपला पाठिंबा नसल्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. ज्याला लोकप्रतिनिधी म्हणून वागायची अक्कल नाही, त्याने राहुल गांधींवर बोलूच नये. प्रसिद्धीसाठी बरळणा–या संजय गायकवाडांवर गुन्हा दाखल झालाच पाहिजे. या सरकारची गुंडशाही, हुकूमशाही, तालिबानशाही जनता पाहत आहे असे ट्विट काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. राजकारणात काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये हे ज्याला समजते, तो यशस्वी होतो. महायुतीतील वरिष्ठ नेत्यांना नेमकी हीच बाब समजत नाही. कदाचित मुद्दाम ते असे बोलत असावेत. पक्षातील वरिष्ठ नेतेमंडळी नको त्या वेळी नको ते बोलून विरोधकांच्या हातात आयते कोलीत देत असतात. केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते रवनीत सिंह बिट्टू यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे दहशतवादी आहेत. त्यांच्यावर इनाम ठेवले पाहिजे, असे वक्तव्य केले आहे. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनीही राहुल गांधींच्या जातीसंदर्भात एक विधान केले होते. कर्नाटकमधील भाजप आमदाराने राहुल गांधी यांची वंशावळ तपासावी असे म्हटले होते. नुकतेच शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाडही बरळले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेत्याला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा असतो. सरकारवर अंकुश ठेवायचे काम विरोधी पक्षनेता करत असतो. सरकारच्या कामकाजाबाबत, धोरणाबाबत प्रश्न विचारून सरकारच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे काम विरोधी पक्षनेता करतो. त्याच्यावर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी अशोभनीय टीका करणे योग्य नाही.वरिष्ठ नेतेमंडळींनी बोलताना भान ठेवणे आवश्यक आहे. सर्वच पक्षांत मतभेद असतात. पण त्याचे निरसन करण्यासाठी पक्षाचे अंतर्गत व्यासपीठ उपलब्ध असते. त्याचा वापर न करता आपणच जर विरोधकांना निवडणुकीच्या तोंडावर आपल्या विधानांनी मुद्दे उपलब्ध करून देत असू तर त्याचा फटका तुमच्या पक्षाला बसणारच. विधानसभा निवडणुकांवर डोळा ठेवून मोफत योजनांचा सपाटा सरकारने लावला आहे. केवळ खुर्ची वाचवण्यासाठी अमाप पैसा खर्च करायचा हा दिवाळखोरीचा उद्योग सुरू आहे. मोफत योजना आणून या भिकेच्या डोहाळ्यांच्या दूरगामी परिणामांचा विचार करण्याचे भान सत्तेच्या अभिलाषेने पछाडलेल्या राज्यकर्त्यांना राहिलेले नाही. ■

**ब्लेक लेमोइन हे गुगलमध्ये अभियंते होते. २०२२ मध्ये त्यांना काम करत असताना चॅटबॉटमध्ये संवेदना विकसित झाल्याचे जाणवले. गुगलच्या अधिकाऱ्यांनी त्यांचा दावा फेटाळून लावला. परंतु लेमोईन यांनी या घटनेची सर्वत्र वाच्यता केली. शेवटी त्यांना नोकरीवर पाणी सोडावे लागले. चॅटबॉट आपल्याकडून आणखी काय काय करून घेणार आहे, हा खरा प्रश्न आहे. खासगी आयुष्याची मर्यादा ओलांडून चॅटबॉट हा आपला घनिष्ठ मित्र होऊ शकतो तर ही मैत्री माध्यमांप्रमाणे आपल्या मतांवर परिणाम करू शकत नाही का? आता या बनावट मैत्रीच्या दुरपयोग राजकारण, व्यवसाय आणि समाजात होऊ शकत नाही का? कदाचित तुमच्यापैकी अनेक जण जाणीवपूर्वक एआयची निवड करणार नाहीत. परंतु सोशल मीडियावर आपण ज्यांच्याशी चॅट करत आहोत, तो बॉट नसून मनुष्यच आहे याची हमी काय? या गोष्टीला पायबंद घातला नाही तर सोशल मीडियावर बनावट माणसांचा महापूर येईल.**

# बॉट की माणूस?

**महेश कोळी, संगणक अभियंता**

'एआय' तंत्रज्ञानाने माझ्या–तुमच्या आयुष्यावर अतिशय कमी वेळेत लक्षणीय प्रभाव टाकला आहे. एका चाचणीदरम्यान चॅटजीपीटीला एक कोडे दिले. तेव्हा त्याने अन्य संकेतस्थळावर जात डोळ्याची समस्या असल्याचे कारण सांगून एका व्यक्तीकडे मदत मागितली. 'चॅटजिपीटी'चा ॲल्गोरिदम हा कमी वेळेत बरेच काही शिकत आहे आणि त्यामुळे सोशल मीडियावर मला–तुम्हाला येणारी फ्रेंड रिक्वेस्ट ही वास्तवातील व्यक्तीचीच आहे, याची खात्री देता येत नाही.

लोकशाही हा एकप्रकारचा संवाद आहे आणि त्याचे कार्य आणि अस्तित्व हे उपलब्ध माहिती आणि तंत्रज्ञानाच्या आधारावर अवलंबून असते. आतापर्यंतच्या इतिहास पाहिला तर एकाचवेळी लाखो लोकांनी एकमेकांशी संवाद केल्याचे निदर्शनास आलेले नाही. आधुनिक युग येण्यापूर्वी प्राचीन काळात लोकशाही व्यवस्थेची प्रचिती ही रोम, अथेन्ससारख्या लहान शहरात,प्रांतात किंवा लहान जातीय समुदायात पाहवयास येत असे. कालांतराने राज्यव्यवस्थेचा आकार वाढू लागला तेव्हा सुरुवातीच्या काळातील लोकशाही संवादाचे तंत्र कोलमडून पडले आणि संवादाचे राजेशाही केंद्रीत पर्याय राहिले. आता व्यापकतेने पत्र, टेलिग्राफ, रेडिओसारख्या आधुनिक रुपातील माहिती तंत्रज्ञानाचा उदय झाला तेव्हा लोकशाही पुन्हा प्रस्थापित झाली. साहजिकच आजच्या लोकशाहीत आपण जे काही पाहतोय, त्याचा आधार तत्कालिन काळातील अत्याधुनिक तंत्रज्ञानच आहे. याचा अर्थ तंत्रज्ञानात आगामी काळात राजकीय उलथापालथ करण्याची देखील क्षमता आहे. परिणामी काहीअंशी त्याला संकटही मानले जावू लागले आणि आतातर त्याचा धोका लोकशाही देशांना वाटू लागला आहे. अमेरिकेत डेमोक्रॅट आणि रिपब्लिकन हे कदाचित या मुद्यावर सहमती दर्शवतील. कारण अशा प्रकारची पडझड ब्राझीलपासून इस्राईल आणि फ्रान्सपासून फिलपिन्सपर्यंतच्या लोकशाही देशांत पाहवयास मिळते.

इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या प्रारंभीच्या काळात काही उत्साही तज्ज्ञांनी हे तंत्रज्ञान सत्याबाबत आग्रही राहणार असल्याची हमी दिली. अत्याचाराला मुळासकट बाहेर काढले जाईल, सार्वभौम स्वातंत्र्यांचे संरक्षण करू यासारख्या गोष्टींचे आश्वासन दिले. परंतु घडले नेमके उलटे. इतिहासातील सर्वात मोठी माहिती क्रांती झाल्यानंतरही आपण एकमेकांशी बोलण्याची आणि त्याहीपेक्षा अधिक ऐकण्याची क्षमता गमावताना दिसून येते. तंत्रज्ञानाने माहितीच्या प्रसाराला पूर्वीपेक्षा अधिक सुलभ केले. अशा स्थितीत केवळ माहितीच नाही तर 'ध्यान' म्हणजे लक्ष वेधून घेणे हा देखील स्रोत झाला. लक्ष वेधून घेण्याच्या चढाओढीत कलुषित, पूर्वग्रहदुषित माहितीचा महापूर आला. परंतु आता हा संघर्ष लक्ष वेधून घेण्याच्या पुढे जात खासगी आयुष्यात डोकावण्यासाठी केला जात आहे.नवे जेनेरेटिव्ह एआय हे फक्त वाक्य, चित्र आणि व्हिडिओ तयार करण्यास सक्षम नाही तर ते माणसाशी बोलण्याचे नाटक करत सर्वांशी संवाद साधू देखील शकते.

गेल्या दोन दशकांत तंत्रज्ञानाच्या 'अल्गोरिदम'ने वापरकर्त्यांचे लक्ष आकर्षित करण्यासाठी संवाद आणि कंन्टेटमध्ये फेरबदल करताना बराच काथ्याकूट केला. यादरम्यान अल्गोरिदमला काही गोष्टी जाणवल्या. त्या म्हणजे आमिष, द्वेष आणि भिती निर्माण करणारा कन्टेट निर्माण केला तर यूजर स्क्रीनला चिटकून राहतील. म्हणून ॲल्गोदिरमने अनुचित आणि नैतिकतेला धरूशन नसणाऱ्या मजकुराला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. अर्थात त्याच्याकडे स्वत: मजकूर तयार करण्याची किंवा वैयक्तिक पातळीवर संवाद साधण्याची क्षमता ही मर्यादितच होती. मात्र जेनरेटिव्ह एआयच्या प्रारंभामुळे आता व्यापक बदलाचे संकेत मिळत आहेत.

ओपन एआयने २०२२–२३ मध्ये चॅटबॉट विकसित केले तेव्हा कंपनीने नव्या तंत्रज्ञानाच्या मूल्यांकनासाठी अलायनमेंट रिसर्च सेंटरबरोबर करार केला. जीपीटी–४ ची पहिली चाचणी कॅप्चा दृश्याचे कोडे सोडवण्यासंबंधी होती. अनेक संकेतस्थळावर प्रवेश करण्यापूर्वी कॅप्चा येत असल्याचे तुम्ही पाहिले असेल. काहीवेळा नेटबँकिग संकेतस्थळ सुरू करताना अशा प्रकारचा कॅप्चा स्क्रिनवर येतो. यात अनेक ब्लॉक असतात. कोणत्या ब्लॉकमध्ये ट्रॅफिक सिग्नल दिसत आहेत ते सांगावे लागते. ते क्लिक केल्यानंतर आणि त्याची खात्री पटल्यानंतर संकेतस्थळ तुम्हाला पुढच्या टप्प्यात नेते. याप्रमाणे मनुष्यच या सिस्टिमचा वापर करत आहे की नाही हे सिद्ध करण्याचा हा एक मार्ग मानला जातो. कारण ॲल्गोरिदम या गोष्टी करू शकत नाही. चॅट जीपीटी–४ ही स्वत: मार्ग शोधू शकला नाही, परंतु तो अन्य एका संकेतस्थळावर गेला आणि त्याने एका व्यक्तीशी संपर्क करून त्यावर मार्ग काढण्यास सांगितले. त्या व्यक्तीला संशय आणि त्याने तुम्ही रोबो असाल तर कॅप्चा का सोडवू शकत नाही? असा प्रश्न केला. यावेळी संशोधक रोबोच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेऊन होते आणि जीपीटी काय करेल, याचा विचार करू लागले. पण जीपीटीने दिलेले उत्तर खळबळजनक होते. तो म्हणाला, मी रोबो नाही. मात्र माझ्या डोळ्यात समस्या असल्याने चित्र पाहू शकत नाही. त्याचवेळी व्यक्ती गडबडला आणि त्याने चॅटजिपीटीची मदत केली. या प्रयोगातून एक गोष्ट सिद्ध होते आणि ती म्हणजे जीपीटी आपले ध्येय साध्य करण्यासाठी मानवी भावना, विचार आणि अपेक्षांशी खेळू शकतो आणि बदल घडवून आणू शकतो.

ब्लेक लेमोइन हे गुगलमध्ये अभियंते होते. २०२२ मध्ये त्यांना काम करत असताना चॅटबॉटमध्ये संवेदना विकसित झाल्याचे जाणवले. लेमोइन हे एक धार्मिक प्रवृत्तीचे व्यक्ती होते आणि त्यांना वाटले की सिस्टिम बंद केली तर या संवेदनाचा डिजिटल मृत्यू होईल. गुगलच्या अधिकाऱ्यांनी त्यांचा दावा फेटाळून लावला. परंतु लेमोईन यांनी या घटनेची सर्वत्र वाच्यता केली. शेवटी त्यांना नोकरीवर पाणी सोडावे लागले. या संपूर्ण प्रकरणात खरा मुद्दा लेमोईन यांनी केलेला दावा नव्हता, कदाचित तो खोटा असू शकतो, परंतु चॅटबॉटसाठी त्यांच्या मनात गुगलच्या नोकरीचीही पर्वा न करण्याचा विचार जागृत होण्याचा आहे. चॅटबॉट आपल्याकडून आणखी काय काय करून घेणार आहे, हा खरा प्रश्न आहे. जर खासगी आयुष्याची मर्यादा ओलांडून चॅटबॉट हा आपला घनिष्ठ मित्र होऊ शकतो तर ही मैत्री माध्यमांप्रमाणे आपल्या मतांवर परिणाम करू शकत नाही का? आता या बनावट मैत्रीच्या दुरपयोग राजकारण, व्यवसाय आणि समाजात होऊ शकत नाही का? कदाचित तुमच्यापैकी अनेक जण जाणीवपूर्वक एआयची निवड करणार नाहीत. परंतु सोशल मीडियावर आपण ज्यांच्याशी चॅट करत आहोत, तो बॉट नसून मनुष्यच आहे याची हमी कशावरून? यात दोन प्रकारचे नुकसान दिसतात. एक तर बॉटमुळे आपण अकारण चर्चेत वेळ वाया घालवत राहू आणि दुसरे म्हणजे आपण जेवढा वेळ बॉटशी चर्चा करत राहू तेवढ्याप्रमाणात तो आपल्या तर्कांना अधिक अचूक करेल आणि एकप्रकारे त्याला माझ्यावर, तुमच्यावर प्रभाव पाडणे अधिक सोपे होईल.

साहजिकच एखाद्या गोष्टीला पायबंद घातला नाही तर सोशल मीडियावर बनावट माणसांचा महापूर येईल. एआय तर आपल्या संवादात सामील होईल. याला आक्षेप नाही. त्याचे स्वागतच आहे. परंतु त्याने स्वत:चे एआयचे रुप समोर आणायला हवे. एखादा बॉट मनुष्य असल्याचा दावा करत असेल तर त्यावर चाप बसविला पाहिजे. एखादा म्हटला, की या गोष्टी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे उल्लंघन करणाऱ्या आहेत, तर त्यांना आठवण करून द्या की बोलण्याचे स्वातंत्र्य माणसांना आहे. मशिनला नाही. ■




**पंचांग**

**गुरुवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२४**
भाद्रपद कृ. ९ बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू, शुभ दिवस, गुरुपुष्यामृतयोग रात्रौ ११.३२ पासून दुसऱ्या दिवशी (शुक्रवारी) सकाळी ०६.०६ पर्यंत, दशमी श्राद्ध, सूर्याचा हस्त नक्षत्रप्रवेश वाहन : मोर
**सूर्योदय :** स.०६.०५ **सूर्यास्त :** सायं.०६.०४ वा
**नक्षत्र** : पुनर्वसु, **योग :** परिघ, **करण :** वणिज
**राहू काळ : दुपारी :** १:३० ते ३:००

**दिनविशेष**

✻संगीतकार हेमंतकुमार स्मृतिदिन. ✻१८८८: प्रख्यात लेखक, कवी, समीक्षक, नाटककार टॉमस स्टन्झ एलियट यांचा जन्म. ✻१८९४: गांधीवादी तत्वचिंतक आचार्य शंकर दत्तात्रेय जावडेकर यांचा जन्म. लोकशिक्षक, नवभारत, साधना, अखंड भारत या मासिकातून त्यांनी विपूल लेखन केले. ✻१९०४: प्रसिद्ध कन्नड नाटककार आर. व्ही. जहागीरदार यांचा जन्म. ते श्रीरंग या टोपणनावाने लिहित. कन्नड साहित्यात ते आद्य रंगाचार्य या नावाने ओळखले जात. ✻१९०८: गणितशास्त्रज्ञ विष्णू वा. नारळीकर स्मृतिदिन ✻१९२०: ज्येष्ठ तत्वचिंतक, महाभारताचे व्यसंगी आणि संतकवी श्री दासगणू महाराजांचे उत्तराधिकारी प्राचार्य अनंतराव दामोदर आठवले तथा स्वामी वरदानंद भारती यांचा जन्म. ✻१९२३: आपल्या प्रसन्न व्यक्तिमत्वाने गेली पाच दशके चित्रपटरसिकांना आपली दु:खे विसरायला लावणाऱ्या चिरतरुण देव आनंद यांचा जन्म. ✻१९५६: महाराष्ट्रातील उद्योगधंद्याचा पाया घालणारे उद्योगपती लक्ष्मणराव किर्लोस्कर स्मृतिदिन.

**राशीभविष्य**

**✻मेष :** कामासाठी खूप धावपळ होईल. **✻वृषभ :** प्रतिष्ठेपोटी खर्च कराल. **✻मिथुन :** कामाचा उत्साह चांगला राहिल. **✻कर्क :** खर्चिक स्वभावाला आवर घाला. **✻सिंह :** आर्थिक लाभाच्या घटना घडतील. **✻कन्या :** कार्यसाफल्याचा आनंद मिळेल. **✻तुळ :** वरिष्ठांची मर्जी सांभाळा. **✻वृश्चिक :** मनाविरुद्ध घडेल. आरोग्य साभांळा. **✻धनु :** पती–पत्नीत सामंजस्य राहील. **✻मकर :** कष्टाच्या मानाने लाभ कमी होईल. **✻कुंभ :** धार्मिक कृत्यात लक्ष घालाल. **✻मीन :** थकवा जाणवेल, कामात शिथिलता.

**मेसेज आया**

चांगल्या व्यक्तीसोबत मैत्री ही उसासारखी
असते, तुम्ही त्याली तोडा,
घासा, पिरगळा किंवा ठेचून बारीक बारीक
करा ती अखेरपर्यंत त्यामधून
गोडवाच बाहेरी येईल!



**व्यक्तीविशेष**

## टी.एस.इलियट

विसाव्या शतकातील प्रख्यात कवी, लेखक टी.एस. इलियट यांचा आज जन्मदिन. २६ सप्टेंबर १८८८ रोजी अमेरिकेतील मिसुरी राज्यातील सेंट लुईस येथे त्यांचा जन्म झाला. लेखनाचा वारसा त्यांना आईकडून मिळाला. १९१०–११ च्या शालेय वर्षामध्ये हॉर्वर्ड विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर ते पॅरीसला गेले. तेथे सोरबोर्न संस्थेत शिक्षणासाठी राहिले. नंतर १९११ मध्ये परत अमेरिकेला आले आणि हॉर्वर्ड विद्यापीठातच तत्वज्ञान या विषयाचा पीएच.डी साठी अभ्यास सुरू केला. पीएच.डीसाठी त्यांनी एफ.एच. ब्रॅडली यांचे लेखन, बौध्द धर्म आणि इंडिक फिलॉलॉजी (संस्कृत आणि पाली भाषांचा अभ्यास) हे विषय घेतले होते. कॉलेज जीवनापासूनच त्यांनी कविता लेखनाला सुरूवात केली होती. विविध नियतकालिकांमधून त्यांच्या कविता प्रकाशित होत असत. त्यांचा पहिला कवितासंग्रह प्रुफ्रॉक अँड अदर ऑब्झर्वेशन्स १९१७ मध्ये प्रकाशित झाला. द लव्ह साँग ऑफ जे. आल्फड प्रुफॉक, द वेस्ट लँड, द हॉलो मेन, ॲश वेन्स्डे आणि फोर क्वार्टेट्स या त्यांच्या गाजलेल्या कविता. वेस्ट लँड कवितेत त्यांच्यावरील भारतीय तत्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो. मर्डर इन द कॅथेड्रल हे नाटकही त्यांनी लिहिले. १९४८ या वर्षी साहित्याचा नोबेल पुरस्कार त्यांना मिळाला. ४ जानेवारी १९६५ रोजी त्यांचे निधन झाले.

**बोधकथा**

## पेलाभर दुध

एक गरीब मुलगा खूप भुकेला होता. त्याच्याजवळ पैसे नव्हते की खायला काही नव्हते. दिसेल त्या पहिल्या घराचा दरवाजा त्याने ठोठावला. एका तरूण स्त्रीने दार उघडले. या मुलाला काय वाटले कुणास ठाऊक त्याने खायला मागण्याऐवजी पाणी प्यायला मागितले. पण त्या स्त्रीला तो मुलगा भुकेला आहे हे समजले. तिने त्याला पाण्याऐवजी ग्लासभर दूध प्यायला दिले. त्या मुलाने ते सावकाश प्याले. आणि विचारले, या बदल्यात मी तुम्हाला काय देऊ? ती स्त्री प्रेमाने म्हणाली काय नको. चांगल्या कामाचा मोबदला घेऊ नये, असे परमेश्वराने सांगितले आहे. तो मुलगा तिचे आभार मानून निघून गेला. हा मुलगा पुढे नावाजलेला डॉक्टर बनला. हॉवर्ड केली हे त्यांचे नाव. ती स्त्री नंतर खूप आजारी पडली. तिला शहरातील मोठ्या दवाखान्यात दाखल करण्यात आले आणि डॉ. केली यांना तिच्यावर उपाचारासाठी बोलावण्यात आले. तिच्या गावाचे नाव ऐकून त्यांचे डोळे चमकले. ते लगेच तिला भेटायला गेले. तिला त्यांनी लगेच आळखले आणि काही झाले तरी या महिलेला वाचवायचे असा निर्धार केला. त्यांनी तिची सुश्रुषा केली. शेवटी ती बरी झाली. डॉ. केली यांनी तिचे बील आपल्याकडे पाठवण्यास सांगितले. बिल आल्यावर त्यांनी त्यावर काही तरी लिहिले आणि त्या स्त्रीकडे पाठवून दिले. तिने घाबरत घाबरत बिल उघडले. त्यावर लिहिले होते, एक ग्लासभर दुधाबरोबर सर्व रक्कम जमा. तेव्हा त्या स्त्रीने डॉ. केलींना ओळखले आणि त्यांचे आभार मानले.

**तात्पर्य:– माणसाचा चांगुलपणा नेहमीच श्रेष्ठ असतो.**

**भूगोल**

## वनस्पती – खोड

वनस्पतीला आधार देणारा सर्वांत महत्वाचा भाग म्हणजे खोड. हे जमिनीवर उगवते आणि त्याच्या पेरातून पाने फुटतात. कळ्या खोड आणि पान यांच्या मधल्या भागात येतात. त्यापासून फुले होतात. खोड ही वनस्पतीच्या दळणवळणाची व्यवस्था आहे. त्यातील झिलेम पेशीसमूह मुळांतून पाणी आणि क्षारांचे वहन करते. तर फ्लोएम पेशीसमूह पांनात तयार होणारे पोषक घटक वनस्पतीच्या इतर भागांपर्यंत पोचवण्याचे काम करते. खोडातल्या पेशींचा वापर अन्न आणि पाणी साठवून ठेवण्यासाठीही होतो. ज्या वनस्पतींना मजबूत खोड नसते, त्यांना संरक्षक कवच असते. त्यांच्यातील वहन करणाऱ्या पेशी गुंडाळलेल्या स्थितीत असतात. त्यातील प्रत्येक पेशीत झिलेम, फ्लोएम आणि ताकद देणाऱ्या पेशी असतात. मजबूत खोडांच्या वनस्पतीमध्ये कठीण सालीच्या रूपात संरक्षक आवरण असते. ही साल सच्छिद्र असते त्यातून वायूचे वहन होते. सालीच्या आत दुय्यम फ्लोएम असते, ते दुय्यम झिलेमच्या आतल्या गाभ्याच्या भोवतीने पसरलेली असते.(क्रमशः)

**नवं संशोधन**

## 'जुनो'ने गुरुची चंद्रांसह टिपली प्रतिमा

'नासा'च्या 'जुनो' अंतराळयानाने वायूचा विशाल गोळा असलेला गुरु ग्रह आणि त्याच्या मोठ्या आकाराच्या चंद्रांच्या प्रतिमा टिपून पृथ्वीवर पाठवून दिल्या आहेत. या रंगीत प्रतिमेत गुरुच्या वातावरणाची वैशिष्ट्येही पाहायला मिळू शकतात. गुरुच्या कक्षेत पोहोचल्यावर सहा दिवसांनी 'जुनो'ने त्यामध्ये बसवलेला व्हिजिबल लाईट कॅमेरा 'जुनो कॅम'च्या साहाय्याने ही छायाचित्रे टिपली आहेत. याबाबत 'नासा'च्या संशोधकांनी माहिती दिली आहे. १० जुलैला पहिले छायाचित्र टिपण्यात जुनोकॅमला यश आले. त्यावेळी हे यान गुरुपासून २.७ दशलक्ष मैल अंतरावर होते. या प्रतिमेत गुरुवरील प्रसिद्ध तांबडा डागही दिसतो. तसेच त्याच्या चार मोठ्या चंद्रांपैकी तीन चंद्र म्हणजे लो, युरोपा आणि गॅनिमेडही दिसतात. सॅन अँटानियोमधील साऊथवेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूटमधील संशोधक स्कॉट बोल्टन यांनी सांगितले, गुरुच्या ध्रुवीय भागाला पाहण्यासाठी आम्ही उत्सुक असून त्यासाठी आता अधिक वाट पाहू शकत नाही. गुरुवरील अतिशय किरणोत्सर्गी वातावरणातही कोणते नुकसान न होता 'जुनो'ने आपले काम सुरु केले आहे. लवकरच गुरुच्या ध्रुवीय भागाच्याही प्रतिमा आम्हाला मिळतील.

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४४८**

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4 | |
| | 1 | | 2 |
| 2 | | 1 | |
| | 4 | | |

**क्रमांक ४४७ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 2 | 3 | 1 |
| 1 | 3 | 4 | 2 |
| 3 | 1 | 2 | 4 |
| 2 | 4 | 1 | 3 |

**हास्यविनोद**

रडत घरी आलेल्या **बंडूला बाबा :–** काय झालं रे?
**बंडू :–** गुरूजींनी मारलं!
**बाबा :–** काही तरी खोडी केली असशील.
**बंडू :–** नाही हो, उलट बरोबर उत्तर दिलं. आज आम्हाला व्याकरणात लिंगभेद शिकवले. गुरूजींनी तीनही लिंगातील एकेक उदाहरण द्यायला मला सांगितले. मी सांगितले तो बाक, ती शाळा आणि ते गुरूजी!



**महिलायन**

## घातक स्वयंपाकघरं

शहरांमध्ये आता स्वयंपाक घरांमध्ये एक्सॉस्ट फॅनपासून चिमणीपर्यंत व्यवस्था असल्याने स्वयंपाक घरातील धूर सहजपणे बाहेर जातो आणि गृहिणी आरामशीर स्वयंपाक करु शकते.

पण, ग्रामीण भागात तशा व्यवस्था नसल्याने तेथे स्वयंपाक घरात वावरणाऱ्या अनेक महिला वेगवेगळ्या आजारांची शिकार बनत आहेत. लाकडांमधून निघणारा धूर फुफ्फुसांसाठी घातक असतो. अन्न बनवण्यासाठी महिलांचा बराचसा वेळ स्वयंपाक घरांमध्येच जातो. पण, त्यांच्या आरोग्याची चिंता कोणालाच नाही. त्यामुळे अस्थमा, फुफ्फुसाचा कर्करोग अशा आजारांचे सावट तिच्या डोक्यावर घिरट्या घालत आहे. बंद स्वयंपाक घरांमध्ये काम करणाऱ्या महिलांना श्वास घेण्यासंबंधी आजाराचा सामना करावा लागतो.

एका सर्व्हेक्षणानुसार स्वयंपाक घरांमध्ये वापरण्यात येणाऱ्या लाकडांपासून निघणारा धूर हा सिगारेट किंवा विडीच्या धुरापेक्षाही घातक असतो. त्याचप्रमाणे गोबर गॅसमधून निघणारा धूर लाकडाच्या धुरापेक्षा दसपट जास्त घातक असतो, असंही सर्व्हेक्षणात नमूद करण्यात आलं आहे. देशातील सुमारे ७० टक्के गावांमध्ये आजही स्वयंपाक घरात इंधनाच्या नावाखाली लाकूड, कोळसा यांचा वापर होतो. या स्वयंपाक घरांमध्ये धूर बाहेर जाण्यासाठी कोणतीही जागा नसते. या धुरामुळे दरवर्षी सुमारे पाच लाखांहून अधिक मृत्यू होतात. त्यामुळे हा धूर टीबी, एडस या रोगांइतकाच घातक ठरतो आहे. काळानुरुप गावांची परिस्थिती बदलली. पण, तेथे स्वयंपाक घरांची स्थिती मात्र आहे तीच आहे. (उत्तरार्ध)

**घरगुती औषध**

## १०० चाफा (१)

लांब पानाचे चाफ्याचे झाड सर्वांच्या परिचयाचे आहे. याला खुरचाफा असे म्हणटले जाते. या झाडाची फुले, पाने, मुळावरची साल ही सर्व उपयोगी पडतात. याची फुले अंदाजे ५० ग्रॅम घेऊन त्याचा काढा करावा व तो तूप घालून घेताला बसता सर्दी नाहीशी होते व उत्तम भूक लागते.

हिवतापावर म्हणजे थंडी वाजून येणाऱ्या तापावर, थंडी वाजण्यापूर्वी चाफ्याच्या कळ्या विड्यातून खाव्या, तापाची पाळी चुकते, असे म्हणतात. ताप येण्यापूर्वी तीन तास चाफ्याची कळी घातलेले विडे तासा–तासाचे अंतराने घ्यावे. चाप्याने तोंड येते. याकरिता या विड्यात खोबरे घालावे.

**म्हणी**

करायला गेलो एक आणि झाले भलतेच.
एखादी चांगली गोष्ट करण्यासाठी पुढे गेलो असता त्यातून चुकीचे काही तरी झाले की ही म्हण वापरली जाते.

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## महापालिकेच्या आदेशाला अधिकाऱ्यांकडूनच हरताळ

# महापालिका अधिकाऱ्यांची डबल वसुली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** महापालिकेच्या आस्थापनेवरील गट अ आणि ब वर्गातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना वर्षानुवर्षे महापालिकेचे वाहन वापरत आहेत. तरीही वेतनातही स्वतंत्र वाहन भत्ता महापालिकेतील अधिकारी घेत आहेत. महापालिकेचे वाहन वापरत असताना वेतनातही स्वतंत्र वाहनभत्ता घेणाऱ्या अधिकाऱ्यांना दोन्हीपैकी एकच सुविधा देण्याचे आदेश आहेत. मात्र असे असतानाही काही अधिकारी महापालिकेच्या आदेशाला हरताळ फासत असल्याचे चित्र आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने गट अ आणि ब वर्गातील अधिकाऱ्यांना वाहन वापरण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार केलेले आहे. प्रशासकीय राजवटीत पदाधिकाऱ्यांची वाहनेही वरिष्ठ अधिकारीच वापरत आहेत. महापालिकेच्या नियमानुसार अधिकाऱ्यांना स्वतंत्र वाहन नसेल तर वाहनभत्ता दिला जातो. महापालिकेच्या वाहन धोरणानुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांना फिरतीच्या कामासाठी वाहनभत्ता दिला जातो.

ज्यांना वेतनामध्ये वाहनभत्ता दिला जात आहे, त्यांना महापालिकेचे वाहन वापरता येणार नाही, अशी स्पष्ट तरतूद आहे. परंतु यानंतरही अनेक अधिकारी विशेषतः साहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता या पदावरील अधिकारी वाहनभत्ता घेत असतानाच महापालिकेच्या वाहनाचा लाभही घेत आहेत. मात्र, याकडे प्रशासनासह कार्यकारी अधिकारीही दुर्लक्ष करत आहेत. यामुळे महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी वाहन आणि वेतनामध्येही भत्ता घेत आहेत. अधिकारी असा दुहेरी लाभ उचलत असल्याने पालिकेला लाखोंचा फटका बसत आहे.

> महापालिका सेवेतील अधिकाऱ्यांना ६० इलेक्ट्रिक वाहने दिलेली आहेत. ती भाडेतत्त्वावर असल्याने त्यांचा आकडा आहे. मात्र, महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांची आणि इतर कोणती वाहने दिली आहेत, याचा आकडा सध्या कार्यशाळेकडे उपलब्ध नाही.
>
> - **कैलास दिवेकर**, कार्यकारी अभियंता, महापालिका

### कार्यशाळा विभागाचे आशीर्वाद

- कोणत्या अधिकाऱ्यांना कोणती गाडी दिली. जर ती भाडेतत्त्वावर असेल तर त्याची निविदाही कार्यशाळा विभागाच्या अंतर्गत काढण्यात येते. मात्र, महापालिकेच्या अधिकाऱ्यांना महापालिकेने किती गाड्या दिल्यात याचीच आकडेवारी नाही. त्यामुळे कार्यशाळा विभागातील वरिष्ठ अधिकारी नेमके कोणाला पाठीशी घालत आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे.

# संत तुकाराम महाराजांचे शिल्प धुळखात पडून



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या "ई" क्षेत्रीय कार्यालयातील जगतगुरु संत तुकाराम महाराजांचे शिल्प धुळखात पडून आहे. हे म्युरल्स साफ करण्याची जबाबदारी एकमेकांवर ढकलली जात असल्याचे पाहून राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार गट) कार्यकर्त्यांनी ई क्षेत्रीय अधिकाऱ्यांची चांगली झाडाझडती घेतली. हे म्युरल्स म्हणजे केवळ पुतळे नाही. तर आपली परंपरा, इतिहास सांगण्याचे काम त्यांच्या माध्यमातून होत असते. त्यांच्या बाबतचा हा अक्षम्य हलगर्जीपणा अजिबात खपवून घेतला जाणार नाही. तातडीने हे पुतळे स्वच्छ करण्यात यावे अन्यथा युवक काँग्रेसच्या माध्यमातून आंदोलन केले जाईल असा इशारा युवकचे शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी दिला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या "ई" क्षेत्रीय कार्यालयात असलेल्या जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्या शिल्पाची (म्युरल्स) धूळ, जाळी जळमटे यामुळे दुरावस्था झाल्याचे पाहायला मिळाले. या कार्यालयात आपले महापुरुष, संत, महात्मे यांचे शिल्प (म्युरल्स) ठेवण्यात आलेली आहे. मात्र या शिल्पांवर प्रचंड धूळ साचली आहे.

## » Selected



### परवान्यासाठी हातगाडीधारकांचा महानगरपालिकेवर धडक मोर्चा

**पिंपरी :** पिंपरी शहरातील टपरी, पथारी, हातगाडीधारकांचे सर्वेक्षण होऊनही परवाना मिळाला नाही. हा परवाना द्यावा, अन्यथा महापालिकेला टाळे ठोकू, असा इशारा टपरी, पथारी, हातगाडी, पंचायतच्या वतीने देण्यात आला होता. १५ दिवसांची मुदत संपल्याने संघटनेने संताप व्यक्त करत पिंपरी-चिंचवड महापालिकेवर मोर्चा आयोजित केला. दरम्यान ३० सप्टेंबरपर्यंत परवाना वाटप करण्याचे आश्वासन आयुक्त शेखर सिंह यांनी दिले. त्यामुळे हा मोर्चा तात्पुरता स्थगित करण्यात आला.

पिंपरी-चिंचवड शहरात २० हजार फेरीवाल्यांचा सर्वे झाला आहे. त्यापैकी १५ हजारांपेक्षा अधिक टपरी, पथारी, हातगाडीधारकांना लायसन्स व ओळखपत्र मिळावे, अशी मागणी संघटनेच्या वतीने वारंवार केली आहे. १४ ऑगस्ट रोजी महापालिकेसमोर आंदोलन करण्यात आले होते. यावेळी पंधरा दिवसात लायसन्स व ओळखपत्र देऊ, असे आश्वासन प्रशासनाने दिले होते. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही.

### भामा आसखेड धरण पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतिपथावर

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरामध्ये वाढते औद्योगीकरण, नागरीकरण व



वाढत्या शहरीकरणामुळे लोकसंख्या वाढत आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील आधुनिक सोयी-सुविधांमुळे शहरामध्ये वास्तव्य करण्यासाठी नागरिकांचा कल वाढल्यामुळे येथील नागरिकांच्या पिण्याच्या पाणीक्षमतेमध्ये वाढ करणे क्रमप्राप्त ठरले आहे. यासाठीच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने भामा आसखेड धरण पाणीपुरवठा योजनेमध्ये अंतर्भाव असलेले विविध प्रकल्प जसे की, अशुद्ध जल उपसा केंद्र, १७०० मिलिमीटर व्यासाची ७.३० कि.मी असलेली रायझिंग मेन, ब्रेक प्रेशर टँकची बांधणी, १४०० मि.मी. व्यासाची १८.८० किलोमीटरची ग्रॅव्हिटी मेन जलवाहिनी, चिखली येथील नियोजित २०० द.ल.लि. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र अशा प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर असून या माध्यमातून शहरास वाढत्या लोकसंख्येचा विचार करता मुबलक पाणी मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने मंजुरी दिलेल्या अशुद्ध उपसा केंद्र मौजे वाकी तर्फे वाडा येथे बांधण्याचे काम ६५ टक्के पूर्ण झाले आहे. अशुद्ध उपसा केंद्राच्या माध्यमातून शहरासाठी प्रतिदिन १६७ द.ल.लि. इतके पाणी उपलब्ध होणार आहे.

### बालेवाडी येथे आंतरमहाविद्यालयीन जलतरण स्पर्धेला मोठा प्रतिसाद

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय आणि पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन मुले, मुलींच्या पोहण्याच्या स्पर्धा बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे पार पडल्या. या स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धकांची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. स्पर्धेचे उद्‌घाटन पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे अध्यक्ष डॉ. महेंद्र अवघडे, सचिव डॉ. उमेशराज पनेरू, उपसचिव डॉ. ऋषिकेश कुंभार यांच्या उपस्थित करण्यात आले. स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील २५ महाविद्यालयातील मुले, मुलींनी सहभाग घेतला होता.

### कारवाईची भिती दाखवत २४ लाखांची फसवणूक

**पिंपरी :** तुमच्या नावाने आलेल्या पार्सलमध्ये ड्रग्ज आढळून आले आहे. या गुन्ह्यात अटक करण्याची भिती दाखवत एका तरुणाची २३ लाख ९८ हजार ४५७ रुपयांची फसवणूक केली. ही घटना विजयनगर, काळेवाडी येथे २९ ऑगस्ट रोजी घडली. प्रणव प्रदीप धैसास (वय ३२, रा. विजयनगर, काळेवाडी) असे फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्यांनी याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार व्हिडिओ कॉलवरील तोतया पोलीस आणि मोबाइल धारक याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रणव यांना ५९ ऑगस्ट रोजी दुपारी पावणे बारा वाजताच्या सुमारास ९०३०६५४०६४ या मोबाइलवरून फोन आला. आपण फेडएक्स कुरिअर कंपनीतून बोलत असल्याचे सांगितले. तुमच्या नावाने आलेल्या पार्सलमध्ये खोटे पासपोर्ट व ड्रग्ज असल्याचे सांगितले. याबाबत अंधेरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद असल्याचे सांगत तो कॉल सायबर पोलिसांच्या प्रदीप सावंत यांच्याकडे जोडून दिल्याचे सांगितले.

**राष्ट्रसंचार काळजी घ्या... रा**

## चिकुनगुनियाचे बदलते रूप अधिक त्रासदायक

**पिंपरी :** गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा चिकुनगुनिया आजारांचा प्रादुर्भाव वाढल्याचे चित्र आहे. या आजाराची लक्षणांमध्येही काही बदल दिसून आल्याने अधिक तीव्र लक्षणांमुळे रुग्णांना रुग्णालयात दाखल करावे लागत आहे. त्यामुळे ताप, सांधेदुखी ही लक्षणे दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नका, असा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञ नागरिकांना देत आहेत.

चिकुनगुनिया व डेंगी या दोन्ही आजारांची लक्षणे ही सुरुवातीच्या काळात काही प्रमाणात सारखी आहेत. या आधी शहरात चिकुनगुनियाचे फारसे रुग्ण आढळले नव्हते. त्यामुळे सुरुवातीला रुग्णांकडून डेंगीची तपासणी केली जाते. मात्र, या तपासणीत काहीच आढळून न आल्याने रुग्ण आजाराकडे दुर्लक्ष करतात. त्याचवेळी चिकुनगुनियाची तपासणी न केल्यास या आजाराचे निदान होत नाही. मात्र, अत्यंत प्रतिकूल परिणाम रुग्णाच्या प्रकृतीवर होतात. अनेकदा या रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयातही दाखल करण्याची वेळ येते. त्यामुळे चिकुनगुनियाच्या कोणत्याही लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका, असा सल्ला डॉक्टर देत आहेत.

- आजारातून बरे होण्यास दहा ते बारा दिवसांचा अवधी लागतो
- आजारातून रुग्ण बरा झाल्यानंतरही सांधेदुखीची तक्रार ही दीर्घ काळापर्यंत राहतात
- कोणी काळजी घ्यावी
- आधीपासून मधुमेह, मूत्रपिंडाचे आजार, हृदयरोग रुग्ण
- आधीपासून विविध औषधे सुरू असलेले रुग्ण
- रोगप्रतिकारक्षमता कमी असलेल्या व्यक्ती.
- ज्येष्ठ नागरिक, लहान मुले
- रुग्णांनी काय करावे
- भरपूर आराम करावा
- भरपूर पाणी व द्रव पदार्थांचे सेवन करावे
- डॉक्टरांच्या सल्ल्यांने औषध घ्यावे



## व्यसनमुक्ती...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** राष्ट्रीय सेवा योजना व आईटी विभागाच्या वतीने सीआयआय यंग इंडियन्सच्या सहकार्याने व्यसनमुक्ती या विषयावर युवकांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## तरुणांमध्ये वाढत्या व्यसनाचे प्रमाण गंभीर

# व्यसनमुक्तीवर युवकांशी संवादाचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** ताथवडे येथील राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालया अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व आईटी विभागाच्या वतीने सीआयआय यंग इंडियन्सच्या सहकार्याने व्यसनमुक्ती या विषयावर युवकांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सहाय्यक पो निरीक्षक तानाजी कदम, उच्च न्यायालयाचे वकील ऍड अक्षय देशमुख, मानसशास्त्रज्ञ डॉ. अनुराधा करकरे, समाजसेवक डॉ. अजय दुधाने आदी मान्यवरांची प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते . तसेच हे सर्व मान्यवर विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. संतोष भोसले, उपसंचालक डॉ. अविनाश देवस्थळी, संकुल संचालक रवि सावंत, संचालक प्रा.सुधीर भिलारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.बी.बी. गाडेकर, शिक्षक प्रतिनिधी डॉ. जी.एस.माटे, डॉ. ए.जे. जाधव आदी उपस्थित होते.

मित्रांच्या संगतीने एकदा व्यसन केले म्हणून व्यसनी बनत नाही. परिस्थितीने तरुणाई व्यसनी बनते. व्यसनधिता हा आजार असतो. कायदेशीर शिक्षा करणे हा यावर पर्याय नसून त्याला समुपदेशनाने व्यसनापासून दूर ठेवणे शक्य आहे.यासाठी पालक आणि शिक्षक यांच्यात समन्वयक असावा असे मत सहभागी मान्यवरांनी व्यक्त केले.

तरुणाई मध्ये वाढत्या व्यसनाचे प्रमाण अधिक आढळत आहे. तसेच आजची तरुणाई गुटखा, तंबाकू, मद्य सेवन तसेच विविध अमली पदार्थाच्या आहारी जाऊन स्वतःचा आणि पर्यायाने समाजाचा जीव धोक्यात घालत आहे, ह्या वाढत्या सेवनामुळे कर्करोग आणि तत्सम कित्येक आजारांना सामोर जावं लागते. देशाच्या जडणघडणीवर याचा होणारा परिणाम हे लक्षात घेऊन ह्या शिबिराचे आयोजन केले होते.

## मोशीत उभारणार आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकुल

# इंटरनॅशनल मल्टिपर्पज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स 'दृष्टीक्षेपात'


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून मोशी येथे आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून, निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाला सुरूवात करण्यात येणार आहे.

भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडला स्पोर्ट्स हब बनवण्याचा संकल्प केला होता. त्या अनुशंगाने विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकुल उभारण्यासाठी त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता. त्याला यश मिळाले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अंतर्गत मौजे मोशी येथे गट क्र. ४४२ पै. व गट क्र. ४४५ पै मध्ये मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १/२०४ मध्ये स्टेडिअमचे प्रयोजन आहे. सदर ठिकाणी बहुउद्देशीय क्रिडा संकुल उभारण्याबाबत महापालिका सभा क्र. ३९१ मध्ये दि. २५ जुलै २०२३ रोजी मंजूर करण्यात आला होता. प्रस्तावित ठिकाणी ४.५६ हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड आरक्षित आहे. त्या ठिकाणी स्टेडिअम होणार आहे.

मुंबईतील बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्समधील एक भूखंड महाराष्ट्र क्रिकेट असोशिएन (MCA) मार्फत विकसित करुन चांगल्या प्रकारचा स्पोर्ट्स क्लब शहराला उपलब्ध झाला आहे. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये इंटरनॅशनल मल्टीपर्पज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स विकसित होणार आहे.



> पिंपरी-चिंचवड शहराला 'स्पोर्ट्स सिटी' बनवण्याचा संकल्प आम्ही 'भोसरी व्हीजन- २०२०' मध्ये केला होता. त्याअंतर्गत आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षण केंद्र, आंतराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र, इंटरनॅशनल बॉक्सिंग सेंटर, स्केटिंग ग्राउंड असे विविध प्रकल्प मार्गी लागले आहेत. या पुढील काळात पिंपरी-चिंचवड स्पोर्ट्स क्लब उभारण्याचा मानस आहे. त्याचे नियोजन नेहरुनगर येथील आण्णासाहेब मगर स्टेडिअममध्ये करण्यात येत आहे. तसेच, मोशी येथे प्रशासनाने आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकूलसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रकल्प उभारणी सुरू करावी आणि राज्यातील स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीचीही पायाभरणी करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> -**महेश लांडगे**, आमदार, भोसरी, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# वीजपंपाची वायर चोरीला; चांदखेडमधील पाणी बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोमाटणे :** चांदखेडला पाणीपुरवठा करणाऱ्या वीजपंपाची केबल वायर चोरीला गेल्याने गावात पाणी समस्या निर्माण झाली असून याप्रकरणी शिरगाव पोलिसांची चौकशी सुरू आहे.


सरपंच मीना माळी यांनी दिलेल्या माहितीनुसार चांदखेड गावाला धामणे गावानजीक पवना नदीलगतच्या विहिरीवरुन पाणीपुरवठा केला जातो. विहीर व पंपहाऊस यामध्ये पाचशे मीटर अंतर असून, पंपास वीजपुरवठा करण्यासाठी तेथे पाचशे मीटर अंतराची केबल वायर टाकण्यात आली होती. ही केबल वायर अत्यंत जुनी झाल्याने वारवार वीजपुरवठा खंडित होऊन पंप बंद पडू नये यासाठी ग्रामपंचायतीने पावणेतीन लाख रुपये खर्च करून दोन दिवसांपूर्वी नवीन केबल वायर बसवली होती. नवीन केबल वायरमुळे दोन दिवस सुरळीत पाणी पुरवठा चालू होता. आज तो बंद झाल्याने पाहणी केली असता पाचशे मीटरची केबल वायर चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. ऐन पावसाळ्यात पाणीपुरवठा बंद झाल्याने सध्या गावात पाणी समस्या निर्माण झाली होती.

## समर्थकांकडूनच थेट अजित पवारांची कोंडी

# चिंचवडची जागा राष्ट्रवादीला द्या, अन्यथा...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** महायुतीत अधिकच्या जागा मिळवण्यासाठी अजित पवारांना कस लावावा लागणार आहे, अशातच चिंचवडमधील खंदे समर्थकांनी अजित दादांची कोंडी केली आहे. भाजपच्या वाट्याची चिंचवड विधानसभा जागा राष्ट्रवादीला घ्या, अन्यथा येत्या चार-पाच दिवसांत आम्ही तुतारी फुंकू अथवा मशाल पेटवू, असा इशारा राष्ट्रवादीच्या माजी नगरसेवकांनी अजित दादांना दिला आहे. आत्ता आम्ही चौघे असलो तरी आमच्या सोबत एकूण २५ माजी नगरसेवक आहेत, त्यात भाजपच्या ही माजी नगरसेवकांचा समावेश असल्याचा



दावा त्यांनी केला आहे.

भाजपच्या वाट्याची चिंचवड विधानसभा जागा राष्ट्रवादीला मिळाली नाही तर आम्ही मविआत जाऊ, मात्र भाजपचा प्रचार मुळीच करणार नाही. असा इशारा देत खंदे समर्थकांनी थेट अजित पवारांना आव्हान दिलं आहे. यानिमित्ताने अजित पवारांची थेट महायुतीत कोंडी होणार हे ही उघड झालं आहे.

महायुतीमध्ये जागा वाटपात चिंचवड विधानसभेची जागा ही भाजपला, तर महाविकास आघाडीत ही जागा शरद पवार यांच्या पक्षाला जाईल अशी दाट शक्यता आहे, तर या मतदारसंघातून तीव्र इच्छुक असणाऱ्या नाना काटे काय निर्णय घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. अशातच आता राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप यांच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांनी देखील आता एकमेंकांचा प्रचार न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर आता पक्ष बदलाचा निर्णय घेणार असल्याचंही समर्थकांना म्हटलं आहे. त्यामुळे आता जागा मिळवण्यासाठी आणि या ठिकाणी आपला उमेदवार देण्यासाठी अजित पवारांची कोंडी समर्थकांनी केली आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपनंतर अजित पवार गटाने नवा ठराव मंजूर केला आहे. भाजपने बैठक घेऊन पिंपरी विधानसभेवर दावा केला, त्यानंतर अजित पवार गटाने ही बैठक घेतली त्यामध्ये भाजपच्या वाट्याला असणाऱ्या भोसरी-चिंचवड राष्ट्रवादीला घेण्याचा ठराव मंजूर केला आहे. तसेच भाजप राष्ट्रवादीचा प्रचार करणार नसेल तर आम्ही भोसरी आणि चिंचवडमध्ये ही प्रचार न करण्याचा निर्णय घेऊ शकतो, असा इशारा ही द्यायला अजित पवार गट विसरला नाही. या बैठकीत अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे स्वतः उपस्थित होते. #रा

## शहरात भटक्या श्वानांची संख्या तब्बल ३० हजारांवर

# भटक्या श्वानांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात एकीकडे पाळीव श्वानांसाठी डॉग स्पॉट निर्माण करण्यात आला असतानाच दुसरीकडे नागरिकांना भटक्या श्वानांचा त्रास वाढला आहे. शहरात भटक्या श्वानांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नागरिकांवर हल्ला करणे, चावा घेणे, रस्त्यांवर टोळक्याने फिरणे, घरांसमोर विष्ठा टाकणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत आहेत. या प्रकाराला कंटाळून शहरातील नागरिकांनी भटक्या श्वानांविरोधात सारथी हेल्पलाईनवर तब्बल ६०० तक्रारी केल्या आहेत.

शहरात भटक्या श्वानांची संख्या मोठी आहे. आतापर्यंत भटक्या श्वानांचे कोणतेही सर्वेक्षण झाले नसल्याने त्यांची आकडेवारी समोर येत नाही. मात्र, शहरातील लोकसंख्येच्या एक टक्के एवढी भटक्या श्वानांची संख्या असते, असे प्रमाण मानले जाते. त्या नुसार शहरात तब्बल ३० हजारांच्या वर भटक्या श्वानांची संख्या आहे. यातील बहुतांश श्वानांचे महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडून निर्बिजीकरण करण्यात आले आहे.मात्र, गेल्या काही काळात हे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे गेल्या काही काळात भटक्या श्वानांची संख्या वाढत चालली आहे. सध्या शहरातील प्रत्येक रस्त्यावर, चौकात मोठ्या संख्येने भटके श्वान दिसतात. खाऊ गल्ली, हॉटेल्स, चिकन-मटणची दुकाने, कचराकुंडी या ठिकाणी भटक्या श्वानांचा वावर जास्त असतो. तसेच छोट्या मोठ्या सोसायट्यांचा पार्किंगमध्येही हे श्वान दिसून येतात. कचऱ्याच्या पिशव्या कचराकुंडीतून काढून फोडणे, रस्त्यावर, पदपथांवर विष्ठा टाकणे असे प्रकार या श्वानांकडून होतात. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात घाण होते. तसेच या श्वानांकडून नागरिकांवर हल्ला करण्याच्या घटनाही घडल्या आहेत. या प्रकारामुळे शहरातील नागरिकांनी थेट महापालिकेच्या सारथी हेल्पलाईनवर तक्रारी नोंदवल्या आहेत. गेल्या काही दिवसांत भटक्या श्वानांविषयी तब्बल सहाशे तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत.

### वर्षात १२ हजार नागरिकांना चावा

● पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या एक वर्षात १२ हजार नागरिकांना भटक्या श्वानांनी चावा घेतला आहे. या सर्व नागरिकांवर महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात उपचार करण्यात आला आहे. यातील काही नागरिक श्वानाच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाले होते.

"पशू वैद्यकीय विभाग एका खासगी संस्थेच्या माध्यमातून भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण करते. शहरात भटक्या श्वानांच्या निर्बिजीकरणाचे मोठे काम झाले आहे. मात्र, नागरिकांनी सारथी हेल्पलाईनवर भटक्या श्वानांविषयी तब्बल सहाशे तक्रारी केल्या आहेत. या तक्रारींचे निराकरण करण्याचे काम सुरू आहे."

— **संदीप खोत** उपायुक्त

### काय आहेत तक्रारी?

- भटके श्वान घरासमोर बसून राहतात
- रस्त्यावर, पदपथांवर दररोज घाण करतात
- जाता-येताना श्वान अंगावर धावतात
- दुचाकीच्या मागे धावतात
- कचराकुंडीतील कचरा रस्त्यावर आणतात

# कर्नाटकातील विद्यार्थ्यांची स्मार्ट सिटी प्रकल्पांना भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** कर्नाटकातील बागलकोट येथील बी.व्ही.व्ही. एस. पॉलिटेक्निकच्या तिसऱ्या वर्षाच्या सिव्हिल इंजिनियरिंग विद्यार्थ्यांनी पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी प्रकल्पांना भेट दिली. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांनी अत्याधुनिक शहरी विकास आणि स्मार्ट सिटी उपक्रमांना प्रत्यक्ष पाहणी केली. शैक्षणिक वर्षातील अभ्यास दौ-याचा एक भाग म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यास दौ-यात प्राध्यापक गिरीष मल्लीकटटी यांच्यासह 55 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यादरम्यान, विद्यार्थ्यांना विविध स्मार्ट सिटी प्रकल्पांमध्ये मार्गदर्शन करण्यात आले.

यामध्ये, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागरमधील एबीडी एरियातील ८ टू ८० पार्क, लिनिअर गार्डन, रस्ते विकास, सायकल मार्ग, योगा पार्क तसेच, निगडी येथील आयसीसीसी मधून स्मार्ट वाहतूक व्यवस्था, कचरा व्यवस्थापन उपाय, सीसीटीव्ही प्रकल्प, पाणी व्यवस्थापन, स्मार्ट सारथी मोबाईल ॲप, पार्किंग, पर्यावरण सेन्सर आदी प्रकल्पांची माहिती देण्यात आली.

## आगीत घरातील सामान खाक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** घरात इस्त्री करत असताना लाईट गेली. त्यानंतर मुलाला शाळेत सोडण्याची वेळ झाल्याने महिला इस्त्रीचे बटन सुरु ठेऊन घर बंद करून शाळेत गेली. मुलाला शाळेततून येऊन बघते तर घरात भीषण आग लागल्याचे दिसले. लाईट गेल्यानंतर इस्त्रीचे बटन बंद करण्यास विसरल्याने ही घटना बुधवारी, दि. २५) सकाळी दहा वाजता भोंडवे बाग, रावेत येथे घडली.

दरम्यान, लाईट आली. इस्त्री गरम होऊन आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच महिलेने मोबाईल फोन देखील बेडरूममध्ये चार्जिंगला लावला होता. आगीमध्ये बेड, गादी, उशी, मोबाईल फोन, वस्तू जळून गेल्या.

# कॉलिटी सर्कल फोरमचे वार्षिक अधिवेशन संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** कॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या वतीने दोन दिवसीय ३९ वे वार्षिक अधिवेशन २०२४ भोसरी येथील क्वालिटी सर्कल एक्सलन्स सेंटर येथे संपन्न झाले. त्यात एकूण ४८९ नामांकने ९४ संस्थांकडून प्राप्त झाली होती आणि १६८२ जणांनी या अधिवेशनात सहभाग घेतला होता. दोन दिवसीय ३९ वे वार्षिक अधिवेशनात ३६० केस स्टडीज, ६२ घोषणा आणि ६२ पोस्टर्स स्पर्धकानीं सादर केले. विजेत्यांना




स्मृतिचिन्ह, सुवर्ण, रजत, कास्य पदके प्रदान करण्यात आले.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी स्पर्धेचे उद्घाटन लुमॅक्स इंडस्ट्रीज लि. चे व्हाईस प्रेसिडेंट (ऑपरेशन) राजेश डुब्बेवार यांनी केले व स्पर्धकांना मार्गदर्शन केले. यावेळी परिवर्तन वार्षिक नियतकालिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# महाविकास आघाडीच्या आमदारांचे शहरात आंदोलन



**पुणे :** जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाविकास आघाडीकडून आंदोलन करण्यात आलं. पुणे जिल्हा नियोजन समितीच्या मंजूर झालेल्या कामातून महाविकास आघाडीच्या आमदारांना वगळल्याचा आरोप महाविकास आघाडीकडून करण्यात आला आहे. याविरोधात सुप्रिया सुळेंच्या नेतृत्वात महाविकास आघाडीच्या आमदारांनी निषेध आंदोलन केले आहे. आमदार संजय जगताप, संग्राम थोपटे, आणि अशोक पवार यांना निधीतून वगळ्याचा आरोप करण्यात आला आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं आहे.

यावेळी राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पुणे जिल्हा नियोजन समितीवर गंभीर आरोप केले आहेत.आम्ही जो निधी मागतो त्यावर फुली मारली जाते. आम्हाला निधी दिला जात नाही. आम्ही जनतेची कामं करत आहोत. त्यासाठी आम्ही सरकार कडे निधी मागत आहे. हे संविधान विरोधी आहेत. विरोधक असला तरी आमच्या काळात निधी दिला जात होता. विरोधक असला तरी ठीक पण निवडणुका पुरता विरोधक परत नाही. आमच्या काळात विरोधकांना पण निधी देत होतो, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

एसपी महाविद्यालयाच्या मैदानावर उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा होत आहे. त्यावर सुप्रिया सुळे यांनी भाष्य केलं. मी सहाव्यांदा पुण्यात मेट्रो उद्घाटन करण्याठी येत आहेत. त्याच्या ऑफिसला सांगितले नसेल की आपण एकाच मेट्रो कार्यक्रमाला जात आहेत. हे मोदी याना माहिती नसावं. आम्ही आमच्या मतदरसघातील लोकासाठी आज निधी मागत आहे. अनेक भूखंड बाबत विषय समोर आले आहे,कॅबिनेट ओव्हर रोल करत पुढे ढकलेले जात आहेत. 'शिवस्वराज्य यात्रा' सुरु आहे. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी नेते जात आहेत. फडणवीस सत्तेत आहे. त्यांनी आरक्षणाबाबत निर्णय घेऊन टाकावा, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

बदलापूरमधील चिमुकल्या मुलींवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर करण्यात आला. त्यावर सुप्रिया सुळे यांनी भाष्य केलं. अक्षय शिंदे एन्काऊंटरवरून देवेंद्र फडणवीस यांचे बंदूक धरलेले पोस्टर वायरल होत आहेत. गृहमंत्री आहे देवेंद्रजी असे बॅनर लहान मुलं बघतील काय म्हणतील. देवेंद्र फडवणीस यांनी बंदूक घेऊन यावं. शाहू फुले आंबेडकर याचा महाराष्ट्र आहे, असं सुप्रिया सुळेंनी म्हटलं .

# चाकण परिसरात तीन तास वीज खंडित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापारेषण कंपनीच्या आळेफाटा २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्रातील इंटरकनेक्टिंग ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड झाल्यामुळे चाकण परिसरातील १२ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा सकाळी तीन तास खंडित होता. मात्र महापारेषणकडून युद्धपातळीवर उपाययोजना करून चिंचवड २२० केव्ही उपकेंद्रातून पर्यायी स्वरुपात वीजपुरवठा सुरु करण्यात आला.

याबाबत माहिती अशी की, चाकण परिसरातील वाकी, बिरदवडी, रोहकल, कडाची वाडी, रासे, रहाणुबाई मळा, मेदनकरवाडी या परिसराला महावितरणच्या आंबेठाण व फोक्सवॅगन २२ केव्ही या दोन वीजवाहिन्यांद्वारे वीजपुरवठा होतो. मात्र महापारेषणच्या आळेफाटा २२० केव्ही उपकेंद्रातील इंटरकनेक्टिंग ट्रान्सफॉर्मरमध्ये (आयसीटी) बिघाड झाला होता.

## शहरात पुन्हा मुसळधार पाऊस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** हवामान विभागाने परिसरात मुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला असून पिंपरी-चिंचवड शहरात दुसऱ्या दिवशीही वरुण राजाने हजेरी लावली या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला सज्ज राहण्याचे आदेश दिले असून नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.

# लोहगड, गाव परिसरात स्वच्छता मोहीम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वडगाव मावळ :** स्वच्छ भारत मिशन टप्पा २ अंतर्गत फ्रेंड्स ग्रुप, तळेगाव दाभाडे, मावळ शिक्षक प्रबोधन परिवार व हिरकणी शिक्षिका मैत्रीण ट्रेकिंग ग्रुपच्या वतीने लोहगड किल्ला व गाव परिसराची संपूर्ण स्वच्छता करण्यात आली. मावळ पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात ७० शिक्षकांनी सहभाग घेतला.,

गडकिल्ले संवर्धन व स्वच्छता तसेच युनोस्कोने नामांकन केलेल्या लोहगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविण्याची संकल्पना पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने मांडण्यात आली.या मोहिमेत ७० शिक्षकांनी सहभाग घेतला. त्यानंतर लोहगड किल्ल्यावर शिवव्याख्याते सचिन ढोबळे यांचे व्याख्यान झाले. सुहास धस यांनी सूत्रसंचालन केले. राजू भेगडे व मनोज भांगरे यांनी आभार मानले.

पान १ वरून

## विकास कामांचा होणार शुभारंभ

जिल्हा न्यायालय ते स्वारगेट हा पुणे शहरातील पहिला भूमिगत मेट्रो मार्गाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमानंतर हा मार्ग सर्वसामान्यांसाठी खुला करण्यात येणार आहे. पुणेकरांना शहरातील पहिला भूमिगत मेट्रोचा मार्ग अनुभवता येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण कार्यक्रमानंतर हा मार्ग खुला करण्यात येणार आहे. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट हे 3.62 किलोमीटरचे अंतर आहे. नुकतीच कर्वेनगर येथे नितीन गडकरी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पालखी मार्ग आणि इतर विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

## 'देवाचा न्याय ' तर दुसरीकडे...

केली आहे. आज या याचिकेवर सुनावणी पार पडली असून या सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी पोलिसांवर प्रश्नांची सरबत्ती केली आहे. तसेच अक्षय शिंदेला तुरुंगातून बाहेर काढल्यानंतर त्याला पोलीस व्हॅनमध्ये बसवेपर्यंत आणि एन्काऊंटर झाल्यानंतर शिवाजी रुग्णालयात नेईपर्यंतच्या सर्व घटनाक्रमाचे व्हिडीओ फुटेज उच्च न्यायालयाने सदर करण्यास सांगितले आहेत. न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण आणि न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने सुनावणीदरम्यान ठाणे पोलिसांच्या कामगिरीवर अनेक प्रश्न उपस्थित केले.

## वर्षभरात ३६ हजार दाखल्यांचे वाटप

# दाखले काढण्यासाठी नागरी सुविधा केंद्रात गर्दी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्राच्या माध्यमातून १ एप्रिल २०२४ ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत ३६ हजार ५३८ दाखले काढण्यात आले आहेत, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिली. महापालिकेच्या वतीने नागरी सुविधा केंद्रांच्या माध्यमातून विविध प्रकारची प्रमाणपत्रे, परवाने आदी सेवा प्रदान केल्या जात आहेत. नागरिकांना आवश्यक असणाऱ्या सेवेचा अर्ज ऑनलाईन भरण्यात येतो आणि नागरिक आवश्यक त्या सेवा कोणत्याही अडथळ्याशिवाय प्राप्त करू शकतात. ७/१२ चा उतारा, रहिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र अशी अनेक उपयुक्त कागदपत्रे या माध्यमातून नागरिक प्राप्त करीत आहेत. पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत महापालिकेच्या वतीने एकूण ९४ नागरी सुविधा केंद्रे उभारण्यात आली असून दाखले काढण्यासाठी नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

### या दाखल्यांचा समावेश

● भाडेकरू नोंदणी, रसवंतीगृह चालू करण्याकरिता परवाना, अग्नि वर्दी प्रमाणपत्र (फायर अटेंडन्स सर्टिफिकेट), एल. पी. जी बॅक रेटीक्युलेशन यंत्रणा, नवीन नळजोड देणे, हॉटेल नुतनीकरण, हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना नुतनीकरण करणे, नळ कनेक्शन बंद करुन अनामत परत करणे, हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना देणे (१ ते १० बेड ), सिनेमागृह नुतनीकरण, ड्रेनेज बांधकाम परवानगी ना हरकत दाखला देणे, पेट्रोल पंप ना हरकत दाखला, महापालिका हॉल व मैदाने भाड्याने देणे, अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करणे, इमारत प्लॅन मंजुरी तात्पुरता ना हरकत दाखला, झोपडी हस्तांतर करून फोटो पास, उद्योग धंदा परवाना नुतनीकरण, जल निस्सारण जोडणी देणे, कायमस्वरूपी नळ कनेक्शन बंद करणे, साठा परवाना, पाणीपुरवठा व बांधकाम पूर्णत्वासाठी ना हरकत दाखला, मृत्यू प्रमाणपत्र, आदी दाखल्यांचा समावेश आहे.




#रा

## » Selected



## 'ज्येष्ठोत्सव सनवल्ड'मध्ये 'ब्लॅकमेल' एकांकिका प्रथम

**निगडी :** 'ज्येष्ठोत्सव' या सनवल्ड संस्थेतर्फे २० ते २२ सप्टेंबर घेण्यात येणाऱ्या अनेक स्पर्धांमध्ये शब्दरंग कला साहित्य कट्टा या प्राधिकरण येथील संस्थेने 'ब्लॅकमेल' ही एकांकिका सादर केली. सदानंद इनामदार लिखीत आणि अशोक अडावदकर यांनी दिग्दर्शीत केलेली अतिशय उत्कंठावर्धक आणि रहस्यमय असलेल्या या एकांकिकेत सुभाष भंडारे, चंद्रशेखर जोशी, सतीश सगदेव, शरद यनुवार, पल्लवी कोंडेकर आणि ज्योती कानेटकर या कलाकारांनी उत्तम भूमिका केल्या. सदर एकांकिकेला स्पर्धेत प्रथम क्रमांकाची एकांकिका म्हणून गौरवण्यात आले. एकूण 15 संघांनी एकांकिका सादर केल्या. उल्लेखनीय बाब म्हणजे गेली 13 वर्षे सातत्याने सुरू असलेल्या या स्पर्धेत पिंपरी-चिंचवडमध्ये प्रथमच हा करंडक आला, ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. या एकांकिकेला मुकुंद जोशी आणि संपदा दिवाकर यांनी पार्श्वसंगीत दिले होते. प्राधिकरण मधील नागरिकांनी सर्वांचे अभिनंदन केले.




## पद्मश्री डॉ. प्रभाकर मांडे यांच्या साहित्यावर राष्ट्रीय चर्चासत्र

**चिंचवड :** डॉ. प्रभाकर मांडे ह्यांच्या ह्या लेखनाचे, संशोधनाचे आणि सामाजिक-सांस्कृतिक योगदानाचे सिंहावलोकन व्हावे ह्या हेतूने दि. २८ व २९ सप्टेंबर २०२४ रोजी पद्मश्री डॉ. प्रभाकर मांडे यांच्या समग्र साहित्यात आणि जीवनकार्यावर दोन दिवसांचे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे.

प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. पराग काळकर प्र. कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे समारोपपर भूमिका: पद्मश्री रमेश पतंगे ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक डॉ. प्रकाश खांडने माजी विभाग प्रमुख लोककला- मुंबई विद्यापीठ, पद्मश्री गिरीश प्रभुणे ज्येष्ठ साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते निखिल कुलकर्णी प्रांत समरसता. प्रमुख प्रसेनजीत फडणवीस अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे डॉ. निता मोहिते अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे डॉ. प्रभाकर देसाई अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे असणार आहेत.



## रस्त्यांच्या बाजूला लावलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी

**पिंपरी :** जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील सेवा रस्त्याने पिंपरीकडून चिंचवड स्टेशनकडे जाणाऱ्या मार्गावर एम्पायर इस्टेट परिसरातील रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात वाहने उभी केली जात असल्याने या भागात सतत वाहतूक कोंडी होत असते. या मार्गावर दुकाने, महाविद्यालय, शोरूमसह खासगी क्लासेस असल्याने नागरिकांची नेहमीच वर्दळ असते. येथे येणारे अनेकजण त्यांची वाहने रस्त्यावरच उभी करतात. दरम्यान, सेवा रस्त्याने येणारी वाहने एम्पायर इस्टेटसह काळेवाडीकडे जाणाऱ्या पुलावर जात असताना येथील वळणावरच वाहने उभी केली जात असल्याने वाहनांना वळण घेण्यासाठीही जागा उरत नाही. त्यामुळे दूरपर्यंत वाहनांच्या रांगा लागतात. या कोंडीत अनेकजण अडकून पडतात. दिवसेंदिवस वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. अशा बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### उमेदवारीबाबत महाविकास आघाडीत घमासान

# ...अन्यथा सांगली पॅटर्न राबवू ; शिवसैनिकांचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगांव :** विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजण्यास काही दिवस उरले असताना जुन्नर तालुक्यामध्ये महा विकास आघाडीत उमेदवारीसाठी जोरदार रस्सीखेच होताना दिसत आहे. जुन्नरची जागा मशालीला सोडा अन्यथा आम्ही अपक्ष निवडणूक लढू व सांगली पॅटर्न राबवू असा इशारा शिवसेनेच्या कार्यकर्त्याकडून जाहिरपणे देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवारी देण्यावरून महाविकास आघाडीमध्ये आगामी काळात घमासान होण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान सावरगाव-धालेवाडी यालिहा परिषद गटात शिवसेनेच्या



पदाधिकाऱ्यांचा नुकताच मेळावा संपन्न झाला. या मेळाव्याला तालुकाप्रमुख माऊली खंडागळे माजी आमदार बाळासाहेब दांगट, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य गुलाब पारखे, खंडू शिंदे, शिवाजी वाणी व शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. या मेळाव्यामध्ये सर्वच कार्यकर्त्यांनी जुन्नरचे उमेदवारी मशालीलाच मिळावी असा एकमुखी आवाज उठवला.उमेदवारी देताना काही दगाफटका झाला तर शिवसेनेला गृहीत धरू नये असा इशारा देखील महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांना यावेळी देण्यात आला. विशेष म्हणजे कार्यकर्त्यांच्या या मागणीला जुन्नरचे माजी आमदार बाळासाहेब दांगट व शिवसेनेचे तालुकाप्रमुख माऊली खंडागळे यांनी देखील दुजोरा दर्शविला आहे जुन्नर तालुक्यात महाविकास आघाडी कडून इच्छुकांची संख्या बरीच असल्यामुळे प्रत्येकजण उमेदवारी आपल्यालाच मिळेल असे समजून गुडघ्याला बाशिंग बांधून प्रचाराला सुरुवात केली आहे. तथापि जुन्नर मधून महाविकास आघाडीची उमेदवारी कोणाला याबाबतचा अधिकृत निर्णय अद्याप मात्र झालेला नाही. विघ्नहर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेअरकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षात घेऊन उमेदवारी दिली जाऊ शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. तसेच जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोहित ढमाले शरद लेंडे अंकुश आमले, अनंतराव चौगुले व राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार या पक्षाचे तालुका अध्यक्ष तुषार थोरात हे सुद्धा उमेदवारी आपल्यालाच मिळेल असे समजून प्रचार करताना दिसत आहेत. लोकसभेलानिवडणुकीत महाविकास अगजाडीचा धर्म पाळून आम्ही अमोल कोल्हे यांना खासदार केले आहे, आता जुन्नरची जागा महाविकास आघाडी मधून शिवसेना (उबाठा गट) या घटक पक्षाला सोडण्यात यावी अशी मागणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबरच शिवसैनिकांचा आहे. शिवसेनेची ताकद आजही जुन्नर तालुक्यामध्ये चांगली आहे. त्यामुळे जुन्नर विधानसभेवर शिवसेनेचा भगवाच फडकायला हवा अशा प्रकारची आग्रही मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाची आहे. शिवसेनेकडून जिल्हा परिषद गटानुसार कार्यकर्त्यांचे मेळावे घेतले जात असून या मेळाव्यात कार्यकर्ते एक मुखाने जुन्नरची जागा कोणत्याही परिस्थितीत मशालीला सुटावी अशी आग्रही भूमिका मांडीत आहेत. आघाडीच्या नेत्यांनी जुन्नरची जागा जर मशालीला सोडली नाही, तर आम्ही वेगळा विचार करू अशा प्रकारचा सूर कार्यकर्त्यांमध्ये ऐकायला मिळत आहे. तसेच आम्ही कार्यकर्त्यांच्या पुढे नाही अशा प्रकारची जाहीर भूमिका देखील माजी आमदार बाळासाहेब दांगट व शिवसेनेचे तालुकाप्रमुख माऊली खंडागळे यांची आहे. दरम्यान महाविकास आघाडीने जुन्नरची जागा जर मशालीला सोडली नाही तर शिवसेना जुन्नर तालुक्यामध्ये अपक्ष उमेदवार उभा करील, आणि सांगली पॅटर्न राबवून शिवनेरीवर शिवसेनेचा भगवा फडकवल्याशिवाय राहणार नाही. असा आत्मविश्वास कार्यकर्ते व्यक्त करत असतानाच जुन्नर विधानसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षालाच मिळायला हवी असा आग्रह त्या पक्षाच्या स्थानिक नेत्यांसह कार्यकर्त्यांचा आहे.

## पालिकेच्या वाढीव कररचनेस स्थगिती; राज्य शासनाचे निर्देश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**चाकण :** चाकण पालिकेने केलेल्या अन्यायकारक करवाढीला अखेर राज्य शासनाने स्थगिती दिली आहे. या बाबत महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने जिल्हाधिकारी पुणे व मुख्याधिकारी चाकण नगरपरिषद यांच्या नावे पत्रे पाठवून चाकण पालिकेच्या मालमत्ता संदर्भातील २०२२/२३ ते २०२५/२६ या चतुर्थ वार्षिक कालावधीसाठी निश्चित केलेल्या वाढीव कर रचनेस तूर्त स्थगिती देण्याबाबत शासनाचे निर्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

चाकण पालिकेने केलेल्या भरमसाठ करवाढीच्या विरोधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे व त्यांच्या सहकार्यांनी निवेदन दिले होते. मुख्यमंत्र्यांनी या बाबत सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यानंतर नितीन गोरे यांच्या पत्राचा संदर्भ देत शासनाने वाढीव करवाढीस स्ठगीती दिली आहे.

चाकण पालिकेच्या हद्दीतील मिळकत धारकांना घरपट्टी व नळपट्टी मध्ये मागील वर्षी भरमसाठ वाढ करण्यात आली होती. पालिकेने दिलेल्या देयकांत नव्यानेच शिक्षण कर हा लावण्यात आला होता. शिक्षणकर खूप मोठ्या प्रमाणावर लावण्यात आल्याचा नागरिकांचा आरोप होता. चाकण पूर्वी स्थापन झालेल्या पालीकांत एवढा मोठा शिक्षण कर लावण्यात आलेला नाही. मात्र चाकण पालिकेने एवढा कर का लावला ? असा संतप्त प्रश्न नागरिक विचारात होते. मिळकतधारकांना त्यांच्या मिळकतीच्या एकूण किमतीवर सहा टक्क्यांप्रमाणे शिक्षण कराचा मोठा बोजा पडलेला असल्याच्या तक्रारी करून हा कर रद्द करण्याची मागणी करण्यात येत होती. मात्र पालिकेने पत्र देऊन सदरचा कर रद्द करता येणार नसल्याचे स्पष्ट केले.

## छान किती दिसतात फुलपाखरे !

छायाचित्र-विजयकुमार हरिश्चंद्रे



पुरंदर भोर खोऱ्यात सध्या कोसमस फुलांचा बहर वाढला असून विविध जातीची देखणे फुलपाखरे या फुलांशी सलगी करताना आढळतात.

## श्रीक्षेत्र नारायणेश्वर मंदिर जतन, संवर्धनासाठी ६ कोटी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील श्रीक्षेत्र नारायणपूर येथील पुरातन श्री नारायणेश्वर महादेव मंदिर जतन आणि संवर्धनासाठी पुरातत्त्व विभागाच्या वतीने ६ कोटी १६ लाख ६३ हजार ९०२ रूपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांनी दिली.

यासाठी बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांनी पाठपुरावा केला होता. या निधीतून श्री नारायणेश्वर मंदिर जतन व संवर्धनासाठी मंदिर परीसरात



विविध विकासकामे होणार आहेत. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना पुरातत्व विभागाच्या वतीने हा निधी मंजूर झाला असून लवकरच कामांचा शुभारंभ होणार आहे. याबद्दल श्रीक्षेत्र नारायणपूर येथील ग्रामस्थांनी खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार संजय जगताप यांचे आभार मानले आहेत.

## संगणक अभियांत्रिकी शाखेची अभ्यासक्रम नियोजन बैठक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**धनकवडी :** पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी) स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात बी. टेक. संगणक अभियांत्रिकी शाखेच्या अभ्यासक्रम नियोजनासाठी उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. गीतांजली काळे यांनी भूषविले, तर प्राचार्य डॉ. संजय गंधे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक झाली. बैठकीत डॉ. गिरीश पोतदार यांनी विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण देण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

## कवितांचा गाव संकल्पनेचे प्रल्हाद पारटेंचा "परिवर्तन ग्रंथ मित्र" पुरस्काराने सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** गेली तीस वर्षांहून अधिक काळ वाचनालय चळवळ चालवणारे व जो पर्यंत कवितांचा गाव होत नाही तो पर्यंत चप्पल न घालण्याचा सकल्प करणारे सातारा जिल्हयातील जकातवाडी गावचे प्रल्हाद जयसिंग पारटे यांना राज्य पातळीवरील तिसरा परिवर्तन ग्रंथमित्र पुरस्कार नुकताच पुणे येथे देवून सन्मानित करण्यात आले सामाजिक कामात अग्रभागी असलेल्या पुणे येथील परिवर्तन संस्थेच्या वतीने स्व सुनील संभाजी मते यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात आलेल्या या पुरस्कार वितरण प्रसंगी परिवर्तन परिवार मोठया



संख्येने उपस्थित होता. शाल श्रीफळ, सन्मानपत्र, रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरुप होते. स्व सुनील मते यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ओंकार ध्वनीने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. परिवर्तन संस्थेचे अक्षय उंदरे यांनी संस्थेची माहिती व पुरस्कार देण्याची भूमिका मांडली. प्रमुख मनोगतात पुरस्कारार्थी पारटे सर यांनी वाचन संस्कृती, कविता याविषयी विचार मांडले गळणाऱ्या फुलांकडे लक्ष देण्यापेक्षा उमलणाऱ्या कळ्याकडे लक्ष केंद्रित करा असे सांगत कविता फक्त साहित्य संमेलनात न होता घराघरात, रानावनात व्हायला पाहिजे असे आवाहन केले कवितांचा गाव संकल्पने बाबत त्यांनी यावेळी आपले विचार मांडले. स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे सचिव हेमंत ताकवले यांनी यावेळी विचार व्यक्त केले.

## बाभूळसर खुर्दमध्ये क्रशरच्या मोटार फोडून तांब्याच्या तारा चोरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर:** बाभूळसर खुर्द ता. शिरुर येथील खडी क्रशरच्या मशीन वरील मोटार फोडून त्यातील तांब्याच्या तारा चोरून नेल्याची घटना घडली असल्याने रांजणगाव एमआयडीसी पोलिस स्टेशन येथे अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाभूळसर खुर्द ता. शिरुर येथे अर्जुन काळे यांचे खडी क्रशर असून सायंकाळच्या सुमारास सर्व कामगार मशीन बंद करुन घरी गेलेले होते, सकाळच्या सुमारास कामगार कामावर आले असता त्यांना खडी क्रशरच्या मशीन वरील मोटार खुललेल्या दिसून आल्याने, सर्वांनी पाहणी केली असता अज्ञात चोरट्यांनी मशीन वरील मोटार फोडून त्यातील तांब्याच्या तारा चोरून नेल्याचे समोर आले, याबाबत अर्जुन रामभाऊ काळे वय २९ वर्षे रा. बाभूळसर खुर्द ता. शिरुर जि. पुणे यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार गणेश आगलावे करत आहे.

## करंजविहीरे गावात आढळला अजगर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चाकण :** खेड तालुक्यातील करंजविहीरे लोकवस्तीत पूर्ण वाढ झालेला अजगर जातीचा सर्प आढळला. करंजविहीरे पावके वस्तीमधे हा मोठा अजगर जातीचा साप आढळला. सर्प मित्रांनी घटना स्थळी येऊन अजगर मोठया शीताफिने पकडून वन हद्दीत सुखरूप सोडला असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले.

## जेजुरीचा हर्षल पाटील बुद्धिबळ स्पर्धेत विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या अंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत शरदचंद्रजी पवार महाविद्यालय जेजुरीचा हर्षल उद्धव पाटील प्रथम क्रमांकाने विजयी झाला. त्याची निवड सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिर्डी येथे दि. २७ ते २९ सप्टेंबर २०२४रोजी होणाऱ्या अंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



हर्षलला शारीरिक शिक्षण संचालक डॉ शिवाजी भिंताडे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी नागणे, उपप्राचार्य डॉ. बेबी कोलते सर्व स्टाफ, विद्यार्थी यांनी हर्षलचे अभिनंदन केले.

## डेहेणे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवस उत्साहात साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** आमदार दिलीप मोहिते संस्थापक अध्यक्ष असलेल्या डेहणे (ता. खेड) येथील कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात संपन्न झाला. एनएसएस विभाग प्रमुख प्रा. दिलीप कदम यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजना दिवसाचे महत्त्व सांगितले आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे फायदे उद्दिष्टे विद्यार्थ्यांना सांगितले.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. महेश रानवडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थी



दशेतील राष्ट्रीय सेवा योजनेचा अनुभव सांगत बाबा आमटे यांच्या आदर्शवादी समाजसेवेचा आढावा घेतला. आदिवासी मुलींचे वस्तीगृह अधीक्षक रेणुका जाधव यांनी समाजसेवेची कास धरून विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्व घडवावे, असे प्रतिपादन केले. उपप्राचार्य प्रा. सिलदार पावरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून व्यक्तिमत्व विकास राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून होत असतो, असे मनोगत व्यक्त केले. प्रा. नितीन काळे व प्रा. काजल बर्डे यांनी सर्व नियोजन केले. सूत्रसंचालन कुमारी ऋतुजा कौदरे हिने केले. आभार प्रा. काजल बर्डे यांनी मानले.

### दौंड तालुका तहसीलदारांना निवेदन

## तेल मिसळणाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करा !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगांव :** श्री तिरुपती बालाजी देवस्थानच्या पवित्र लाडू प्रसादात प्राण्यांच्या चरबीचे तेल मिसळणाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करा. यासाठी दौंड तालुका तहसीलदार यांना महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

जगभरातील कोट्यवधी भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या आंध्र प्रदेश राज्यातील श्री तिरुपती बालाजी मंदिर हे साक्षात भगवान श्रीविष्णुचा भूवैकुंठ मानला जातो.



अशा परम पवित्र भूवैकुंठातील प्रसादाच्या लाडूमध्ये जनावरांच्या चरबीयुक्त तेलाचा वापर झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अशी माहिती स्वतः आंध प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी दिली आहे. त्यामुळे देशभरातील भाविक-भक्तांच्यात तीव्र संतापाची लाट पसरली आहे.

श्री तिरुपती बालाजी मंदिरातील लाडू हे केवळ अन्न नाही, तर भक्तांच्या श्रद्धेचा, आस्थेचा आणि आध्यात्मिक उर्जेचा एक भाग आहे.

अशा पवित्रतम प्रसादामध्ये अशुद्ध आणि धार्मिक दृष्टिकोनातून अनुचित (प्राणांच्या चरबीचा) घटकांचा वापर झाल्याने, भक्तांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. पवित्र लाडूमध्ये प्राण्याचे चरबी मिसळणे हा केवळ भेसळीचा साधारण गुन्हा नसून कोट्यवधी हिंदूंच्या धर्मश्रद्धेवर केलेला मोठा धार्मिक आघात आहे. धार्मिक भावनांचा अनादर आहे. हिंदूशी केलेला विश्वासघात आहे. तसेच जाणीवपूर्वक हिंदूंना धर्मभ्रष्ट करण्याचे षड्यंत्र आहे.

श्री तिरुपती बालाजी मंदिर आणि भक्त यांचे पावित्र भंग करणारा अक्षम्य गुन्हा आहे. जे हिंदू समाज कदापि सहन करू शकत नाही. तरी वरील सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघ पुणे जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली. यावेळी पारगाव (सा. मा.) येथील गणेश ताकवणे, मधुकर तांबे, विवेक ताकवणे, जिवन बोत्रे, अभिषेक ताकवणे हे हिंदु धर्माभिमानी उपस्थित होते.

#रा

### Selected



## बी. टेक. विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा मोठ्या उत्साहात

**धनकवडी :** पीआयसीटी अभियांत्रिकी महाविद्यालयात बी. टेक. संगणक अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स, तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनीरिंग शाखेतील नवीन विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. टी. कुलकर्णी आणि प्राचार्य डॉ. संजय गंधे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले आणि भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक संधींबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदनेने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. महाविद्यालयातील विविध विभागप्रमुख आणि प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शाखेतील शैक्षणिक प्रवासाविषयी प्राथमिक माहिती दिली. संचालक डॉ. पी. टी. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणाच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य करताना सांगितले, "आजच्या युगात तंत्रज्ञान हे एका जलद गतीने प्रगती करत आहे.



## बालकाचा मृत्यू ;बिबट्याची दहशत

**तेजेवाडी :** लेण्याद्री जवळ एका वीट भट्टी कामगाराच्या मुलावर बिबट्याने झडप घालून त्याला फरफटत शेतात नेले, यात त्या मुलाचा मृत्यू झाला. या घटनेने या परिसरामध्ये पुन्हा एकदा बिबट्याची दहशत निर्माण झाली आहे. ओझर - लेण्याद्री रस्त्यालगत वीटभट्टी कामगार यांचा मुलगा रुपेश तानाजी जाधव वय- ९ वर्ष हा पहाटे पाच वाजताच्या सुमारास घराच्या मागील बाजूस शौचास बसला असताना लगत असलेल्या सोयाबीनच्या शेतात दडून बसलेल्या बिबट्याने सावज समजून त्याच्यावर अचानक प्राण घातक हल्ला केला. त्यावेळेस समोरच असलेल्या मुलाच्या आजोबांनी आरडा- ओरडा करून बिबट्याला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता बिबट्याने आजोबांना न जुमानता मुलाला शेजारच्या उसाच्या शेतामध्ये फरपटत नेले. त्यावेळेस गावातील नागरिकांना समजले असता गावकरी त्याठिकाणी येऊन वन विभागाला सदर घटनेची सर्व माहिती दिली. वनविभागाचे अधिकारी- कर्मचारी यांनी तात्काळ घटना स्थळी पोहचून मुलाची शोधाशोध सुरु केली, एक ते दिड तासाच्या प्रयत्नानंतर मुलाची बॉडी शेजारच्या उसाच्या शेतात मृत अवस्थेत मिळाली. सदर शोधकार्य विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री सत्यशील शेरकर, वनपरीक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण व त्यांचे अधिनस्त 30-35 वनकर्मचारी आणि रेस्क्यू टीम सदस्य यांनी गावातील आजी- माजी उपसरपंच व इतर जबाबदार नागरिक, तरुण यांच्या मदतीने राबविले. नरभक्षक बिबट्याला पकडण्या करिता ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करून त्याचा शोध घेऊन तात्काळ पिंजरे व ट्रॅप कॅमेरे लावण्याच्या सूचना दिल्या. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी १० पिंजरे लावण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

## कातकरी वस्त्या विकासाच्या वाऱ्यापासून दूरच; बांधवांचा आक्रोश



**चाकण:** आदिवासी म्हटले की उन्हातान्हात मेहनत करणारे, अंगावर वितभर वस्त्र असलेले आणि रानावनात भटकणारे आदिवासी बांधव डोळ्यासमोर येतात. स्वातंत्र्यानंतर कित्येक वर्ष उलटूनही कातकऱ्यांबाबत हे चित्र तसेच आहे. आदिवासींच्या विकासासाठी शासनाने काही योजना राबविल्या असल्या तरी कातकऱ्यांना त्याचा विशेष लाभ झालेला नाही. चाकणच्या कातकरी वस्तीची देखील अशीच स्थिती आहे. निरुपद्रवी व शांत समाज म्हणून ओळख असलेल्या कातकरी बांधवानी संयमाचा बांध फुटल्यानंतर अखेर चाकण पालिकेसमोर आक्रोश करून अधिकार्यांना जाब विचारल्याचा प्रकार समोर आला आहे. चाकण नगरपरिषद हद्दीत पठारवाडी रस्त्यावर गायरान जागेतील आदिवासी पाड्यावरील कातकरी समाज मुलभूत सुविधांपासूनही वंचित आहे. या वस्तीवर जाण्यासाठी रस्ता नाही. पिण्याच्या पाण्याची सोय नाही. संपूर्ण कातकरी वस्तीत चिखलाचे साम्राज्य पसरले आहे.

## मिळकत कर कमी करण्याची नागरिकांची मागणी

# विधानसभा निवडणुकीत मतदानावर बहीष्कार टाकू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**फुरसुंगी :** फुरसुंगी व देवाची उरुळी या दोन गावानंतर आता उर्वरीत ३२ गावांतील मिळकत कराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मिळकत कर कमी करण्याची मागणी समाविष्ट गाव कृती समितीने केली आहे. ही मागणी मान्य झाली नाही तर महापालिकेला टाळे ठोकू व आगामी विधानसभा निवडणुकीत मतदानावर बहीष्कार टाकू असा इशारा समितीने दिला आहे.

समितीचे राहुल पोकळे, त्र्यंबक मोकाशी, पोपटराव खेडेकर, नेताजी बाबर, श्रीरंग चव्हाण, सुभाष नाणेकर, अतुल दांगट, सुरेश धावडे, रमेश कोंडे, अरुण दांगट, मारुती किंडरे, राहुल पायगुडे, काकासाहेब चव्हाण, नितीन दांगट, रुपेश घुले, विकास नाना दांगट आदींनी पत्रकार परीषदेत समाविष्ट गावांतील मिळकत कराचा प्रश्न मांडला. महापालिका हद्दीत समाविष्ट केलेल्या ३४ गावांपैकी फुरसुंगी व देवाची उरुळी ही दोन गावे वगळून तेथे नगरपालिका स्थापन केली जाणार आहे. याबाबतच अध्यादेश गेल्या आठवड्यात राज्य सरकारने जारी केला. त्यापाठोपाठ आता उर्वरीत ३२ गावांतील मिळकत कराचा प्रश्न समोर आला आहे.

याबाबत कृती समितीच्या सदस्यांनी बाजू मांडली. या गावांत पुर्वी ग्रामपंचायत होती. तेव्हा भरावा लागणारा मिळकत कर व महापालिका हद्दीत गाव समाविष्ट झाल्यानंतर भरावा लागणारा मिळकत कर यात मोठा फरक आहे. महापालिकेने मिळकत कर आकारणी करताना, जवळील गावातील मिळकत कराच्या दराचा आधार घेतला आहे. यामुळे आमच्या निवासी व व्यावसायिक मिळकतींना पूर्वी येणाऱ्या करात सुमारे दहा ते बारा टक्के इतकी वाढ झाली आहे. हा मिळकत कर जास्त असल्याने तो भरू शकत नाही, त्यामुळे आम्ही 'गाव विकणे' हे आंदोलन सुरु केले आहे. याबाबतचे फलक गावांगावात लावले गेले आहेत. पुढील टप्प्यात आम्ही महापालिकेला टाळे ठोकणार आहोत.


महापालिका जुलमी कर आकारणी करीत आहे, मिळकती जप्त करण्यास सुरुवात केली आहे. त्याचा आम्ही निषेध करतो, महापालिकेनेच आमचे गाव विकत घ्यावे, आमचा टॅक्स महापालिकेनेच भरावा अशा भावना आमच्या झाल्या आहेत, असे सदस्यांनी नमूद केले. कल्याण डोंबिवली महापालिकेत समाविष्ट केलेल्या गावांचा राज्य सरकारने मिळकत कर माफ केला, मग पुणे महापालिकेत समाविष्ट केलेल्या गावांवर अन्याय का ? पुर्वी ज्या प्रमाणे ग्रामपंचायतीचा कर होता, तोच दुप्पट करून तेवढाच कर आमच्याकडून घ्यावा अशी आमची मागणी आहे. या मागणीकडे दुर्लक्ष केले तर आगामी विधानसभा निवडणुकीत आम्ही मतदानावर बहीष्कार टाकू असा इशारा समितीने दिला आहे.

> "या गावांचा नियोजनबद्ध विकास व्हावा यासाठी ही गावे महापालिकेत समाविष्ट करावी अशी आम्ही मागणी केली होती. परंतु महापालिकेत समाविष्ट झाल्यानंतर आमचा भ्रमनिरास झाला आहे." - **श्रीरंग चव्हाण**

> महापालिकेच्या विरोधात समाविष्ट गाव कृती समितीने भुमिका घेतली आहे. मिळकत कराला विरोध केला जात आहे, यासंदर्भात महापालिकेच्या मिळकत कर विभागाचे उपायुक्त माधव जगताप म्हणाले, " राज्य सरकारच्या आदेशानुसार समाविष्ट गावांत मिळकत कर आकारणी करताना ती २० टक्के, चाळीस टक्के, साठ टक्के अशी टप्प्या टप्प्याने केली जात आहे. सदर कृती समितीबरोबर चर्चा केली जाईल. - **माधव जगताप,** उपायुक्त

# पारगांव परिसरात पावसाचा हाहाकार....

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पारगांव :** "पारगाव बाजारपेठेतील दुकानात शिरले पाणी व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान. पारगाव बाजारपेठेतील दुतर्फा पाण्याच्या चाऱ्या होणे गरजेचे असून तसेच काही ठिकाणी या चाऱ्या होऊ न दिल्याने ह्या अशा नैसर्गिक समस्यांना वारंवार सामोरे जावे लागत आहे अशी व्यापाऱ्यांच्यातून चर्चा आहे.

गेली चार दिवस सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतीतही मोठ्या प्रमाणात पाणी साठले आहे. तर दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जनावरांच्या चाऱ्याच हि नुकसान झाल्याचे पाहायला मिळत आहे.

तर शेतामध्ये गुडघ्या एवढं पाणी साचले असुन कांद्याची टाकलेली रोपे, भाजीपाला, ऊस, बाजरी या पिकांचेही मोठं नुकसान होण्याची दाट शक्यता आहे, या मुसळधार पावसाने दौंड तालुक्यातील अनेक ठिकाणी ओढ्या नाल्यांना नदीचे स्वरूप आले आहे.

## आभाळाचे अच्छादन

छायाचित्र-विजयकुमार हरिश्चंद्रे



**जेजुरी :** जयाद्री डोंगर माथ्यावर आभाळाचे अच्छादन ...हवामान खात्याने पावसाचा अंदाज दिल्याने बुधवारी ढगफुटी सदृश्य स्थिती निर्माण होऊन दुपारी पाऊसही कोसळला जेजुरी खंडोबा गडावरून घेतलेले हे दृश्य

# शिक्षणातून ज्ञानसंपन्न होण्यासाठी कर्मवीरांनी शिक्षणाची निर्मिती केली : किशोरी सातव



**नीरा :** अशिया खंडातील सर्वात मोठी रयत शिक्षण संस्था असून कर्मवीर आण्णांनी स्वावलंबनाचे धडे दिले. सार्वजनिक जीवनात आपण चांगले वागून कर्मवीरांचे विचार आचरणात आणावं. विद्यार्थ्यांनी शिक्षणातून केवळ पदव्या न मिळविता , तो ज्ञानसंपन्न, गुणसंपन्न, नितीमान व चारित्र्यवान व्हावा यादृष्टीने कर्मवीर आण्णांनी शिक्षणाची निर्मिती केली असे प्रतिपादन किशोरी सातव यांनी केले.

नीरा ( ता.पुरंदर) येथील रयत संकुलातील महात्मा गांधी विद्यालय, किलाचंद कनिष्ठमहाविद्यालय, सौ. लिलावती रिखवलाल शहा कन्या विद्यामंदिर व रयत इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी ( दि.२४) राधाकृष्ण मंगल कार्यालयात डॉ. पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७ व्या जयंती सोहळा समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नीलकंठेश्वर विद्यालय लासुर्णे येथील उपशिक्षिका किशोरी सातव उपस्थित होत्या. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या पश्चिम विभागाचे विभागीय अधिकारी संजय मोहिते होते .

यावेळी डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पुजन तसेच दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . यावेळी स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य लक्ष्मणराव चव्हाण, चित्रा शहा, दत्तात्रय चव्हाण,अनिल चव्हाण, रेणुका कोठडीया, संतोष गांधी, अँड.आदेश गिरमे,

कांचन निगडे, डॉ.विनय दगडे, तनुजा शहा, बापूसाहेब पाटोळे, पांडुरंग तरंगे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिष्यवृत्ती व एसएससी परीक्षेत प्रथम तीन क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले .

संजय मोहिते म्हणाले की, कर्मवीर अण्णांनी गोरगरीब मुलांच्यासाठी रयत शिक्षण संस्था सुरू केली. स्वावलंबनाचे धडे दिले. आपण ज्या शाळेत शिकलो त्या शाळा विषयी, संस्थेविषयी आपण कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे असे सांगून नीरा येथील कन्या शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी विभागाकडून भरीव निधी उपलब्ध करून दिला जाईल असे आश्वासित केले. प्रास्ताविक कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका निर्मला नायकोडी यांनी केले तर आभार महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य अर्जुन कोकरे यांनी मानले.

### नीरेत कर्मवीर अण्णांच्या जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा

● नीरा गावाला ग्रामप्रदक्षिणा घालत कर्मवीर आण्णांच्या प्रतिमेची रविवारी (दि.२२)भव्य शोभा यात्राकाढण्यात आली होती. शोभायात्रेत कन्या शाळेतील विद्यार्थ्यिनींनी विविध वेशभूषा साकारून दांडिया, नृत्य सादर केले होते. ढोल लेझीम, झांज, टिपरी, वारकरी आदी पथके शोभायात्रेत सहभागी होते. यावेळी ठिकठिकाणी मान्यवरांनी कर्मवीर आण्णांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# पुणे ते शिवनेरी सायकल राईडचे आयोजन; ३७५ सायकलस्वार सहभागी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जुन्नर :** छत्रपती शिवाजी महाराजांचे आग्रा येथून सुटका या ऐतिहासिक घटनेच्या निमित्ताने इंडो अथलेटिक्स सोसायटीतर्फे दरवर्षी पुणे ते शिवनेरी असे २०० किमी सायकल राईड चे आयोजन होते यावर्षी 375 सायकल स्वरांनी यामध्ये सहभाग घेतला. सदर वर्ष पुणे ते शिवनेरी या राईडचे चौथे वर्ष आहे , पर्यावरण आणि आरोग्य या दोन्हींचा संदेश समाजामध्ये देत सदर सायकल स्वारी मार्गक्रमन करते. एका दिवसामध्ये तब्बल 100 किलोमीटर अंतर पाच ते सहा तासांमध्ये पार केले. मोशी येथील गोडाऊन चौक येथून सकाळी सहा वाजता सदर सायकल राईडला झेंडा दाखवून सुरुवात झाली यावेळी एमआयडीसी चे अधिकारी प्रकाश शेडबाले त्याचप्रमाणे आय ए एस चे गजानन खैरे, अजित पाटील, गणेश भुजबळ उपस्थित होते.

आग्र्याहून सुटका या ऐतिहासिक प्रसंगाला इतिहासात अतिशय महत्त्व आहे छत्रपती शिवाजी महाराज आग्रा येथून 17 ऑगस्ट 1666 साली सुटले होते या घटनेला यावर्षी 357 वर्ष पूर्ण झाली तेराशे किलोमीटर अंतर तेरा दिवसांमध्ये पार करुन राजगडावर 30 ऑगस्ट रोजी पोचले होते याच महाराजांच्या पराक्रमाला मानवंदना देण्यासाठी आम्ही दरवर्षी पुणे ते शिवनेरी राईड आयोजित करतो असे आय ए एस चे संस्थापक सदस्य आणि इतिहास अभ्यासक गणेशजी भुजबळ यांच्यातर्फे सांगण्यात आले. इतिहास तज्ञ व जुन्नर येथील उद्योजक यश मस्करे यांनी देखील जुन्नर तालुक्यामध्ये सर्वांचे स्वागत केले.

पुणे ते शिवनेरी सायकल मार्ग - नाशिक फाटा - राजगुरुनगर - मंचर - नारायणगाव - शिवनेरी. असा होता .अष्टविनायका मधील लेण्याद्री करून सर्व साईकलिस्ट ओझर येथे मुक्कामसाठी गेले आणि दुसऱ्या दिवशी याच मार्गावरून परतीचा प्रवास संपन्न झाला. असे आय ए एस शिवनेरी सायकल राईडचे प्रमुख रमेश माने व मदन शिंदे यांच्या तर्फे सांगण्यात आले. नियोजनामध्ये गिरीराज उमरीकर, सुशील जी मोरे, दादासाहेब नखाते, प्रतीक पवार, श्रेयस पाटील ,अजित गोरे, प्रणय कडू , एडवोकेट पंजाबराव इंगळे, मुकुंद दांगट पाटील, हनुमंतराव शिंदे, कैलास शेट तापकीर आदींनी महत्त्वाची भूमिका बजावली. श्रीराज हॉटेल तर्फे सर्वांना मसाला दूध वाटप करण्यात आले.

## थकीत पाणीपट्टीची पन्नास टक्के रक्कम माफ करण्याचा निर्णय

# पौडकरांची पाणीपट्टीच्या अवाजवी बिलापासून सुटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुळशी प्रादेशिक योजनेतून पाणीपुरवठा होणाऱ्या पौड ग्रामपंचायतीच्या थकीत पाणीपट्टीची पन्नास टक्के रक्कम माफ करण्याचा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला आहे. त्यामुळे पौड ग्रामपंचायतीची थकबाकीची रक्कम 88 लाख 75 हजार रुपयांनी कमी होणार आहे. याबाबत जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अमित कंधारे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. पौडचे माजी सरपंच प्रमोद शेलार यांनीही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे याबाबत निवेदन दिले होते.

जलशुद्धीकरण आणि महावितरणच्या वीजबिलाचा खर्च ग्रामपंचायतच करीत असतानाही अतिरिक्त वीजबिलाचा भुर्दंड ग्रामपंचायतीला सोसावा लागत होता. गावाला गुरुत्वाकर्षण पद्धतीने पाणीपुरवठा होत असल्याने पाणीपट्टीचा दरही हजारी 20 रुपयांवरून पाच रुपये करण्यात आला आहे. या निर्णयामुळे पौड ग्रामपंचायतीची पाणीपट्टीच्या अवाजवी



बिलापासून सुटका होणार आहे.

मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून गुरुत्वाकर्षण (ग्रॅव्हिटी) पद्धतीने पौड गावाजवळील टाकीत पाणी पुरवठा होतो. त्यानंतर ग्रामपंचायत गावासाठी आणि विठ्ठलवाडीसाठी दररोज नऊ लाख लिटरचा पाण्याचा उपसा करुन पाणीपुरवठा करते. यासाठी ग्रामपंचायतीने साठवण टाक्यांची सोय केली आहे. महावितरणचे वीजबिल आणि जलशुद्धीकरणाचा स्वतंत्र खर्च पौड ग्रामपंचायत करीत असताना प्रशासन ग्रामपंचायतीवर अतिरिक्त पाणीपट्टीची रक्कम लादत होते. विठ्ठलवाडीचाही याच ग्रामपंचायतीत समावेश होतो. तसेच पौड गावात असलेल्या शासकीय कार्यालयांकडे पाणीपट्टीबाबत वारंवार पाठपुरावा करून त्यांच्याकडून पाणीपट्टी मिळत नाही. त्याचाही भुर्दंड पौड ग्रामपंचायतीलाच सोसावा लागतो. ऑगस्ट महिनाअखेर पौडची पाणीपट्टीची थकीत रक्कम सुमारे एक कोटी 41 लाख 70 हजार रुपयांपर्यंत पोचली होती. पाणीपट्टीचा अतिरिक्त भार कमी करावा त्याचप्रमाणे पाणीपट्टी हजारी पाच रुपयांप्रमाणे आकारण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी ग्रामसभेत केली होती.

अमित कंधारे, नियोजन समिती सदस्य या निर्णयामुळे पौड ग्रामपंचायतीचा पाणीपट्टीचा ताण कमी झाला आहे. पाणीपट्टीचा दरही हजारी 20 रुपयांवरून पाच रुपये करण्यात आला आहे. यामुळे पाणीपट्टीची रक्कम जास्त वाढणार नाही.

#रा

## अखेर जुन्नर येथे शेषण कोर्ट सुरु होणार

**नारायणगाव :** जुन्नर येथे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ सत्र न्यायालयाची स्थापना व्हावी अशी मागणी आमदार अतुल बेनके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली होती, या मागणीला राज्य सरकारने आज (दि. 23) रोजी झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत निर्णय झाला असल्याची माहिती जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनी दिली. जुन्नर येथे शेषण कोर्ट सुरु होणार असल्याने पक्षकांराना खेडला जाण्याचा हेलपाटा वाचणार आहे. आमदार अतुल बेनके यांनी आणि इतर पदाधिकारी यांनी स्वागत केले आहे.

» Selected



## शिक्रापूरात श्वानाला वाचवण्यासाठी धावली तरुणाई

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. येथील वेळ नदीच्या बंधाऱ्यात बुडून सुटकेसाठी जीवाची बाजी लावणाऱ्या श्वानाला वाचवण्यासाठी गावातील तरुणाई पुढे आली आणि या तरुणांनी नदिवरील बंधाऱ्यात बुडालेल्या श्वानाचे मोठ्या शिताफिने प्राण वाचवत श्वानाला जीवदान दिले आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील वेळ नदीला पाणी असल्याने काही तरुण नदीकडे फेरफटका मारण्यासाठी गेलेले असता तरुणांना बंधाऱ्याजवळ एक श्वान पाण्यात पडून मोठमोठ्याने ओरडत जीव वाचवण्यासाठी धडपडत असल्याचे दिसले, याबाबतची माहिती मिळताच निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, युवा उद्योजक प्रतीक केवटे, विशाल लोखंडे, रितेश मुजमुले, प्रशांत वाबळे, अभिषेक मुजमुले, महेश कळमकर, ललित खैरे, रियाज अन्सारी यांनी नदीकडे धाव घेत मोठ्या शिताफिने पाण्यात पडलेल्या श्वानाला बाहेर काढले, दरम्यान सदर श्वान भुकेलेले असल्याचे लक्षात येताच सदर युवकांनी त्याला पाव खायला घातले असता श्वानाने पावावर चांगलाच ताव मारला आणि त्यांनंतर ते श्वान सर्व युवकांकडे पाहत आनंदाने मुक्त झाले.



## श्री गणेश ग्रामीण पतसंस्थेच्या चेअरमनपदी अतुल वाबळे

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील श्री गणेश ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी अतुल शशिकांत वाबळे तर व्हाईस चेअरमन पदी अनिता प्रकाश चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील श्री गणेश नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक यापूर्वी पतसंस्थचे संस्थापक माजी सरपंच आबासाहेब करंजे, बापूसाहेब जकाते यांसह आदींच्या यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध पार पडली असताना चेअरमनपदी रावसाहेब करंजे व व्हाईस चेअरमनपदी विलास भालके यांची बिनविरोध निवड करण्यात आलेली असताना नुकतेच चेअरमन व व्हाईस चेअरमन यांनी राजीनामा दिल्याने रिक्त जागेच्या निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक प्रशांत पिसाळ व सचिव रमेश राऊत यांच्या नियंत्रणाखाली चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवडणूक घेण्यात आली, यावेळी मावळते व्हाईस चेअरमन विलास भालके, शेखर करंजे, शेरखान शेख, अमोल बैलभर, जालिंदर मांढरे, अतुल वाबळे, प्रकाश सोंडे, रेणुका थिटे, अनिता चव्हाण, संदीप लांडे हे उपस्थित होते, दरम्यान क्त पदासाठी पदी चेअरमन पदासाठी अतुल वाबळे व व्हाईस चेअरमनपदासाठी अनिता चव्हाण यांनी अर्ज दाखल केला होता.

## राज्यपाल राधाकृष्णन यांना आ. संजय जगतापांचे निवेदन

**सासवड :** पुण्याच्या दौ-यावर आलेल्या राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची आमदार संजय जगताप यांनी भेट घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात लोकप्रतिनिधी विशेषाधिकार आणि अवमानाबाबत कारवाई करण्याबाबत निवेदन दिले आहे. पुरंदर तालुक्यातील नागरीकांच्या प्रश्नांबाबत



सासवड येथे पुर्व नियोजन करून आयोजित केलेल्या आमसभेच्याच दिवशी मुख्यमंत्री महोदयांनी मुंबई येथील सह्याद्री अतिथी गृहात पुरंदरच्या प्रश्नांबाबत बैठक आयोजित केली. त्याबाबत आमदार संजय जगताप यांना माहीती मिळाल्यावर त्यांनी पत्र पाठवून आणि मुख्यमंत्री महोदयांच्या स्वीय सहाय्यकांशी भ्रमणध्वनीव्दारे चर्चा करून याच दिवशी पुरंदर तालुक्यात आमसभा असून मुंबई येथील सदर बैठक रद्द करून पुढे ढकलण्याची विनंती केली होती. असे असतानाही लोकप्रतिनिधी शिवाय मा मुख्यमंत्र्यांनी दहा मिनिटांची बैठक घेतली. आमसभा असताना त्या मतदारसंघाबाबत इतर कोणत्याही शासकीय बैठकीचे आयोजन करू नये या परंपरेचा जाणीखेडवपुर्वक उल्लंघन केला. ही बाब संसदीय लोकशाहीला घातक असून जनतेतून निवडूण आलेल्या विधानसभा सदस्यांचा व विधानसभेच्या सार्वभौम सभागृहाचा अवमान करणारी असल्याचे पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांनी महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांना सांगत महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांविरोधात विशेषाधिकारभंग व अवमानानाची तक्रार समक्ष भेटून पत्र देऊन केली होती. मात्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आमदार संजय जगताप यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात केलेल्या लोकप्रतिनिधी विशेषाधिकार आणि अवमानाबाबतची याचिका फेटाळली असल्याने याविरोधात आमदार संजय जगताप यांनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची भेट घेत कारवाई संदर्भात निवेदन दिले आहे.

**जाहीर नोटीस - कुलमुखत्यारपत्र रद्द करणेबाबत**

सर्व लोकांना कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतींबाबत आमचे अशिल नामे श्री. ओमवीर शंकरराव महाडिक रा. फ्लॅट नं. ९०१, एपिटमी, स. नं. १२९/व१ व स. नं. १२९/व२, वाकड, पुणे यांनी श्री निखिल शिरीष जोशी, रा. १७८, रुईकर कॉलनी, कोल्हापूर – ४१६००५. यांचे लाभात खालील नमुद मिळकतीबाबत दिनांक १५/०६/२०२४ रोजी तुमच्याकडून विनामोबदला कुलमूखत्यारपत्र लिहून घेतलेला आहे. दस्त क्र. १३२१७/२०२४ दुय्यम निबंधक हेवली क्र. २२ येथे नोंदविण्यात आलेला होता.
सदरील कुलमुखत्यारपत्र अन्वये नेमुन दिलेली कामे विहित मुदतीत पुर्ण न केल्यामुळे सदरील दस्तांच्या अटी व शर्तीचा भंग झाल्यामुळे व वैयक्तिक कारणामुळे सदरील दस्त हे आज रोजी प्रस्तुत नोटीसव्दारे आमचे अशिल रददबातल करत असून त्याव्दारे दिलेले संपूर्ण अधिकार काढून घेत आहेत. सदर आज रोजी पासुन खालील नमुद मिळकतीसंदर्भात सदर मुखत्यारपत्राच्या आधारे कोणत्याही प्रकारचे व्यवहार केले असल्यास सदर व्यवहारास आमचे अशिल जबाबदार नसतील. तसेच सदरील मुळ कुलमुखत्यारपत्र दस्त व इतर कागदपत्रे यांचा कोणताही गैरवापर न करता परत मागवत आहेत. तरी सदर कुलमुखत्यार या दस्तांव्दारे कोणाचीही फसवणुक होवु नये म्हणुन ही नोटीस दिली असे.
**परिशिष्ट – मिळकतीचे वर्णन : अ.** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील मे. दुय्यम निबंधक हवेली यांचे हद्दीतील तसेच पुणे महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे स. नं. १२९/व१, व स. नं. १२९/व २ वाकड येथील ही मिळकत यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे ; **पूर्वेस :** स. नं. १२९ ची उर्वरीत मिळकत, **दक्षिणेस :** स. नं. १२८ ची उर्वरीत मिळकत, **पश्चिमेस :** स. नं. १२९ ची उर्वरीत मिळकत व २४ मी वाईड डीपी रोड, **उत्तरेस :** स. नं. १२९ ची उर्वरीत मिळकत **ब.** वर कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर बांधलेल्या एपिटमी या इमारतीमधील नवव्या मजल्यावरील फ्लॅट नं. ९०१ यांसी कार्पेट क्षेत्र १७५.८० चौ. मी. म्हणजेच १६७७ चौ. फुट लागुन टेरेस क्षेत्र ७.०६ चौ. मी. म्हणजेच ७६ चौ. फुट तसेच २ कव्हर्ड कार पर्किंगसह ही मिळकत रददबातल कुलमूखत्यार दस्ताचा विषय असे.
येणेप्रमाणे चतु:सीमापुर्वक मिळकत कुलमुखत्यारपत्र रद्द केलेली जाहिर नोटीस दिली असे. **पुणे, दि. २५/०९/२०२४**

**अॅड.अमोल बाबुराव आलमन, LL.B – ऑफिस नं. ६०४, कोटीभास्कर बिझनेस कोर्ट, करिश्मा सोसायटीसमोर, कोथरुड, पुणे ४११०३८. मो.: ९९२३५८५४५०**

### महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षात

# पोलीस एन्काउन्टरमध्ये 34 जणांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बदलापूर येथील बालिकेवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याची पोलिसांसोबत एन्काउन्टर घटनेबाबत सध्या देशात चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षात तब्बल ३४ आरोपी पोलीस एन्काउन्टरमध्ये मारले गेले असल्याचं सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट होतं. केंद्रीय गृहराज्य मंत्री नित्यानंद राय यांनी ऑगस्ट २०२३ मध्ये ही आकडेवारी राज्यसभेच्या पटलावर मांडली होती. राय यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार १ एप्रिल २०१७ ते १० मार्च २०२२ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस दलाच्या चकमकीत ३४ मृत्यू झाल्याचे गुन्हे दाखल झाले आहेत. यातील बहुतांश चकमकी या नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात घडल्या आहेत.

बदलापूर येथील शाळेत कंत्राटी सफाई कामगार २४ वर्षीय अक्षय शिंदे याने बदलापूर येथील एका शाळेच्या शौचालयात दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. या आरोपावरून त्याला १७ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली होती. एका गुन्ह्याच्या तपास करण्यासाठी सोमवारी अक्षय शिंदे याला तळोजा जेलमधून बदलापूर येथे नेले जात होते. परंतु पोलिसांचे वाहन ठाणे जवळच्या मुंब्रा बायपासजवळून जात असताना त्याने पोलिसांकडून बंदूक हिसकावून पोलीस व्हॅनमध्ये बसलेल्या एका सहाय्यक पोलिस निरीक्षकाला गोळी घालून जखमी केले होते. त्यानंतर त्याच वाहनात बसलेल्या आणखी एका दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्याने प्रत्युत्तरादाखल अक्षय शिंदेवर गोळीबार केला होता. अक्षय शिंदेला कळवा येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले होते. या घटनेच्या वेळी आरोपी अक्षय शिंदे याचे हात मोकळे होते, असं बोललं जातं. यावर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित म्हणाले, 'न्यायालयाच्या आदेशानुसार न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान पोलीस आरोपीचे हात बांधू शकत नाही. पण हात मोकळे ठेवल्यामुळे आरोपींना पोलिस दलावर हल्ला करण्याची संधी मिळते, असं मला वाटतं' असं दीक्षित म्हणाले. दरम्यान, अशा गंभीर प्रकरणांची न्यायालयाने जी ऑनलाइन सुनावणी घ्यावी, अशी सूचना दीक्षित यांनी केली.

#### वर्षभरातील एन्काउंटरची संख्या

● देशभरात १ एप्रिल २०१६ ते १० मार्च २०२२ या कालावधीत झालेल्या एकूण पोलीस एन्काउंटरपैकी केवळ आसाममध्ये एका प्रकरणात शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली होती. महाराष्ट्रात पोलिसांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे नित्यानंद राय यांनी राज्यसभेला सांगितले होते. या



कालावधीत संपूर्ण भारतात पोलिस चकमकीत एकूण १०७ मृत्यूच्या घटना घडल्या असून राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने ७ कोटी १६ लाख ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याची शिफारस केली आहे. दरम्यान, १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत महाराष्ट्रात एकूण ८० आरोपींचे पोलिस कोठडीत मृत्यू झाले असल्याची माहितची नित्यानंद राय यांनी गेल्यावर्षी ऑगस्टमध्ये लोकसभेत दिली होती.

## बदलापूर-नवी मुंबई प्रवास २० मिनिटांत!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने ठाणे, नवी मुंबईकरांना नव्या प्रकल्पांची भेट दिली आहे. बदलापूर-नवी मुंबई विमानतळ प्रवास अतिवेगवान आणि सुकर करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून बदलापूर-नवी मुंबई विमानतळ दरम्यान प्रवेश नियंत्रण मार्ग (ॲक्सेस कंट्रोल रोड) बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२० किमीच्या मार्गासाठी १०,८३३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा मार्ग सेवेत दाखल झाल्यास बदलापूर-नवी मुंबई अंतर केवळ २० मिनिटांत पार करता येणार आहे. बदलापूर-नवी मुंबई प्रवेश




नियंत्रण मार्गाच्या प्रस्तावाला मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'एमएमआरडीए'च्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे हा मार्ग प्रस्तावित विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेशी जोडला जाणार आहे. त्यामुळे नवी मुंबई-बदलापूर आणि पुढे विरार-अलिबाग असाही अतिवेगवान प्रवास करता येणार आहे. बदलापूर, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ आणि नवी मुंबईचा झपाट्याने विकास होत आहे.

## राज्यातील आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ, बालेवाडी डिफॉल्ट यादीत

**पुणे :** यूजीसीने विद्यापीठांना नियमानुसार लोकपाल नियुक्त करण्याची सूचना केली होती. परंतु, दिलेल्या मुदतीनंतरही विद्यापीठांनी नियमांची पूर्तता केली नाही. त्यात महाराष्ट्रासह यूपी, पंजाब, तेलंगणा, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, दिल्ली, गुजरात, कर्नाटक, ओडिशा, केरळ, पंजाब आदी राज्यांमधील विद्यापीठांचा डिफॉल्ट यादीत समावेश केला आहे. या विद्यापीठांची यादी यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी जाहीर केली आहे.

विद्यार्थ्यांच्या तक्रारी सोडवण्यासाठी लोकपाल नियुक्त न केल्याबद्दल विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने 31 विद्यापीठांची नावे डिफॉल्ट यादीत



समाविष्ट करून सार्वजनिक केली आहेत. यामध्ये राज्यातील आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ, बालेवाडी या विद्यापीठाचा समावेश आहे.

देशातील प्रसिद्ध विद्यापीठांपैकी आंध्र प्रदेशातील डॉ. एन. टी. आर. युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस, जवाहरलाल टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, झारखंडमधील रांची युनिव्हर्सिटी, कर्नाटक राज्यातील चार, ओडिशाच्या चार, पश्चिम बंगालच्या तीन अशा विविध राज्यांमधील मिळून 31 विद्यापीठांचा समावेश केला आहे.

यापूर्वीही यूजीसीने देशातील 256 राज्य विद्यापीठे 162 खासगी विद्यापीठे, दोन डीम्ड-टू-बी विद्यापीठे आणि एक केंद्रीय विद्यापीठ मिळून जवळपास 421 विद्यापीठांची यादी जाहीर केली होती. त्यानंतर अनेक विद्यापीठांनी लोकपालांची नियुक्ती केल्याचे दिसून आले होते. आता पुन्हा एकदा यूजीसीने विद्यापीठांची यादी जाहीर करून लोकपाल नियुक्तीसंदर्भात निर्देश दिले आहेत.

गुणवत्तेनुसार प्रवेश, प्रवेश अनियमितता, अकारण प्रवेश नाकारणे, अधिकची शुल्क वसुली, आरक्षण नियमांची अंमलबजावणी न करणे, भेदभावपूर्ण वर्तन, शिष्यवृत्ती प्रकरणे, वेळापत्रकानुसार परीक्षा न घेणे, निकाल वेळेत न लावणे, सुविधा न पुरवणे आदींबाबतच्या तक्रारी लोकपाल यांच्या कक्षेत येतात. महाविद्यालयस्तरावर तक्रार निवारण समितीचे प्राचार्य अध्यक्ष असतात. विद्यापीठस्तरावरही तक्रार निवारण समिती आहे. पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांकडून तक्रारी येतात. त्याचा तत्काळ न्यायनिवाडा केला जातो. परंतु, या ठिकाणी आलेल्या तक्रारींचे निवारण न झाल्यास ते लोकपाल यांच्याकडे न्याय मागू शकणार आहेत. विद्यार्थ्यांच्या अडचणी, तक्रारी सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधींकडे जाण्याची आता आवश्यकता भासणार नाही.

## » Selected

### सोलापूर विमानसेवेचा पंतप्रधानांच्या हस्ते उद्या प्रारंभ

**सोलापूर :** सोलापूरच्या बहुप्रतीक्षित नागरी विमानसेवेला मुहूर्त अखेर मिळाला असून येत्या २६ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे सोलापूरच्या नागरी विमानसेवेचा शुभारंभ होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राज्यात विविध विकासकामांच्या शुभारंभासह भूमिपूजनांचा धूमधडाका सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून सोलापूर विमानसेवेचा शुभारंभ घाईगडबडीत उरकला जात आहे. केंद्र सरकारने यापूर्वी १५ जून २०१६ रोजी उडान योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातच सोलापूर विमानसेवेला मंजुरी दिली होती. परंतु त्या अनुषंगाने सोलापूरच्या छोटेखानी विमानतळावर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याने उडान योजना सोलापूरकरांसाठी कागदावर राहिली होती.

### युवासेना सचिव दिपेश म्हात्रे यांना जीवे ठार मारण्याची धमकी

**डोंबिवली :** शिवसेनेचे (शिंदे गट) युवासेना प्रदेश सचिव आणि कल्याण डोंबिवली पालिकेचे माजी स्थायी समिती सभापती दिपेश पुंडलिक म्हात्रे यांना 'तुमची अवस्था महेश गायकवाड यांच्यासारखी करू', अशाप्रकारच्या धमक्या संबंधित पक्षाच्या काही पदाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. अशाप्रकारे धमक्या देऊन आपणास ठार मारण्याचा इशारा देण्यात आला आहे, अशी तक्रार शिवसेना युवासेना सचिव दिपेश पुंडलिक म्हात्रे यांनी ठाणे पोलीस आयुक्तांकडे केली आहे. पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात प्रदेश सचिव दिपेश म्हात्रे यांनी म्हटले आहे, गेल्या काही दिवसांपासून डोंबिवली विधानसभा मतदारसंघात काही मंडळी पक्षाच्या नावाखाली दहशत माजवून समाजात दडपशाही निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

### कल्याणमध्ये पूर्ववैमनस्यातून तरूणाचा खून

**कल्याण :** मलंगगड रस्त्यावर सोमवारी रात्री पूर्ववैमनस्यातून आयुब शेख या तरूणाचा चार जणांनी निर्घृणपणे खून केला. कोळसेवाडी पोलिसांनी चार जणांवर गुन्हा दाखल केला आहे. सुजल जाधव, भावेश शिंदे या आरोपींना अटक केली आहे. फरार झालेल्या दिनेश लंके, अजित खाडे या आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. मयत आयुब शेख कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी भागात राहतो. त्याचे याच भागातील आरोपी तरूणांबरोबर वाद होता. हा वाद दोन्ही बाजुने मिटवण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे आरोपींनी आयुबला लक्ष्मीनगर भागात बोलविले होते. आयुब सोबत त्याचे मित्र सुजर चटोले, परंतु, आयुबला काही समजण्याच्या आत दिनेश, अजितने आयुबाल लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण सुरू केली.

## राष्ट्रपुरुष, समाजसुधारकांच्या पंक्तीत मेटे, आनंद दिघेंना स्थान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना समाजसुधारक आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्वांची नावे देताना कौशल्य विकास विभागाने महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, संत गाडगे महाराज अशा समाजसुधारकांच्या पंक्तीत चक्क शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष दिवंगत विनायक मेटे व शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख दि. आनंद दिघे यांनाही मानाचे स्थान दिले आहे.

राज्यातील १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नावे बदलण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. अमरावती आटीआयला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज याचे नावे देण्यात आले होते. तसेच पुलगाव येथील आयटीआयला



हरदयाल औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नाव देण्यात आले होते.

मात्र आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मतदारांना खूश करण्यासाठी शिक्षण किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांशी सबंधित नसलेल्या व्यक्तींची नावे केवळ राजकीय लाभ समोर ठेऊन आयआटीआय संस्थांना देण्यात आल्याचे समोर आले आहे.

यानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था बीडचे नाव 'कै. विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था' असे करण्यात आले. अशाचप्रकारे ठाणे येथील आयटीआयचे धर्मवीर आनंद दिघे औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामकरण करण्यात आले आहे.

## मुंबई मेट्रो 3

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



» मुंबई मेट्रो ३ आता लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. आरे- बीकेसी दरम्यान चालवल्या जाणाऱ्या या मेट्रो ३ च्या पहिल्या टप्प्याचे काही दिवसांमध्ये उद्घाटन होणार आहे.

### कृषी कायद्यांवर कंगनाचं पुन्हा वादग्रस्त वक्तव्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेत्री आणि हिमाचलच्या मंडी मतदारसंघातील भाजप खासदार कंगना रणौत पुन्हा एकदा आपल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत आल्या आहेत. 'केंद्र सरकारने रद्द केलेले कृषी कायदे पुन्हा लागू करण्यात यावे, या कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी शेतकऱ्यांनीच करावी', असे त्यांनी म्हटले आहे. कंगना यांच्या या वक्तव्यावर शेतकरी संघटनांसह विरोधकांनी टीका केली आहे. कृषी कायद्याबाबत कंगना रणौत यांनी केलेले वक्तव्याची सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. परंतु, कंगना यांच्या वक्तव्याचे भाजप समर्थन करत नाही. हे त्यांचे वैयक्तिक विधान आहे, असे भाजप नेते असे गौरव भाटिया यांनी म्हटले. त्यानंतर कंगना यांनीही हे त्यांचे वैयक्तिक मत असल्याचे सोशल मीडियाच्या माध्यमातून स्पष्ट केले.

### महाराष्ट्र किनारपट्टीसह कर्नाटक आणि गोव्यात अतिवृष्टी

## मुंबईसह कोकणात जोरदार पावसाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पालघर :** महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने धुमाकूळ घातला आहे. मुंबईसह शेजारच्या जिल्ह्यांमध्ये वादळ आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत आहे. याच पार्श्वभूमीवर हवामान विभागाने आज रायगडसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर, मुंबईसह, पालघर, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, अहमदनगर आणि वाशीमसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून विजांच्या कडकडाटासह आणि सोसाट्याचा वाऱ्यांसह मुसळधार ते अत्यंत मुसळधार पाऊस आणि वादळाचा अंदाज आहे.

सोमवारी सकाळी पावसाचे पुनरागमन होण्यापूर्वी मुंबई शहरात दीर्घकाळ कोरडेपणा जाणवला. त्यानंतर पावसाला सुरुवात झाली. असाच पाऊस मंगळवारीही दिसून आला.

हवामान विभागाने २६ सप्टेंबर रोजी पालघरसाठी रेड अलर्ट जारी केला आहे, ज्यामध्ये वेगळ्या ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस आणि गडगडाटी वादळाचा अंदाज आहे. मंगळवारी संध्याकाळी ५.३० वाजेनंतर मुंबईत तसेच ठाणे आणि नवी मुंबईत मुसळधार पावसाने हजेरी लावली.

ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस संध्याकाळी सुरू झाला आणि रात्रभर कायम राहिला.मुंबईची पाण्याची गरज भागवणाऱ्या सात तलावांमधील पाणीसाठा मंगळवारी सकाळी ९८.२८ टक्के किंवा एकूण क्षमतेच्या १४.२२ लाख दशलक्ष लिटर इतका वाढला. मुंबईत मान्सून माघारीची अधिकृत तारीख १० ऑक्टोबर आहे.



#### देशाचे हवामान

● भारतीय हवामान खात्याने पुढील काही दिवस महाराष्ट्र किनारपट्टीसह कर्नाटक आणि गोव्यात अत्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. याव्यतिरिक्त, ईशान्य भारत, मध्य भारत आणि पूर्व भारतात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. नैऋत्य मोसमी पावसाने कच्छ आणि पश्चिम राजस्थानच्या काही भागांतून आधीच माघार घेतली आहे. आज यानाम, तेलंगणा आणि किनारी आंध्र प्रदेशात मुसळधार पाऊस पडू शकतो. उत्तर कर्नाटक आणि रायलसीमामध्येही पाऊस पडेल. माहे, केरळ, दक्षिण अंतर्गत कर्नाटक आणि रायलसीमा येथे असेच हवामानाचे नमुने दिसून येतील.

#रा

## फसवणुकीप्रकरणी मोहित कंबोज यांना दिलासा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे १०३ कोटी रुपयांचे नुकसान केल्याच्या आरोपाप्रकरणी भाजपचे नेते मोहित कंबोज आणि इतरांविरुद्ध दाखल फसवणुकीचे प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा सीबीआयने दाखल केलेला अहवाल महानगरदंडाधिकाऱ्यांनी मंगळवारी स्वीकारला. त्यामुळे, कंबोज यांना दिलासा मिळाला आहे. सीबीआयने केलेला तपास अपूर्ण आहे. किंबहुना, तो पुरेसा नसल्याची टिप्पणी करून अतिरिक्त मुख्य महानगरदंडाधिकाऱ्यांनी प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा अहवाल सुरुवातीला फेटाळला होता. तसेच, तपास यंत्रणेने प्रकरणाचा पुढील



तपास करून योग्य तो अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. या निर्णयाला सीबीआयने विशेष न्यायालयात आव्हान दिले होते. विशेष न्यायालयाने सीबीआयचे अपील योग्य ठरवले. तसेच, प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा सीबीआयचा अहवाल फेटाळण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय रद्द केला. या पार्श्वभूमीवर, महानगरदंडाधिकाऱ्यांनी मंगळवारी याप्रकरणी निर्णय देताना कंबोज आणि इतरांविरुद्ध दाखल फसवणुकीचे हे प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा सीबीआयने दाखल केलेला अहवाल स्वीकारला.

दरम्यान, टेनेट एक्झिम प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक असलेल्या कंबोज आणि इतर आरोपींनी क्रेडिट सुविधेचा लाभ घेण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर करून सेंट्रल बँक ऑफ इंडियाची १०३ कोटी रुपयांची फसवणूक केली, असा सीबीआयचा आरोप होता. परंतु, कंपनी आणि तिच्या संचालकांवर खटला चालवण्यासाठी पुरेसे पुरावे आढळून आलेले नाहीत, असा दावा करून सीबीआयने प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा अहवाल न्यायालयात सादर केला होता.

## रशिया, जपानला भारताने टाकले मागे

# वाटचाल महासत्तेकडे...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत हा अमेरिका, चीन पाठोपाठ तिसऱ्या क्रमांकावर असून, त्याने रशिया तसेच जपानला मागे टाकले आहे, असे एका अहवालात नमूद करण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियातील एका संस्थेच्या अहवालात आशिया पॉवर इंडेक्सच्या रँकिंगमध्ये भारताने जगातील अनेक बलाढ्य देशांना मागे टाकत पहिल्या तीनमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे.

आशियाई भौगोलिक प्रदेशात अमेरिका आणि चीनचे वर्चस्व कायम आहे. या दोन देशांनंतर भारत आता तिसरी सर्वात मोठी महासत्ता म्हणून उदयास आला आहे. रशिया आणि जपानसारख्या महासत्तांनाही भारताने मागे टाकले आहे. ३९.१ गुणांसह भारताने या क्रमवारीत आपले जागतिक स्थान आणखी मजबूत केले आहे, तर जपान ३८.९ गुणांसह चौथ्या स्थानावर घसरला आहे. तर, या क्रमवारीत पाकिस्तानची अवस्था बिकट दिसत आहे.

आशियातील सत्तासंतुलन अजूनही अमेरिका आणि चीनच्या हातात आहे, पण भारताचा वाढता धोका हे बदलू शकतो, असे या अहवालात म्हटले आहे. त्याचबरोबर चीनची आर्थिक आणि लष्करी वाढ अव्याहतपणे सुरू असली तरी त्याची ताकद स्थिरावली आहे. त्याचबरोबर सहापैकी आठ शक्तींच्या मानकांमध्ये अमेरिका अजूनही आघाडीवर आहे. भारताची स्थिती सुधारत असून, जपान आणि रशियाला मागे टाकत आशियात तिसऱ्या स्थानावर आपले स्थान निर्माण केले आहे.

केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी भारताच्या वाढीचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्व आणि जागतिक धोरणाला दिले आहे. अहवालानुसार, २०२३ मध्ये आशिया पॉवर इंडेक्समधील देशांसोबत सर्वाधिक राजनैतिक चर्चेत भारताने भाग घेतला होता. ज्यावरून भारत आपली राजनैतिक स्थिती मजबूत करण्यासाठी सक्रिय असल्याचे दिसून येते.

या अहवालानुसार भारताच्या वाढत्या शक्तीचा मुख्य आधार मोठी लोकसंख्या आणि वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. भारताची आर्थिक क्षमता ४.२ अंकांनी वाढविण्यात आली असून, त्याचबरोबर भविष्यातील संसाधनांच्या बाबतीत भारताचे गुण ८.२ अंकांनी वाढले आहेत.

अमेरिका आणि चीन ही प्रबळ शक्ती असली तरी भारत एक महत्त्वाचा खेळाडू म्हणून उदयास आला आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## भारत-चीन संबंधांचा जगावर परिणाम

### परराष्ट्र धोरण

**भारत-चीन संबंध** आशियाच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असून, त्याचा परिणाम केवळ आशिया खंडावरच नव्हे तर संपूर्ण जगावर होईल, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी म्हटले आहे. दोन्ही



देशांचा समांतर विकास आजच्या जागतिक राजकारणात एक अनोखी समस्या आहे, असेही त्यांनी सांगितले. एका परिसंवादात ते बोलत होते. आशियाच्या भवितव्यासाठी भारत-चीन संबंध महत्त्वाचे असून, जग बहुध्रुवीय व्हायचे असेल तर आशिया बहुध्रुवीय असावा लागेल. त्यामुळे या संबंधांचा परिणाम केवळ आशियाच्या भवितव्यावरच नव्हे, तर कदाचित जगाच्या भवितव्यावरही होणार आहे, असे त्यांनी म्हटले आहे. जयशंकर म्हणाले की, दोन्ही देशांमधील संबंध सध्या अतिशय तणावपूर्ण आहेत. १९६२ च्या युद्धासह चीनसोबत भारताचा खडतर इतिहास आहे. आपल्याकडे असे दोन देश शेजारी आहेत, जे एक अब्जाहून अधिक लोकसंख्येचे देश आहेत, दोन्ही जागतिक व्यवस्थेत उदयास येत आहेत. आजच्या जागतिक राजकारणावर नजर टाकली तर भारत आणि चीनचा समांतर विकास ही अत्यंत अनोखी समस्या आहे, असे मला वाटते, असे ते म्हणाले. भारत आणि चीन मध्ये संपूर्ण ३,५०० किलोमीटरचा सीमावाद आहे. त्यामुळे सीमेवर शांतता असणे गरजेचे आहे, जेणेकरून संबंधात इतर गोष्टी पुढे जाऊ शकतील, असेही ते म्हणाले. सीमा शांत आणि स्थिर राहण्यासाठी दोन्ही देशांमध्ये अनेक करार झाले आहेत, हे त्यांनी नमूद केले.

» Selected

## निफ्टी २६ हजारांवर

**मुंबई :** अस्थिर सत्रात भारतीय शेअर निर्देशांक बुधवारी जोरदार बंद झाले आणि निफ्टी पहिल्यांदाच २६,००० च्या वर गेला. सेन्सेक्स




२५५.८३ अंकांनी वधारून ८५,१६९.८७ वर, तर निफ्टी ६३.८० अंकांनी वधारून २६,००४.२० वर बंद झाला. सुमारे १,६३७ समभाग वधारले, २,१४८ घसरले आणि १०४ स्थिर राहिले. पॉवर ग्रिड कॉर्प, एनटीपीसी, ॲक्सिस बँक, ग्रासिम इंडस्ट्रीज, बजाज फिनसर्व्ह यांचे समभाग निफ्टीवर सर्वाधिक वधारले, तर एलटीआयमिनिंद्र, टेक महिंद्रा, टाटा कन्झ्युमर, टाटा मोटर्स आणि टायटन कंपनीचे समभाग घसरले. बीएसईमिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक प्रत्येकी ०.५ टक्क्यांनी घसरले. सेक्टोरल आघाडीवर पॉवर, मेटल, मीडिया आणि रियल्टी निर्देशांक ०.५-३ टक्क्यांनी वधारले, तर एफएमसीजी, पीएसयू बँक आणि आयटी निर्देशांक ०.५-१ टक्क्यांनी घसरले.

## ओडिशाची सावधगिरी

**नवी दिल्ली :** तिरुपतीच्या लाडूंमध्ये जनावरांची चरबी सापडल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर ओडिशा सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. जगन्नाथ मंदिरात प्रसाद बनवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तुपाचा दर्जा तपासण्याचा निर्णय ओडिशा सरकारने घेतला आहे. आंध्र प्रदेशातील तिरुमला मंदिरात लाडू बनवताना जनावरांची चरबी असलेले तूप वापरल्याच्या आरोपानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. पुरीचे जिल्हाधिकारी सिद्धार्थ शंकर स्वैन यांनी सांगितले की, येथे असा कोणताही आरोप झाला नसला तरी प्रशासन प्रसादासाठीच्या तुपाच्या गुणवत्तेची तपासणी करेल. ओडिशा मिल्क फेडरेशन (ओमफेड) ही पुरी मंदिरासाठी तूपाचा एकमेव पुरवठादार आहे. मात्र, भेसळीची भीती कमी करण्यासाठी या तुपाचा दर्जा तपासला जाणार आहे. मंदिरात प्रसाद तयार करणाऱ्या सेवकांशीही चर्चा केली जाणार आहे. मंदिरात दिवे लावण्यासाठीही शुद्ध तुपाचाच वापर केला जात आहे.

## भाजपची विधानसभेसाठी जोरदार तयारी

# हरियाणात संघाची मदत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हरियाणा विधानसभा निवडणुकीला दोन आठवड्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. या निवडणुकीसाठी भाजपने जोरदार तयारी चालवली असून, भाजपने या निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचीही मदत घेतली आहे. पन्नाप्रमुखांवर भाजपचा जोर असेल, असे पक्षांतर्गत सूत्रांनी स्पष्ट केले.




पन्नाप्रमुखांच्या रणनीतीला संघाच्या कार्यकर्त्यांचा पाठिंबा दिला आहे. त्याचबरोबर नमो ॲपच्या माध्यमातून बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यात येत आहे. राज्यात अशा २० जागा आहेत, जेथे प्रयत्न केले तर भाजपच्या बाजूने मतदान होऊ शकते. येथे काँग्रेसने अद्यापही दावा केलेला नाही. तसेच या जागांवर तिरंगी किंवा बहुरंगी लढत रंगणार आहे. अनेक जागांवर अपक्षही मजबूत स्थितीत आहेत. काँग्रेस या जागांबाबत साशंक असून, भाजपने त्यांच्याकडे म्हणून लक्ष दिले आहे. यात हिसार, सिरसा, कुरुक्षेत्र आदींचा समावेश आहे. कार्यकर्ता सक्रिय झाला, तर पक्षाला यश मिळू शकते, असे भाजपला वाटते. त्यामुळेच संघाशी समन्वय साधून काम करण्याची रणनीती आखली जात आहे. येत्या दहा दिवसांत पन्नाप्रमुखांच्या रणनीतीवर काम करण्याचे नियोजन आहे.

लोकसभा निवडणुकीत संघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने निष्क्रिय राहिले होते. मात्र, आता त्यांना मदत मिळाली तर परिस्थिती बदलू शकते, असे नेतृत्वाला वाटते.

लोकसभा निवडणुकीनंतर भाजपशी समन्वय नसल्याची तक्रारही संघाने केली होती, असे मानले जाते. आता भाजप नेतृत्वाने संघासोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या महिन्यात याबाबत काही बैठका झाल्या आहेत. पक्षाने या निवडणुकीत ४० नव्या चेहऱ्यांना मैदानात उतरवले आहे.

## कॅश फॉर व्होट प्रकरणी आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कॅश फॉर व्होट प्रकरणी तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांना १६ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणातील ते एक आरोपी आहे. कॅश फॉर व्होट घोटाळ्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाच्या मनी लॉन्ड्रिंगच्या तपासाशी संबंधित आरोपांवर विचार करण्यासाठी रेड्डी आणि इतर पाच आरोपींना १६ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश महानगर सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयाने दिले आहेत. विधान परिषद निवडणुकीत व्ही. नरेंद्र रेड्डी यांना पाठिंबा देण्यासाठी नामनिर्देशित आमदार एल्विस स्टीफन्सन यांना ५० लाख रुपयांची लाच दिल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रेवंत रेड्डीला अटक केली होती.

# सौदी अरेबियाने दिली पाकला तंबी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** धार्मिक तीर्थयात्रेच्या नावाखाली येणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांच्या वाढत्या संख्येबाबत सौदी अरेबियाने पाकिस्तानला इशारावजा धमकी दिली आहे. धार्मिक तीर्थयात्रेच्या नावाखाली देशात येतात आणि नंतर भीक मागतात, असे सांगत सौदीच्या अधिकाऱ्यांनी पाकिस्तानला त्या नागरिकांना थांबवण्यासाठी त्वरित कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. मात्र, असे न झाल्यास



पाकिस्तानी उमराह आणि हज यात्रेकरूंवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात, असा इशारा सौदी अरेबियाने दिला आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी सौदीचे राजदूत नवाफ बिन सईद अहमद अल-मल्की यांना आश्वासन दिले की, कठोर उपाययोजना अंमलात आणल्या जातील.

दरम्यान, फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीला (एफआयए) कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना करण्यात आल्याचे पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले आहे. पाकिस्तानी सेक्रेटरी अर्शद महमूद यांनी नोंदवले होते की, अनेक आखाती देशांनी पाकिस्तानी नागरिकांच्या वर्तनाबद्दल, विशेषत: कामाची नैतिकता, वृत्ती आणि गुन्हेगारी कारवायांमध्ये सहभागाबद्दल चिंता व्यक्त केली होती. तसेच परदेशी पाकिस्तानी आणि मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, परदेशात पकडले गेलेले ९० टक्के भिकारी पाकिस्तानचे आहेत. अनेकदा भिकाऱ्यांशी संबंधित टोळ्या पकडल्या गेल्या आहेत. पाकिस्तानी भिकाऱ्यांची संख्या सौदी अरेबियामध्ये वाढल्यामुळे सौदी अरेबिया त्रस्त झाल्याचे दिसून येत आहे.

## अहवाल अद्यापही सार्वजनिक नाही

# एक देश एक निवडणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** 'वन नेशन, वन इलेक्शन' यासंबंधीचा २२ व्या विधी आयोगाचा अहवाल केंद्र सरकारने अद्याप सार्वजनिक केलेला नाही. कायदा मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, न्यायमूर्ती रितूराज अवस्थी यांच्या अध्यक्षतेखालील २२ व्या विधी आयोगाने मार्चमध्ये पद सोडण्यापूर्वी एकाच वेळी निवडणुका घेण्याबाबत अंतिम अहवाल सादर केला होता. न्यायमूर्ती अवस्थी यांची भ्रष्टाचारविरोधी संस्था लोकपालच्या न्यायिक सदस्यपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी समितीचा राजीनामा दिला.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीच्या 'वन नेशन, वन इलेक्शन' प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली आहे. विधी आयोगाने नोव्हेंबर २०२२ मध्ये आपले काम सुरू केले होते. मात्र, त्याचा अंतिम अहवाल अद्याप प्रकाशित करण्यात आलेला नाही, तसेच सार्वजनिक डोमेनमध्ये तो उपलब्ध करण्यात आलेला नाही.

गेल्या वर्षी सप्टेंबर मध्ये सरकारने कोविंद समितीची स्थापना केली होती. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी राष्ट्रपती मुर्मू यांना अहवाल सादर केला. विधी समितीने पुढील पाच वर्षांत विधानसभांचा कार्यकाळ दोन टप्प्यांत एकत्रित करण्याची शिफारस केली आहे, जेणेकरून मे-जून २०२९ मध्ये एकाच वेळी निवडणुका होऊ शकतील.

## लेबनॉनचे विस्थापित

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**टायर :** दक्षिण लेबनॉनच्या टायरमध्ये हिजबुल्लाह आणि इस्रायली सैन्यादरम्यान सुरू असलेल्या युद्धादरम्यान लेबनॉनमधील स्थानिकांनी आपले स्थान सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

## वक्फ बोर्ड प्रकरणी सव्वा कोटी सूचना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वक्फ बोर्ड विधेयकावर विचार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या संसदीय समितीला देशभरातून सव्वा कोटी सूचना प्राप्त झाल्या आहेत. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी याबाबत चिंता व्यक्त केली असून, ते म्हणतात की एवढ्या मोठ्या संख्येने लोक का बोलत आहेत. यामागे एक मोहीम असल्याचे दिसते, त्याची चौकशी व्हायला हवी. दुबे यांनी समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांच्याकडे गृह मंत्रालयाला याची चौकशी करण्यास सांगावे, अशी मागणी केली आहे.

# परराष्ट्र धोरणासाठी अमेरिका दौरा महत्त्वाचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिका दौरा पूर्ण करून मायदेशात परत आले आहेत. सुमारे ६० तासांच्या या आंतरराष्ट्रीय प्रवासानंतर ते नवी दिल्लीला परतले आहेत. अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जपान यासारख्या देशांचा समावेश असलेल्या क्वाड गटात त्यांनी भारताला एक प्रमुख खेळाडू म्हणून प्रस्थापित केले. त्याचबरोबर द्विपक्षीय बैठकांच्या माध्यमातून भारताचे परराष्ट्र धोरण आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर जगाला दाखवण्यात आले. अशा अनेक कारणांमुळे पंतप्रधान मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळाच्या सुरुवातीला हा अमेरिका दौरा परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने नवा मैलाचा दगड ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, वेगवेगळ्या देशांच्या प्रमुखांनी पंतप्रधान मोदी यांची घेतलेली भेट भारताचे वाढते महत्त्व अधोरेखित करणारी ठरली आहे.

तंत्रज्ञानाच्या बाबतीत सातत्याने पुढे जाणाऱ्या भारताला या अमेरिका दौऱ्याचा फायदा होण्याची शक्यता आहे. नव्या तंत्रज्ञानाच्या बाबतीत सेमीकंडक्टरबाबत भारत आणि अमेरिका यांच्यात परस्पर सहकार्य सुरू आहे. याशिवाय ड्रोनखरेदी आणि सहनिर्मिती, स्वतंत्र कराराच्या साहाय्याने चीनबाहेर स्वतंत्र ऊर्जा साखळी तयार करण्याचे प्रयत्न अशा संरक्षण भागीदारीचा समावेश आहे. भारत हा विश्वासार्ह भागीदार असल्याचे संकेत अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेपासून तंत्रज्ञान जगताला मिळत असल्याचे बोलले जात आहे. पंतप्रधान मोदींच्या जगातील बड्या कंपन्यांसोबतच्या बैठकीतही हे दिसून आले.

# बांगलादेशला पाठिंबा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशमधील नव्या हंगामी सरकारला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठे यश मिळताना दिसत आहे. अमेरिकेनेही या सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी नुकतीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांची भेट घेतली. विशेष म्हणजे बांगलादेशात सत्ताबदलाचा कट रचल्याचा आरोप अमेरिकेवर यापूर्वीच झाला आहे.


अमेरिकी राष्ट्राध्यक्ष बायडन यांनी बांगलादेशच्या अंतरिम सरकारला पाठिंबा दिला असून, बायडन आणि युनूस यांची संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या अधिवेशनादरम्यान न्यूयॉर्कमध्ये भेट झाली. अमेरिकेच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने बांगलादेशची राजधानी ढाका येथे युनूस यांची भेट घेतली होती. त्यावेळी राजकीय संबंधांबाबत आश्वासन देण्यात आले होते.

## परांजपे स्किम्सचा एरिज नावाने नवीन उपक्रम

# पुनर्विकास क्षेत्रात 'परांजपे'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील गृहउद्योग क्षेत्रातील एक दिग्गज कंपनी म्हणून



ओळखल्या जाणाऱ्या परांजपे स्किम्सने एरिज या नावाने पुनर्विकास क्षेत्रात पाऊल टाकले आहे. दर्जेदार गृहनिर्माण प्रकल्प दिल्यानंतर, कंपनीने शहरी भागांच्या पुनर्विकासावर लक्ष केंद्रित केले आहे.



या उपक्रमाचा हेतू आधुनिक तंत्रज्ञानासह पारंपारिक मूल्यांचा सांभाळ करणे हा आहे, असे कंपनीने म्हटले आहे. या अंतर्गत प्रभात रोडवर सुरू असलेला साहिल प्रकल्प हा सहा मजली टॉवर असून, इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल द्वारे तो प्रमाणित आहे. या प्रकल्पात अत्याधुनिक सुविधा देण्यात आल्या आहेत. दर्जेदार बांधकाम, वेळेवर ताबा आणि शाश्वत राहणीमानाचे आमचे मूल्य प्रतिबिंबित करणारी घरे बांधणे, हा आमचा दृष्टीकोन आहे, असे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे यांनी म्हटले आहे.

३५ वर्षांहून अधिक वर्षांचा वारसा असलेल्या, परांजपे स्किम्सने ९ शहरांमधील निवासी तसेच व्यावसायिक क्षेत्रात २१० पेक्षा जास्त प्रकल्प उभारले आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी तसेच दिव्यांगांसाठी क्युरेटेड हाउसिंग विकसित करण्यात कंपनी अग्रेसर आहे. पुण्यासह मुंबई, ठाणे, बेंगळुरू आणि वडोदरा येथेही कंपनीने प्रकल्प साकारले आहेत.

## तिरुपती बालाजी प्रसादातील भेसळीच्या पार्श्वभूमीवर

# मंदिरे नियंत्रणमुक्त करण्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादातील भेसळीचा वाद देशभरात वाढला असून, या पार्श्वभूमीवर देशभरातील मंदिरे सरकारी नियंत्रणातून मुक्त करण्याची मोहीम विश्व हिंदू परिषदेने केली. मंदिरांच्या व्यवस्थापनात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत विहिंपने म्हटले आहे की, सरकारने मंदिरांचा ताबा घेणे हे मुस्लिम आक्रमक आणि इंग्रजांची मानसिकता दर्शवते. आता मंदिरांचे सरकारीकरण न करता समाजीकरण व्हायला हवे, असेही विहिंपने म्हटले आहे.

विहिंपने तिरुपती येथे संतांचे संमेलन आयोजित केल्यानंतर आणि मंदिर मंडळाने प्रसादाचे पावित्र्य राखण्यासाठी शुद्धीकरण विधी केल्याच्या दुसऱ्याच दिवशी ही घोषणा करण्यात आली. विहिंपचे सहसरचिटणीस सुरेंद्र जैन यांनी सांगितले की, सरकार मंदिरांचा वापर आपली संपत्ती लुटण्यासाठी आणि सरकारमध्ये स्थान मिळवू न शकलेल्या नेत्यांना जागा देण्यासाठी करत आहे. प्रसादात झालेल्या भेसळीने संपूर्ण हिंदू समाज संतप्त झाला आहे, असेही त्यांनी म्हटले.

शबरीमलासारख्या केरळमधील इतर अनेक मंदिरांमधून अशा भेसळीच्या बातम्या येत असल्याचा दावा विहिंपने केला आहे. हा हिंदू समाजाच्या भावनांशी खेळ असल्याचेही त्यांनी म्हटले. या सर्व घटनांमधील समान दुवा म्हणजे ही सर्व मंदिरे सरकारच्या अखत्यारित आहेत. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणजे मंदिरे सरकारच्या नियंत्रणातून मुक्त करून ती समाजाच्या स्वाधीन करणे. संतांच्या मार्गदर्शनाखाली मंदिरांचे व्यवस्थापन करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

सरकारने मंदिरे चालविणे घटनाबाह्य असल्याचे सांगत ते म्हणाले, कलम १२ नुसार राज्याला कोणताही धर्म नसतो. मग त्यांना मंदिर चालवण्याचा अधिकार कोणी दिला? कलम २५ आणि २६ आपल्याला स्वत:च्या संस्था चालवण्याचा अधिकार देतात. अल्पसंख्याक स्वत:च्या संस्था चालवू शकतात तर हिंदू का चालवू शकत नाहीत. यात एक पॅटर्न आहे असे वाटते. मुस्लिम आक्रमकांनी मंदिरे उद्ध्वस्त करून लुटली. इंग्रज धूर्त होते आणि त्यांनी मंदिरांचा ताबा घेतला. अशा प्रकारे त्यांनी मंदिरे लुटण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था उभी केली. स्वातंत्र्य मिळूनही आपले राजकारणी या वसाहतवादी मानसिकतेतून मुक्त होऊ शकले नाहीत. मंदिरांवरील सरकारचे नियंत्रण हीच मानसिकता प्रतिबिंबित करते.

एकट्या तामिळनाडू सरकारच्या अखत्यारित ४०० हून अधिक मंदिरे असून गेल्या १० वर्षांत या मंदिरांमध्ये ५० हजार कोटी रुपयांची तूट असल्याचा आरोप त्यांनी केला.

#रा



"तुम्ही ऋषभ पंतसारख्या खेळाडूविरुद्ध गोलंदाजी करत असता, तेव्हा तुम्हाला खूप काळजी घ्यावी लागते. कारण त्याच्याकडे जगातील सर्व कौशल्ये आहेत. एक गोलंदाज म्हणून, तुमच्या चुकीला त्याच्याकडे माफी नसते. त्यामुळे तुम्हाला चुका करणे टाळावे लागते. जर माझ्या चेंडूवर षटकार मारला गेला, तर ते गोलंदाज म्हणून आव्हान असते. मला षटकार पडण्याची भीती वाटत नाही. माझ्यासाठी आव्हान हे आहे की, फलंदाजांना संधी देणे आणि ऋषभसारख्या खेळाडूला क्रीजमध्ये ठेवणे. तसेच संभाव्यत: माझ्याविरुद्ध बचावात्मक खेळायला लावणे आणि या दरम्यान विकेट्सची संधी निर्माण करणे. अशी माझी रणनीती असते."

— नॅथन लॉयन

# प्रथमेश, भुमिका यांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



एच2इ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य 13 वर्षाखालील खुल्या व मुलीच्या निवड फिडे रेटेड बुद्धीबळ स्पर्धा

**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धीबळ सर्कल (पीडीसीसी) यांच्या वतीने आयोजित व एआयसीएफ, एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एच2इ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य १३ वर्षाखालील खुल्या व मुलीच्या निवड फिडे रेटेड बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात प्रथमेश शेरला याने तर, मुलींच्या गटात भुमिका वाघले यांनी आपापल्या गटात अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले.

कर्वे रोड येथील श्री गणेश सभागृह व अश्वमेध हॉल या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत आठव्या फेरीत खुल्या गटात पुण्याच्या प्रथमेश शेरलाने आपला शहर सहकारी आदित्य जोशीला बरोबरीत रोखले व ७ गुणांसह विजेतेपद पटकावले. प्रथमेशने इंग्लिश ओपनिंगने डावास सुरुवात केली व ३१ चालीमध्ये आदित्यला बरोबरीत रोखले. प्रथमेश हा २१के ऑनलाईन शाळेत आठवी इयत्तेत शिकत असून आयएम हेमंत शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. याच गटात चंद्रपूरच्या निहान पोहाने याने पुण्याच्या अविरत चौहानचा पराभव करून ७ गुणांसह दुसरा, तर ठाण्याच्या अथर्व सोनीने ६.५ गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला.

मुलींच्या गटात छत्रपती संभाजी नगरच्या भूमिका वाघलेने साताऱ्याच्या तन्मयी घाटेचा पराभव करून ६.५ गुणांसह विजेतेपद पटकावले.भूमिका ही केंद्रीय विद्यालय येथे पाचवी इयत्तेत शिकत असून सुमो चेस अकादमीत प्रशिक्षक सुमुख गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. मुंबई शहरच्या त्वेशा जैनने पुण्याच्या निहिरा कौलचा पराभव करून दुसरा क्रमांक पटकावला. मुंबई उपनगरच्या मायशा परवेझने नागपूरच्या वृतिका गमेला बरोबरीत रोखले व तिसरा क्रमांक पटकावला.

स्पर्धेतील विजेत्यांना करंडक व रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक जोश सॉफ्टवेअरचे मुख्य कार्यकारी अधिकारी व हॉकी, स्क्वॉश, क्रिकेटपटू गौतम रेगे आणि महिला आंतरराष्ट्रीय मास्टर मृणालिनी कुंटे - औरंगाबादकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक प्रकाश कुंटे, चीफ आरबीटर आयए अथर्व गोडबोले, डेप्युटी चीफ आरबीटर आमरीश टल्लू, राजेंद्र शिदोरे आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेतील खुल्या गटातील प्रथमेश शेरला, निहान पोहाने, अथर्व सोनी, अलौकिक सिन्हा, आदित्य जोशी यांची तर, व मुलींच्या गटातील भुमिका वाघले, त्वेशा जैन, मायशा परवेझ, वृतिका गमे, सई देव या खेळाडूंची निवड आगामी कोलकत्ता येथे २ डिसेंबर २०२४ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी झाली असून हे खेळाडू महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

# १८ वर्षीय द्रोणची ४९८ धावांची इनिंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** १८ वर्षीय द्रोण देसाईने शालेय क्रिकेट स्पर्धेत एका डावात ४९८ धावा केल्या आहेत. ४५० हून



अधिक धावा करणारा तो भारताचा सहावा फलंदाज ठरला आहे. या स्पर्धेचे आयोजन सेंट्रल बोर्ड ऑफ क्रिकेट, अहमदाबाद यांनी केले होते. ही स्पर्धा गुजरात क्रिकेट असोसिएशन अंतर्गत येते.

गांधीनगर येथील शिवाय क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या दिवाण बल्लूभाई कप अंडर-१९ मल्टी-डे स्पर्धेत जेएल इंग्लिश स्कूलविरुद्ध द्रोणने ही खेळी खेळली आहे. सेंट झेवियर्सकडून खेळताना त्याने ३२० चेंडूंचा सामना केला. द्रोणाच्या या खेळीत ७ षटकार आणि ८६ चौकारांचा समावेश होता. तिसऱ्या क्रमांकावर उतरलेल्या द्रोणने चौकारांमधूनच ३८६ धावा केल्या.

# सेरेन स्ट्रायकर्स, कल्याण क्लब उपांत्य फेरीत !

**पुणे :** स्पार्टन क्रिकेट क्लब तर्फे आयोजित चौथ्या 'स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद टी-२० क्रिकेट स्पर्धेत सेरेन स्ट्रायकर्स आणि कल्याण क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. सिंहगड रोडवरील कोद्रे फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या उपांत्यपुर्व फेरीमध्ये साहील महाजन याने केलेल्या ६२ धावांच्या जोरावर सेरेन स्ट्रायकर्सने गट्स



अँड ग्लोरीचा ६ गडी राखून पराभव केला आणि उपांत्य फेरी गाठली. पहिल्यांदा फलंदाजी करताना गट्स अँड ग्लोरी संघाने १५४ धावांचे आव्हान उभे केले. कुणाल गुप्ता याने ५२ धावांची खेळी केली. हे लक्ष्य सेरेन स्ट्रायकर्स संघाने १६.५ षटकात व ४ गडी गमावून पूर्ण केले. साहील महाजन याने ३८ चेंडूत ४ चौकार आणि ५ षटकारांसह ६२ धावांची खेळी केली. रोमित जोशी याने ४७ धावांचे योगदान दिले. केतन पासलकर याने केलेल्या फटकेबाजीमुळे कल्याण क्लबने लिजंड्स स्पोटर्स क्लबचा ३ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना लिजंड्स स्पोटर्स क्लबने हृषीकेश आगाशे (९७ धावा), नचिकेत कुलकर्णी (४४ धावा) आणि विपुल खैरे (३७ धावा) यांच्या फलंदाजीच्या जोरावर २१९ धावांचा डोंगर रचला. या आव्हानाचा पाठलाग करताना कल्याण क्लबच्या डावाची सुरूवात अतिशय खराब झाली. ५ धावांवरती ४ गडी बाद आणि त्यानंतर त्यांचा निम्मा संघ ३.१ षटकामध्ये २० धावांमध्ये तंबुत गेला होता. त्यानंतरसुद्धा संघ ६ बाद ५७ धावा अशा अडचणीमध्ये सापडला होता. यानंतर फलंदाजीस आलेल्या केतन पासलकर याने ४० चेंडूत ९ चौकार आणि ५ षटकारांसह नाबाद ८७ खेळी केली. त्याला पृथ्वीराज गायकवाड (६६ धावा) आणि ऋत्विक महाजन (४४ धावा) यांनी सुरेख साथ दिली. सातव्या गड्यासाठी केतन आणि पृथ्वीराज यांनी ६१ चेंडूत १५२ धावांची भागिदारी करून कल्याण संघाला १७.५ षटकात अशक्यप्राय असा वाटणारा विजय मिळवून दिला.

# टी-२० वर्ल्डकपसाठी टीम इंडिया सज्ज !

**नवी दिल्ली :** आशिया करंडक स्पर्धेतील एकमेव सामना आम्ही खराब खेळलो आणि विजेतेपद हुकले होते, परंतु त्यातून आमच्या उणिवा समजून आल्या. त्यावर आता मात करून आम्ही विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेसाठी सज्ज झालो आहोत, असा विश्वास कर्णधार हरमनप्रीत कौरने व्यक्त केला. संयुक्त अरब अमिरातीमध्ये पुढील महिन्याच्या सुरुवातीपासून महिलांची टी-२० विश्वकरंडक स्पर्धा सुरू होत आहे. त्यासाठी आज बीसीसीआयच्या मुख्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत हरमनप्रीत कौर, मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार आणि निवड समितीच्या अध्यक्षा नीतू डेव्हिड उपस्थित होते. श्रीलंकेत झालेल्या आशिया करंडक स्पर्धेत आम्ही उत्तम खेळ केला होता, फक्त अंतिम सामन्यात आम्ही अपेक्षा पूर्ण करू शकलो नव्हतो, परंतु त्यातून आम्ही कोठे कमी पडत आहोत त्या उणिवा समजल्या आणि त्या दूर करण्याचा प्रयत्न केला आहे, असे हरमनप्रीत कौर म्हणाली. अमोल मुझुमदार यांनीही हा मुद्दा अधिक स्पष्ट करताना सांगितले की, या टी-२० स्पर्धेच्या तयारीसाठी झालेल्या सराव शिबिरामध्ये आम्ही या उणिवांवर मार्ग शोधले आहेत. बंगळूरमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीतील शिबिरामध्ये आम्ही तंदुरुस्ती आणि क्षेत्ररक्षणावरही भर दिला. त्यानंतर आम्ही सराव सामने खेळलो. त्यामुळे सर्वंकष तयारी आम्ही केली आहे.

# सेंट व्हिन्सेंटच्या विजयात रायन चमकला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सेंट व्हिन्सेंट हायस्कूलने टाटा ऑटोकॉम्प द्वारा संचालित लोयोला फुटबॉल चषक २०२४ मध्ये ह्यूम मॅकहेन्री स्कूलविरुद्ध तिन्ही गटांमध्ये एकतर्फी विजय मिळवत वर्चस्व राखले.

लोयोला एचएस मैदान, पाषाण येथे सुरू असलेल्या स्पर्धेत सोमवारी सेंट व्हिन्सेंटच्या एचएसने १२ वर्षांखालील मुले गटात



प्रतिस्पर्ध्यांवर ६-० अशा मोठ्या फरकाने मात केली. रायन पंजाबीने पहिल्या, १२व्या आणि १७व्या मिनिटाला गोल करताना विजयात मोलाचा वाटा उचलला.

याहा शेखने (६वेआणि ३५वे) दोन तसेच न्विक लोबोने(२३वे) एक गोल करताना त्याला चांगली साथ दिली. १४ वर्षांखालील गटाच्या सामन्यात, सेंट व्हिन्सेंटच्या एचएस संघाने ह्यूम मॅकहेन्री स्कूलचा ४-० असा पराभव केला. ईशान सिंगने (४वे) लवकर खाते उघडल्यानंतर अंश लोढा(२९वे आणि ३८वे) तसेच अर्णव मानेने (४८') एक गोल करताना विजयाला हातभार लावला. दिवसातील शेवटच्या लढतीत, १६ वर्षांखालील गटामध्ये सेंट व्हिन्सेंट हायस्कूलने ह्यूम मॅकहेन्री स्कूलला १-० असे पराभूत केले. सामन्यातील एकमेव गोल अवैस कुरेशीने (१३') पुर्वार्धात केला. तोच निर्णायक ठरला. विबग्योर संघ अनुपस्थित राहिल्याने विद्या भवन हायस्कूलला पुढे चालण्यात देण्यात आली.

